CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

लातूर | शनिवार, २८ मार्च २०२६ । वर्ष ४ थे अंक २० । पाने १२ । किंमत रु. ६/- | RNI No. MAHMAR/2023/86477 | Postal Regd No. SLP/32/2024-2026.

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



समाजव्यवस्थेच्या धर्मबंधनात राहून व आपल्या जीवनाची वाटचाल मोक्षप्राप्तीच्या लक्ष्याप्रत नेणारी होवो, ही आकांक्षा बाळगून समाजकार्यास वाहिलेले जीवन, हेच खरे पुरुषार्थी मनुष्यजीवन आहे. हिंदू जीवनपद्धतीत अशा जीवनालाच सर्वश्रेष्ठ गौरवाचे स्थान आहे.

**- एकनाथ रानडे**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह, संस्थापक विवेकानंद शिला स्मारक व विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी

# रामललाच्या कपाळावर सूर्यकिरणांचा तेजस्वी स्पर्श

## याचि देही याचि डोळा लाखो भाविकांनी अनुभवला अभिषेक सोहळा, अयोध्येतील राममंदिरात घुमला प्रभू श्रीरामाचा जयघोष

**अयोध्या, २७ मार्च**

अयोध्यानगरीतील श्री राममंदिरात तिथीनुसार शुक्रवारी रामजन्मोत्सव जल्लोषात पार पडला. पंचामृत अभिषेक, स्वर्णजडित पितांबर आणि मंत्रोपचाराने पूजेचा विधी पार पडत असताना अभिजीत मुहूर्तावर (हिंदू पंचांगानुसार) दुपारी १२ वाजता ठोक्यावर सूर्याची तेजस्वी किरणे रामललाच्या कपाळावर पडताच मंदिर परिसर श्रीरामाच्या जयघोषाने निनादला. हजारो भाविकांनी याचि देही याचि डोळा अविस्मरणीय असा अभिषेक सोहळा जवळपास चार मिनिटे अनुभवला. हा सोहळा भगवान रामांच्या जन्माचा क्षण मानल्या जाणाऱ्या अचूक वेळीच पार पडला.

अयोध्येतील श्री राममंदिरात रामनवमी उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा झाला. अभिजीत मुहूर्तावर (हिंदू पंचांगानुसार) भगवान सूर्याने रामललाच्या कपाळावर टिळा लावला. यावर्षी रामनवमीच्या दिवशी रवी योग आणि सर्वार्थ सिद्धी योगाचा विशेष संयोगही होता. यामुळे सोहळ्याचे धार्मिक महत्त्व पाहता हजारोंच्या संख्येने भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

सूर्यकिरण अभिषेकासह शृंगार आणि इतर धार्मिक विधींचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. भारत आणि विदेशातील भाविक दिव्य क्षणाचे साक्षीदार झाले. सूर्य तिलक सोहळ्याने रामललांचा जन्मोत्सव साजरा झाला. यावेळी गर्भगृहात चौदा पुजारी उपस्थित होते. त्यांनी विशेष प्रार्थना केली, त्यानंतर आरती करण्यात आली. (वृत्तसंस्था)



### सूर्यकिरण सोहळ्याची अशी होती तयारी

**सूर्यकिरण सोहळ्यासाठी २० अष्टधातूच्या नळ्यांपासून ६५ फूट लांबीची एक रचना तयार करण्यात आली होती. गर्भगृहातील चार भिंग आणि चार आरशांमधून रामललाच्या कपाळावर किरणे टाकण्यात आली. यासाठी आठवडाभरापासून तयारी सुरू होती.**

### पंतप्रधान मोदींनी अनुभवला सोहळा



**रामललाचा सूर्यकिरण अभिषेक सोहळ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी आभासी पद्धतीने सहभागी झाले. जवळपास पंधरा मिनिटापर्यंत त्यांनी विविध विधी आणि अभिषेक सोहळ्यात सहभाग नोंदवला. 'एक्स'वरील पोस्टममध्ये त्यांनी म्हटले की, त्याग, तपश्चर्या आणि संयमाने भरलेले मर्यादा पुरुषोत्तमांचे जीवन आपल्याला प्रत्येक परिस्थितीला पूर्ण शक्तिनिशी सामोरे जाण्याची प्रेरणा देते. त्यांचे आदर्श भारतीयांसाठी आणि संपूर्ण मानवतेसाठी सदैव मार्गदर्शक राहतील. माझी इच्छा आहे की, प्रभू श्रीरामाच्या आशीर्वादाने, विकसित आणि आत्मनिर्भर भारताच्या संकल्पाच्या पूर्ततेचा मार्ग प्रशस्त होईल.**

## पेट्रोल-डिझेलवरील उत्पादन शुल्कात कपात

**नवी दिल्ली, २७ मार्च**

जागतिक बाजारात कच्च्या तेलाचे दर प्रति बॅरल शंभर डॉलर्सच्या वर पोहोचल्याने देशातील तेल शुद्धीकरण कंपन्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. कंपन्यांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने पेट्रोल, डिझेलवर आकारण्यात येणारे उत्पादन शुल्कात प्रत्येकी दहा रुपयांची कपात केली आहे.

पेट्रोलवरील शुल्क १३ रुपये प्रति लिटरवरून ३ रुपये करण्यात आले, तर डिझेलवरील शुल्क १० रुपयांवरून शून्य करण्यात आल्याची माहिती पेट्रोलियम मंत्रालयाने दिली. युद्धामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर ७३ डॉलर्सवरून वाढून १०५ डॉलर प्रति बॅरलच्या पुढे गेले. तेल कंपन्यांनी तोटा भरून काढण्यासाठी उत्पादन शुल्कात कपात करण्याची मागणी सरकारकडे केली होती. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### आयपीएलचा थरार आजपासून रंगणार

**बंगळुरू** : १९ व्या इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट हंगामाला शनिवारपासून येथे प्रारंभ होणार आहे. येथील एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर सायंकाळी गतविजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यादरम्यान सलामीचा सामना खेळला जाणार आहे. या स्पर्धेत दहा संघ विजेतेपदासाठी झुंजणार आहे. मुंबई इंडियन्स, चेन्नई सुपर किंग्ज व कोलकाता नाईट रायडर्स या तीन संघांनी मिळून आतापर्यंत १३ विजेतेपदे पटकावली आहेत. ते पुन्हा विजेतेपदावर आपले नाव कोरण्यास उत्सुक असतील. क्रिकेटप्रेमींचे लक्ष रोहित शर्मा व विराट कोहलीच्या कामगिरीवर असेल. त्याचवेळी नवोदित खेळाडूंना चमकदार कामगिरी करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.




### सार्वजनिक विश्वस्त विधेयक लोकसभेत सादर

**नवी दिल्ली** : लोकसभेत शुक्रवारी सार्वजनिक विश्वस्त सुधारणा विधेयक - २०२६ सादर करण्यात आले. किरकोळ गुन्ह्यांना गुन्हेगारी श्रेणीतून वगळणे आणि नियम सोपे करणे हा या विधेयकाचा उद्देश आहे. वाणिज्य आणि उद्योग राज्यमंत्री जितीन प्रसाद यांनी हे विधेयक सादर केले. चर्चेदरम्यान प्रसाद म्हणाले, गुन्ह्याच्या श्रेणीनुसार दंड आणि शिक्षा निश्चित करणे आणि अपील करण्याची यंत्रणा स्थापन करणे सुलभ व्हावे यासाठी विधेयक सादर करण्यात आले. विधेयकाअंतर्गत, २३ मंत्रालयांद्वारे लागू केलेल्या ७९ केंद्रीय कायद्यांमधील एकूण ७८४ तरतुदींमध्ये बदल प्रस्तावित आहेत. यापैकी, व्यवसायाला चालना देण्यासाठी ७१७ तरतुदी गुन्हेगारीच्या श्रेणीतून वगळण्याचा प्रस्ताव आहे.

### भोंदू खरातची 'एचआयव्ही' चाचणी 'निगेटिव्ह'

**नाशिक** : भीती दाखवून अनेक महिलांचे लैंगिक शोषण करणारा भोंदूबाबा अशोक खरातचे अनेक व्हिडीओ आणि फोटो समाज माध्यमांमधून व्हायरल झाले आहेत. अटकेची कारवाई करण्यात आल्यानंतर पोलिसांनी केलेली खरातची एचआयव्ही चाचणी निगेटिव्ह आली. पोलिसांनी पंचांच्या समक्ष कार्यालयाला सील ठोकले आहे. एसआयटी आणि न्यायवैद्यक पथकाने कार्यालयाची सखोल पाहणी केली. दरम्यान, त्यांनी कार्यालयातून प्रिंटर आणि कागदपत्रे ताब्यात घेतली आहेत. अशोक खरातला न्यायालयाने २९ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. सध्या अशोक खरातची एसआयटीकडून कसून चौकशी सुरू आहे. भविष्य सांगण्याचा बहाण्याने अशोक खरात याने १५० पेक्षा जास्त महिलांवर अत्याचार केल्याचे पोलिस तपासात उघडकीस आले. नाशिक पोलिसांत दाखल झालेल्या आठ गुन्ह्यांपैकी सात गुन्हे महिला अत्याचार संदर्भात आहेत. अशोक खरातचे अत्याचार प्रकरण गंभीर आणि संवेदनशील असल्याने पोलिस गुन्हाशी सबंधीत बाजूचा विचार करून तपास करीत आहेत. खरातचा तपास पथकाने ताब्यात घेतला आहे.



# केंद्र-राज्यांत समन्वय असावा

## ● मध्यपूर्वेतील संघर्षावर पंतप्रधानांची मुख्यमंत्र्यांसोबत बैठक ● अडीच तास आभासी चर्चा

**नवी दिल्ली, २७ मार्च**

पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पृष्ठभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसोबत आभासी बैठक घेतली. ही बैठक सुमारे अडीच तास चालली. या बैठकीत देशाची सज्जता वाढवणे, सामरिक पेट्रोलियम साठे, पुरवठा साखळी आणि राज्यांसोबत समन्वय यावर लक्ष केंद्रित करण्यात आले.

सांघिक भावनेने राज्ये आणि केंद्र सरकार यांच्यात समन्वय सुनिश्चित करण्यासाठी ही आभासी बैठक आयोजित करण्यात आली होती, अशी माहिती सूत्रांनी दिली. २८ फेब्रुवारीला अमेरिका-इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर सुरू झालेल्या पश्चिम आशिया संघर्षासंदर्भात पंतप्रधानांनी मुख्यमंत्र्यांसोबत झालेली ही पहिलीच वेळ आहे.

या बैठकीला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, एन. चंद्रबाबू नायडू, योगी आदित्यनाथ, रेवंत रेड्डी, भगवंत मान, भूपेंद्र पटेल, ओमर अब्दुल्ला, सुखविंदरसिंग सुक्खू आणि अरुणाचल प्रदेशचे पेमा खांडू यांच्यासह अनेक मुख्यमंत्री उपस्थित होते. याशिवाय संरक्षण मंत्री राजनाथसिंह आणि गृहमंत्री अमित शाह हेदेखील बैठकीला उपस्थित होते.

पंतप्रधानांनी आभासी स्वरूपात मुख्यमंत्र्यांशी संवाद साधला आणि राज्यांच्या तयारीचा व योजनांचा आढावा घेतला. सांघिक भावनेने समन्वय सुनिश्चित करणे, हा या बैठकीचा मुख्य उद्देश होता. आदर्श आचारसंहिता लागू असल्यामुळे निवडणुका होणाऱ्या राज्यांचे मुख्यमंत्री बैठकीला उपस्थित नव्हते. मंत्रिमंडळ सचिवालय निवडणुका होणाऱ्या राज्यांच्या मुख्य सचिवांसोबत एक स्वतंत्र बैठक घेणार आहे. (वृत्तसंस्था)



### बैठकीतील प्रमुख मुद्दे

**सज्जतेचा आढावा, ऊर्जा पुरवठ्यावर भर, सांघिक भावना, सुरक्षा आणि पुरवठा**

# राज्याकडे महिनाभराचा पेट्रोल-डिझेल साठा

**मुंबई, २७ मार्च**

आखाती देशांतील तणावपूर्ण परिस्थितीचा परिणाम जगभर जाणवत असताना महाराष्ट्रातही इंधन तुटवड्याच्या चर्चा रंगू लागल्या आहेत. काही ठिकाणी पेट्रोल पंपांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा दिसत असल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या पृष्ठभूमीवर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे सांगत नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेऊ नये, असे आवाहन केले आहे.



माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी शुक्रवारी सांगितले, महाराष्ट्राकडे किमान एक महिन्याचा पेट्रोल-डिझेल साठा उपलब्ध आहे आणि तुटवड्याची भीती बाळगण्याचे कोणतेही कारण नाही. काही भागांत दिसणाऱ्या रांगा या प्रत्यक्ष तुटवड्यामुळे नसून, अफवांमुळे नागरिकांनी इंधन भरण्याचा प्रयत्न केल्याने निर्माण झालेल्या आहेत.

या संदर्भात त्यांनी केंद्र सरकारच्या भूमिकेचाही उल्लेख केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारने कच्च्या तेलाच्या वाढत्या दरांचा परिणाम थेट ग्राहकांवर होऊ नये म्हणून पेट्रोल-डिझेलवरील उत्पादन शुल्कात सुमारे १० रुपयांची कपात केली असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे वाढत्या जागतिक दरांचा भार सामान्य नागरिकांवर न पडता तो सरकार आणि तेल कंपन्या उचलत असल्याचे त्यांनी नमूद केले.

सध्या काही शेजारी देशांमध्ये इंधन टंचाईमुळे अडचणी निर्माण झाल्या आहेत. मात्र, भारताने योग्य नियोजन आणि पुरवठा व्यवस्थापनामुळे अशी परिस्थिती उद्भवू दिलेली नाही. राज्यात घरगुती गॅससह पेट्रोल-डिझेलचा पुरवठा सुरळीत सुरू असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. (तभा वृत्तसेवा)

### अनावश्यक साठा करू नये

**नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवून अनावश्यकपणे मोठ्या प्रमाणात पेट्रोल किंवा डिझेल साठवण्याचा प्रयत्न करू नये, असे आवाहनही त्यांनी केले. नेहमीप्रमाणे जितके इंधन आवश्यक आहे तितकेच भरावे, अन्यथा कृत्रिम तुटवडा निर्माण होऊ शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले. प्रशासन परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असून पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलली जात असल्याची माहितीही त्यांनी दिली.**

# देशात टाळेबंदी लागणार नाही : हरदीपसिंग पुरी

### विरोधकांकडून जनतेची दिशाभूल

**नवी दिल्ली, २७ मार्च**

मध्यपूर्वेतील संघर्षाच्या पृष्ठभूमीवर देशात टाळेबंदी लागणार असल्याच्या अफवा समाज माध्यमावरून पसरविल्या जात आहे. विरोधकांकडून जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न सुरू आहे. सरकार कोणत्याही परिस्थितीत देशात टाळेबंदी लावणार नसल्याची माहिती देत केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीपसिंग पुरी यांनी विरोधकांवर हल्लाबोल केला.



देशात कच्चे तेल आणि एलपीजीचा मुबलक पुरवठा असल्याचे सरकारने जाहीर केले, सर्वपक्षीय बैठकीत यासंदर्भातील माहिती देण्यात आली. त्यानंतरही विरोधकांकडून टाळेबंदीची अफवा पसरविली जात आहे. कोणत्याही परिस्थितीत टाळेबंदीचा निर्णय घेतला जाणार नाही असे संसदेच्या परिसरात प्रसार माध्यमांशी बोलताना पुरी म्हणाले. पंतप्रधानांच्या टिप्पणीचा चुकीचा अर्थ लावून अफवा पसरवली जात आहे. देशात टाळेबंदी लागणार असल्याच्या बातम्या पूर्णपणे निराधार आहे. भारत सरकारकडे असा कोणताही प्रस्ताव सध्या विचाराधीन नाही. अशा कठीण काळात अफवा पसरवणे आणि भीतीचे वातावरण निर्माण करणे अत्यंत बेजबाबदारपणाचे वर्तन आहे. जागतिक स्तरावर कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली वाढ चिंतेची बाब आहे, असे पुरी म्हणाले. (वृत्तसंस्था)

### परिस्थिती सरकारच्या नियंत्रणात



**संसदीय कामकाज मंत्री किरण रिजिजू यांनी संसदेत माहिती देताना सांगितले की, राज्य आणि केंद्रशासित प्रदेशाच्या सरकारांना साठेबाजी होणार नाही याची खात्री करण्याच्या सूचना देण्यात आल्या. संपूर्ण परिस्थिती सरकारच्या पूर्णपणे नियंत्रणात आहे. जनतेला कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागू नये यासाठी, खुद्द पंतप्रधानही स्वतः या परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. इंधनाच्या तुटवड्याचे दावे निराधार आहे.**

# विधानभवनातील प्रवेशासाठी बनावट पास

## ● चार कर्मचाऱ्यांना अटक, दोन फरार ● सुरक्षा व्यवस्थेतील मोठी त्रुटी

**मुंबई, २७ मार्च**

नुकत्याच पार पडलेल्या राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान सुरक्षा व्यवस्थेतील मोठी त्रुटी उघड करणारा बनावट प्रवेश पास घोटाळा समोर आला आहे. या प्रकरणात मरीन ड्राईव्ह पोलिसांनी मंत्रालयातील चार कर्मचाऱ्यांसह एका खाजगी व्यक्तीला अटक केली आहे. या घोटाळ्यामुळे विधानभवनाच्या सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्न निर्माण झाले.

आरोपींनी उद्योग विभागाच्या नावावर बनावट पत्रे तयार करून महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालयाच्या सामान्य शाखेकडे अर्ज सादर केले. या अर्जांच्या आधारे त्यांनी अधिकृत प्रवेश पास मिळवले. त्यानंतर हे पास दोन ते पा हजार रुपयांना विकले.

या प्रकरणातील अटक आरोपींमध्ये दत्तात्रेय केशव गुंजाळ या खाजगी व्यक्तीसह मंत्रालयातील शिपाई गणपत जावळे, नागेश पाटील आणि लिपिक मनोज मोरबले व स्वप्निल तायडेचा समावेश आहे. (तभा वृत्तसेवा)

# शेअर बाजारात मंदीचे सावट


### रुपयाची ऐतिहासिक घसरण

**मुंबई, २७ मार्च**

दलाल स्ट्रीटवर शुक्रवारी पुन्हा एकदा मंदीचे सावट दिसून आले. सर्वच क्षेत्रांतील विक्रीचा दबाव, रुपयाचे सातत्याने होणारे अवमूल्यन आणि अमेरिका-इराण संघर्षाबाबतची अनिश्चितता यामुळे भारतीय शेअर बाजारात सुमारे दोन टक्क्यांची मोठी घसरण नोंदवली गेली.

जागतिक बाजारातील कमकुवत संकेतांमुळे शुक्रवारी बाजाराची सुरुवात नकारात्मक झाली. निफ्टी २३,१७३ वर उघडला. मात्र, दिवसभराच्या सत्रात विक्रीचा दबाव वाढत गेला. परिणामी, निफ्टी २२,८०४ या दिवसाच्या नीचांकी स्तरावर पोहोचला आणि अखेर त्याच पातळीच्या जवळ बंद झाला.

दिवसअखेर सेन्सेक्स १,६९० अंकांनी (२.२५ टक्के) घसरून ७३,५८३ वर स्थिरावला. तर, निफ्टी ४८६ अंकांनी (२.०९ टक्के) घसरून २२,८१९ वर बंद झाला. व्यापक बाजारातही घसरण दिसून आली. निफ्टी मिडकॅप २.२ टक्क्यांनी तर, स्मॉलकॅप निर्देशांक १.७ टक्क्यांनी घसरला. संपूर्ण आठवड्याचा विचार करता, सेन्सेक्स आणि निफ्टी या दोन्ही निर्देशांकांमध्ये सुमारे १.२ टक्क्यांची घट झाली.



बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल बुधवारी ४३१.०१ लाख कोटी रुपये होते. ते शुक्रवारी ८.९७ लाख कोटी रुपयांनी घसरून ४२२.०४ लाख कोटी रुपयांवर आले. दुसरीकडे, भारतीय रुपयाने सलग दुसऱ्या सत्रात घसरण कायम ठेवत, प्रथमच प्रति डॉलर ९४ रुपयांचा टप्पा ओलांडला. व्यवहारादरम्यान रुपया ९४.८४ या ऐतिहासिक नीचांकी पातळीवर गेला आणि अखेर ९४.८१ वर स्थिरावला. बुधवारी रुपया ९३.९८ वर बंद झाला होता.

क्षेत्रनिहाय पाहता, ऑटो, कन्झ्युमर ड्युरेबल, कॅपिटल गुड्स आणि खाजगी बँकिंग क्षेत्रातील शेअर्स सुमारे दोन टक्क्यांनी घसरले. निफ्टीमध्ये श्रीराम फायनान्स, टाटा मोटर्स (पॅसेंजर व्हेईकल), इंडिगो, रिलायन्स इंडस्ट्रीज आणि बजाज फायनान्स हे सर्वाधिक घसरलेले शेअर्स ठरले. तर ओएनजीसी, टीसीएस, विप्रो, भारती एअरटेल आणि कोल इंडिया या काही मोजक्या शेअर्समध्ये वाढ नोंदवली गेली.

तांत्रिक विश्लेषणानुसार, गेल्या काही सत्रांतील सुधारनेनंतर निफ्टीमध्ये शुक्रवारी मोठी घसरण झाली. दैनंदिन चार्टवर 'लाँग बेअर कॅन्डल' तयार झाली असून, ती बाजारातील तीव्र मंदीचे संकेत देत आहे. तज्ज्ञांच्या मते, गेल्या एक महिन्यापासून सुरू असलेला उतरता कल कायम असून येत्या आठवड्यात निफ्टी २२,४५० किंवा त्याहून खाली जाण्याची शक्यता आहे. २२,००० हा महत्त्वाचा आधार स्तर असून २३,२०० हा प्रतिकार स्तर राहील.

क्रूड ऑईलच्या किमतीतील चढ-उतार, अमेरिका आणि जपानमधील बाँड यील्डमध्ये झालेली वाढ, वाढता व्हिआयएक्स आणि पश्चिम आशियातील भू-राजकीय तणाव यामुळे गुंतवणूकदारांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. (तभा वृत्तसेवा)

### १००x३०० आकाराचा जर्मन हँगर मंडप



**सोलापूर** : हरिभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर पैलवान सिद्धू साखरे यांच्या स्मरणार्थ महिलांची चौथी महाराष्ट्र केसरी स्पर्धा शनिवारपासून सुरू होईल. या स्पर्धेसाठी उन व पावसापासून संरक्षणासाठी १०० बाय ३०० आकाराचा भव्य असा जर्मन हँगर पद्धतीचा मंडप उभारण्यात आला आहे. या मंडपात तीन आखाडे आणि सहा हजार प्रेक्षकांना बसण्याची सोय करण्यात आली आहे. मल्लांसाठी सहा चेंजिंग रूम, चार एलईडी स्क्रीन, फॅन व कुलर लावण्यात आले आहेत.

बोरामणीची शान : पैलवान सिद्धू साखरे (विशेष सदर पान १० वर)

# ट्रकच्या धडकेत दोन मित्रांचा जागीच मृत्यू

## बोरामणी नाका येथील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मार्च-**

बोरामणी नाका येथे ट्रकच्या धडकेत दुचाकीवरील दोन मित्रांचा जागीच मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना शुक्रवार दि. २७ मार्च २०२६ रोजी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास घडली.

मृत झालेल्या मध्ये सैफन शेखफरीद पटेल वय ४०, हुजूर अलाउद्दीन पटेल वय ३६ अशी नावे आहेत. दोघेही बोरामणी, तालुका दक्षिण सोलापूर येथील रहिवासी होते. दोन्ही मित्र भटारी जेवण बनवण्याचे काम करत होते. एका ऑर्डरसाठी ते सोलापुरात आले असताना हा अपघात घडला. ट्रकने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिल्याने दोघेही जागीच ठार झाले. घटनेची माहिती मिळताच दोघांना बेशुद्ध अवस्थेत सोलापूरातील श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. सैफन शेखफरीद पटेल यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन भाऊ, पाच बहिणी, तीन मुली आणि एक मुलगा असा परिवार आहे. तर हुजूर अलाउद्दीन पटेल यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन भाऊ आणि दोन विवाहित बहिणी असा परिवार आहे. माहिती मिळताच नातेवाईक, मित्र आणि गावकऱ्यांनी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये मोठी गर्दी केली. या घटनामुळे पुन्हा एकदा शहरातील जड वाहतूक प्रश्न ऐरणीवर आलेला आहे.



CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



पंढरपूर : शिवप्रेमी तरुण मंडळाच्या वतीने रामनवमी निमित्त राममूर्तीची मिरवणूक काढण्यात आली होती. रामभक्तांनी भगव्या रंगाची उधळण करीत सर्वत्र भगवेमय वातावरण केले होते.

### घरफोडी झाल्यानंतर कुटूंबीय भितीपोटी गेले बाहेरगावी

**सोलापूर, दि. २७ मार्च-**

शहरानजीक असलेल्या दामाजीनगर हद्दीत घरफोडी झाल्यानंतर कुटूंबिय भितीपोटी बाहेरगावी निघून गेले. दरम्यान चोरट्यांनी कुटूंबियांना चाकूचा धाक दाखवून सोने व रोख रक्कम जबरदस्तीने लुटल्याने ते कुटूंब भेदरले आहे. तसेच या परिसरात अन्य दोन ठिकाणी चोरट्यांनी घरफोडण्याचा प्रयत्न केल्याची माहिती मिळत आहे. दि. १७ मार्च रोजी यातील फिर्यादी अश्विनी हजारे व त्यांचा ११ वर्षाचा मुलगा जेवणखाण करुन रात्री झोपी गेले होते. रात्री २ ते २.१५ च्या दरम्यान तिघा चोरट्यांनी बंगल्याचे गेट उघडून आत प्रवेश केला. घराच्या मुख्य दरवाज्याच्या आतील कडी कोयंडा उचकटून त्यांनी प्रवेश करुन ११ वर्षाच्या मुलाला टॉमी मारुन उठविले. मुलाच्या ओरडण्यामुळे आई जागी झाली. या दोघांना तिघा चोरट्यांनी चाकूचा धाक दाखवून पैसे व सोने कुठे ठेवले आहे सांगा म्हणाले. यावेळी फिर्यादीच्या गळ्याला चाकू लावून ९ गॅ्रम सोन्याचे मंगळसूत्र जबरदस्तीने चोरटयांनी ओरबडून घेतले. यावेळी चोरट्यांनी फिर्यादीस व तिच्या मुलास आवाज कराल तर याद राखा अशी धमकीही दिली. तसेच फिर्यादी या मोलमजुरी शेतावर करुन उपजिवीका जगत असल्याने इतर १० महिलांचा रोजगार ४ हजार ५०० त्यांच्याकडे होता. हे रोजगाराचे पैसे उशी खाली ठेवून फिर्यादी झोपल्या होत्या. या पैशावर ही चोरट्यांनी डल्ला मारला. चोरट्यांनी तोंडाला रुमाल बांधून कानटोप्या घातल्या होत्या. दरम्यान या जबरदस्तीच्या चोरीच्या घटनेमुळे या परिसरात भितीचे वातावरण पसरले आहे. फिर्यादी चक्क भितीपोटी आपल्या मुलासह घराला कुलूप लावून चार दिवस बाहेरगावी निघून गेले होते. पोलीस प्रशासनाने रात्रीच्या वेळी पोलीस व्हॅन फिरवून या परिसरातील नागरिकांना भयमुक्त करुन त्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे.






### महाराष्ट्राचा अर्थसंकल्प २०२६-२७ विषयावरील परिसंवादात विचार मंथन

**सोलापूर, दि. २७ मार्च-**

देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय, मोहोळ येथे अर्थशास्त्र विभाग, सोलापूर विद्यापीठ अर्थशास्त्र परिषद, सोलापूर आणि मोहोळ चेंबर ऑफ कॉमर्स यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्राचा अर्थसंकल्प २०२६-२७ या विषयावर एक दिवसीय परिसंवाद उत्साहात पार पडला. परिसंवादासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रतापसिंह वसंतराव गरड, प्राचार्य डॉ. एन. जे. पाटील, प्रवीण डोके, महेश आंडगे आणि डॉ. संतोष कदम उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रा. डॉ. अमोल खाडे यांच्या प्रास्ताविकाने झाली. प्रमुख वक्ते डॉ. अविनाश जम्मा यांनी अर्थसंकल्पातील सेवा क्षेत्रातील तरतुदींचे सविस्तर विश्लेषण केले, तर प्रा. दत्तात्रय चव्हाण यांनी शेती व उद्योग क्षेत्रातील तरतुदींवर प्रकाश टाकला. समारोपात प्राचार्य डॉ. एन. जे. पाटील यांनी राज्याच्या विकासासाठी अर्थसंकल्पाचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. डॉ. अमोल खाडे यांनी आभार मानले. यावेळी प्रा. डॉ. पवार विक्रम, प्रा. नितीन कदम, प्रा. जीवक माने उपस्थित होते.

# गारपिटीमुळे नुकसानीचे पंचनामे करण्याच्या प्रशासनाला सूचना

## खा. ज्योती वाघमारे शेतकऱ्यांच्या बांधावर



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ मार्च-**

मोहोळ तालुक्यातील येवती-पापरी आणि पेनूर परिसरात झालेल्या भीषण अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर, नवनिर्वाचित शिवसेना खासदार डॉ. ज्योतीताई वाघमारे यांनी शुक्रवारी प्रत्यक्ष नुकसानीची पाहणी करण्यासाठी शेतकऱ्यांच्या बांधावर धाव घेतली. सरकार आणि लाडके भाऊ एकनाथ शिंदे खंबीरपणे तुमच्या पाठीशी आहेत, असा शब्द देत त्यांनी हतबल झालेल्या बळीराजाला धीर दिला.

येवती-पापरी आणि पेनूर परिसरात झालेल्या वादळी वाऱ्यासह गारपिटीने हाता तोंडाशी आलेला घास हिरावला आहे. द्राक्ष बागा, केळी, आणि इतर नगदी पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, अनेक ठिकाणी गोठे आणि घरांचीही पडझड झाली आहे. अनेक शेतकऱ्यांनी आपल्या व्यथा मांडताना खासदारांसमोर अश्रूंना वाट मोकळी करून दिली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन डॉ. ज्योती वाघमारे यांनी घटनास्थळावरूनच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महसूल राज्यमंत्री योगेश कदम यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला. मोहोळ तालुक्यातील या नैसर्गिक आपत्तीची माहिती देत त्यांनी शासनाकडून तातडीने मदतीची मागणी केली आहे. तसेच उपस्थित असलेल्या कृषी अधिकारी, तलाठी आणि सर्कल ऑफिसर यांना त्वरित पंचनामे पूर्ण करण्याच्या कडक सूचना दिल्या, जेणेकरून एकही बाधित शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही. याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख व झेडपी सदस्य चरणराज चवरे, मोहोळचे माजी नगराध्यक्ष रमेश बारस्कर, नगरसेवक तथा युवा सेना जिल्हाप्रमुख प्रियदर्शन साठे, भीम वाघमारे, दीपक पाटील यांच्यासह संबंधित कृषी अधिकारी, तलाठी, सर्कल ऑफिसर आदी उपस्थित होते.

# अवकाळी पाऊस-गारपिटीमुळे सोलापुरात शेतीचे मोठे नुकसान

## खा. प्रणिती शिंदे यांची लोकसभेत मदतीची मागणी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मार्च-**

जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. पार्श्वभूमीवर खासदार प्रणिती शिंदे यांनी लोकसभेत प्रश्न उपस्थित करत मदतीची मागणी केली.



गारपिटीमुळे द्राक्ष, डाळिंब, केळी, हरभरा, कांदा तसेच भाजीपाला व फळबागांचे मोठे नुकसान झाले आहे. पंचनामे अपूर्ण असल्याने मदतीत विलंब होत असल्याचेही त्यांनी नमूद केले. खासदार शिंदे यांनी एनडीआरएफ मार्फत तातडीची मदत, नुकसानग्रस्त पिकांचे त्वरित पंचनामे व योग्य भरपाई, कर्जमाफी, कांद्याला अनुदान आदी मागण्या केंद्र सरकारकडे केल्या. दरम्यान, मोहोळ तालुक्यातील येवती परिसरात झालेल्या नुकसानीची त्यांच्या टीमकडून थेट शेतात जाऊन पाहणी करण्यात आली. यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधून नुकसानीची माहिती संकलित करण्यात आली. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने निर्णय घ्यावा, अशी मागणी केली आहे.

# ब्रम्हपुरी ३३ केव्ही उपकेंद्रातील वीज पुरवठा वारंवार खंडीत

### शेतकरी संघटनेने दिला आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २७ मार्च-**

ब्रम्हपुरी येथील ३३ केव्ही वीज वितरण उपकेंद्रामधून शेतकऱ्यांना सुरळीतपणे शेतीपंपाला वीज पुरवठा होत नसल्यामुळे शेतकऱ्यांमधून तेथील कर्मचाऱ्यांच्या कर्तव्यावर शंका व्यक्त करीत संताप व्यक्त केला जात असून या वीज पुरवठ्यात सुधारणा न झाल्यास शेतकरी संघटनेने या उपकेंद्राला कुलूप ठोकून आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. दरम्यान सोलापूर येथील वीज वितरणचे अधिक्षक अभियंता यांनी लक्ष घालून येथील शेतीपंपाना सुरळीत वीज पुरवठा करावा, अशी शेतकरी वर्गातून मागणी होत आहे.

ब्रम्हपुरी येथे मागील काही वर्षापुर्वी स्वतंत्र वीज वितरणचे ३३ केव्ही उपकेंद्र स्थापन करण्यात आले आहे. येथून या परिसरातील ब्रम्हपुरी, माचणूर गावातील शेतकऱ्यांच्या शेतीसाठी तसेच घरगुती वापरासाठी वीज पुरवठा केला जातो. सध्या या उपकेंद्रातील कर्मचारी सातत्याने शेतकऱ्यांच्या ग्रुपवर काम असल्यामुळे वीज पुरवठा बंद केला जाईल असा मेसेज टाकत असल्यामुळे शेतीपंप सुरळीतपणे चालत नाहीत. परिणामी उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे पाणी अभावी पिके धोक्यात सापडत आहेत.

वीज पुरवठा ३३ केव्हीमधूनच खंडीत केला जातो मात्र मंगळवेढ्यातून वीज पुरवठा गेला असल्याचा मेसेज टाकून शेतकर्यांची दिशाभूल केली जात आहे. या सर्व घटनांवर वरिष्ठ अधिकाऱ्यांचा अंकुश आहे की नाही? असा संतापजनक सवालही शेतकरीवर्गामधून केला जात आहे. आठवड्यातून बुधवार हा खास वीज वितरणच्या कामासाठी असताना पुन्हा गुरुवार ते मंगळवार या दरम्यानही अधून मधून वीज घालवून शेतकऱ्यांना नाहक त्रास देण्याचा उद्योग येथील कर्मचारी करत असल्याने जिल्ह्याचे वीज वितरण अधिक्षक यांनी गांभीर्यपूर्वक येथे लक्ष देवून दोषी कर्मचाऱ्यांवर निलंबनासारखी कारवाई करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून पुढे येत आहे.

# नामसंकीर्तन सभागृहाला कर्मयोगी सुधाकरपंतांचे नाव द्या; मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २७ मार्च-**

देशाची दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पंढरपूर शहरात नव्याने उभारण्यात येणाऱ्या नामसंकीर्तन सभागृहावरून सध्या चर्चांना उधाण आलं आहे. या सभागृहाला स्व. सुधाकरपंत परिचारक यांचे नाव देण्याची जोरदार मागणी माजी नगरसेवक विक्रम शिरसट व नगरसेविका प्रतीक्षा शिरसट यांनी केली आहे. आपल्या मागणी संदर्भात शिरसट दाम्पत्यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदन देखील दिले आहे.

स्वर्गीय सुधारकरपंत परिचारक यांनी सहकार क्षेत्रात काम करताना शेतकऱ्यांसाठी मोठं योगदान दिलं आहे. पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांना न्याय देण्याची भूमिका केली सातत्याने मांडली. सर्वच पक्षाशी मैत्रीपूर्ण संबंध, आणि सर्वांशीच मिळताजुळता स्वभाव ही त्यांची खरी ओळख .. आमदार असताना सभागृहात शांतपणे कोणावरही टीका टिप्पणी न करता लोकहिताचे विषय त्यांनी अनेक मांडले. पंढरपूरच्या जडणघडणीत त्यांच्या भूमिकेला ऋषीतुल्य मानत, त्यांच्या नावाने सभागृह



होणं हीच खरी त्यांना श्रद्धांजली ठरेल, असे मत शिरसट यांनी व्यक्त केले आहे. नाम संकीर्तन सभागृह उभारणीसाठी माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. आमदार प्रशांत परिचारक यांनी नामसंकीर्तन सभागृहाकरिता पहिल्या टप्प्यात २५ कोटींचा निधी उपलब्ध करून दिला होता. दुसऱ्या टप्प्यात वीस कोटींचा निधी उपलब्ध करून दिला आहे. तिसऱ्या टप्प्यात २० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद राज्य शासनाने करावी अशी मागणी शासनाकडे सातत्याने प्रशांत परिचारक यांनी केली असून लवकरच हा निधी उपलब्ध होईल असे देखील यावेळी विक्रम शिरसट यांनी सांगितले आहे.

# 'इथे थांबणे नाही' सुधारित आवृत्ती, 'वाट रेखाटणारी पावलं'चे उद्या प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २७ मार्च-**

बार्शीतील शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयाच्या प्रांगणात रविवार, २९ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता आयएएस अधिकारी रमेश घोलप यांच्या दोन प्रेरक पुस्तकांचे प्रकाशन होणार आहे.

'इथे थांबणे नाही' या आत्मकथनाच्या सुधारित आवृत्तीचे आणि उमेद प्रतिष्ठानतर्फे तयार करण्यात आलेल्या 'वाट रेखाटणारी पावलं - Grounded Glory' या मराठी-इंग्रजी द्विभाषिक कॉफी टेबल बुकचे एकाच सोहळ्यात प्रकाशन होईल. रमेश यांनी जिल्हा परिषद शाळेतून शिक्षण घेतले. कोचिंगशिवाय २०१२मध्ये यूपीएससी परीक्षेत २८७ वी रँक मिळवून आयएएस झाले. त्या वर्षीच एमपीएससीमध्येही राज्यात पहिला क्रमांक पटकावला. 'इथे थांबणे नाही' या पुस्तकात त्यांच्या संघर्ष, निश्चय आणि यशाची पूर्ण कहाणी आहे. दुसरे पुस्तक 'वाट रेखाटणारी पावलं - Grounded Glory' हे छायाचित्रांसहित कॉफी टेबल बुक असून, त्यात रमेश घोलप यांच्या प्रशासकीय सेवेतील सामाजिक




कार्य, सेवा आणि प्रेरणादायी क्षणांचे चित्रण आहे.

महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाचे सदस्य आणि माजी एटीएस प्रमुख अतुलचंद्र कुलकर्णी (निवृत्त आयपीएस, माजी एडीजी, एनआयए दिल्ली) यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक, अभिनेता व कवी नागराज मंजुळे आणि बी.व्ही.जी. ग्रुपचे संस्थापक हनुमंतराव गायकवाड यांच्या हस्ते पुस्तकांचे प्रकाशन होईल.

कार्यक्रमाला खासदार ओम राजे निंबाळकर, आमदार दिलीप सोपल, माजी आमदार राजेंद्र राऊत, बार्शी नगराध्यक्षा तेजस्विनी कथले, प्रकाशक मनोज अंबिके (माय मिरर पब्लिकेशन), डॉ. बी. वाय. यादव (अध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी) आणि ज्येष्ठ विचारवंत व कामगार नेते तानाजी ठोंबरे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

यावेळी डॉ. बी. वाय. यादव, धीरज मांजरे, अमोल ताकभाते, उमेश घोलप, प्राचार्य डॉ. दीपक गुंड, रामचंद्र इकारे, बाळासाहेब ढेंबरे, विशाल गायकवाड, अनिकेत माने, गणेश घोलप, खंडू डोईफोडे, अविनाश बोकेफोडे, विशाल घोलप, प्रमोद कानगुडे, संदीप गायकवाड उपस्थित होते.




# 'लोकमंगल'तर्फे १४ महिलांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मार्च-**

मोहोळ तालुक्यातील सावळेश्वर ग्राम पंचायत सोलापूर येथे लोकमंगल डेव्हलपमेंट फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कर्तृत्ववान स्त्रीशक्तीचा या कार्यक्रम अंतर्गत सावळेश्वर येथील १४ महिलांचा सन्मान करण्यात आला.

लोकमंगल समूहाचे संस्थापक अध्यक्ष तथा दक्षिण सोलापूर मतदार संघाचे आ. सुभाष देशमुख व लोकमंगल डेव्हलपमेंट फाउंडेशनच्या अध्यक्षा अलका देवडकर यांच्या मार्गदर्शनाखाली महिला सन्मान कार्यक्रम आयोजन करण्यात आला होता. यावेळी लोकमंगल डेव्हलपमेंट फाउंडेशनचे समन्वयक श्यामकुमार भंडारे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सावळेश्वर ग्राम पंचायत सरपंच सखाराम साठे यांच्या धर्मपत्नी राजश्री साठे, उपसरपंच पुनम टेकाळे, पंचायत समिती सदस्या पार्वती गावडे, ग्रामपंचायत सदस्या कल्पना गावडे व सहशिक्षिका रुक्मिणी गावडे उपस्थित होते. रुक्मिणी गावडे यांनी महिला दिनाचे महत्व पटवून सांगितले.

यावेळी सुरेखा गावडे, शिक्षिका मनीषा पुजारी पोलीस, लक्ष्मीबाई साबळे अंगणवाडी मदतनीस, प्रतिभा आवटे ब्युटी पार्लर, संगीता पुजारी शेवया मेकिंग, ज्योती गावडे कृषी सहाय्यक, राणी गावडे आशा वर्कर, सुलभा टेकाळे फळ विक्रेता, जयश्री गाडेकर शिवणकाम, उल्फा टेकाळे लेडीज टेलर, यल्लमा पवार उद्योजिका, जुलैका अत्तार उद्योजिका, रुक्मिणी गावडे सहशिक्षिका यांचा राजश्री साठे व पार्वती गावडे यांच्या हस्ते प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लोकमंगल डेव्हलपमेंट फाउंडेशनचे समन्वयक श्यामकुमार भंडारे, नितीन अलकुंटे यांनी काम पाहिले. आभार राजश्री साठे यांनी मानले.

# गुळपोळीच्या चौधरी यांची सलग ३६ महिने 'जलसेवा'

## पाण्यासाठी दाहीदिशा भटकंती थांबली

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २७ मार्च-**

तभा अँकर

उन्हाळ्याच्या झळा वाढू लागल्या की, पाण्यासाठी दाहीदिशा भटकंती करावी लागते. अशा काळात मानवाप्रमाणेच मुक्या प्राण्यांचीही तहान भागवणे काळाची गरज आहे.

हीच गरज ओळखून गुळपोळी (ता. बार्शी) येथील पत्रकार भैरवनाथ चौधरी यांनी गेल्या तीन वर्षांपासून एक स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. कोणत्याही ऋतूचा विचार न करता, सलग ३६ महिने त्यांनी परिसरातील गायी, म्हशी, बैल आणि शेळ्या-मेंढरांसाठी स्वच्छ पाण्याचा हौद भरुन ठेवण्याची सेवा सुरु ठेवली आहे. केवळ पाणीच नाही, तर स्वच्छताही भैरवनाथ चौधरी हे केवळ हौद भरुन थांबत नाहीत, तर दर तीन-चार





दिवसांनी हा हौद स्वतः स्वच्छ करतात, जेणेकरुन प्राण्यांना शुद्ध पाणी मिळेल. ग्रामीण भागात जिथे अनेकदा पाणीटंचाई भासते, तिथे त्यांची ही 'जलसेवा' पशुपालकांसाठी मोठा आधार ठरली आहे.

भैरवनाथ चौधरी हे 'महामानव बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या माध्यमातून केवळ प्राणीसेवाच नव्हे, तर समाजाच्या प्रत्येक घटकासाठी कार्यरत आहेत. संस्थेमार्फत राबवण्यात आलेले काही प्रमुख उपक्रम खालीलप्रमाणे आहेत.

आरोग्य व शिक्षण: महिलांसाठी आरोग्य शिबिरे, कर्णबधिरांसाठी श्रवणयंत्र वाटप आणि गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत. सन्मान व गौरव: आजी-माजी सैनिकांचा सत्कार, स्पर्धा परीक्षेत यश मिळवलेल्या गुणवंतांचा गौरव आणि आदर्श शेतकऱ्यांचा सन्मान. मदत कार्य- अनाथालयांना अन्नधान्य पुरवठा आणि महापुरासारख्या नैसर्गिक आपत्तीत मदत. प्रशासकीय जनजागृती: १२५ जणांना मोफत आधार कार्ड काढून देणे आणि पोस्टाच्या योजनांची माहिती तळागाळापर्यंत पोहोचवणे. निसर्ग संतुलन आणि सामाजिक बांधलकी जपणाऱ्या या कार्यामुळे भैरवनाथ चौधरी आणि त्यांच्या संस्थेचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.



# सद्संकल्प शिक्षण समूहातर्फे नूतन नगरसेवकांचा शाळेत सत्कार

**सोलापूर, दि. २७ मार्च-**

अक्कलकोट रोड वरील, सद्संकल्प शिक्षण समूहाच्या राष्ट्रसंत प्राथमिक शाळा व विश्वभूषण विद्यालय येथे महानगरपालिका प्रभाग क्रमांक ११ मधील नूतन नगरसेवकांचा सत्कार समारंभ पार पडला. या कार्यक्रमात नगरसेवक युवराजदादा सरवदे, मीनाक्षी कडगंची व अजय पोन्नम माजी नगरसेवक राजकुमार हंचाटे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सद्संकल्प शिक्षण समूहाचे संस्थापक सचिव समाजभूषण अण्णासाहेब भालशंकर उपस्थित होते.या कार्यक्रमात संस्थेचे कोषाध्यक्ष प्राचार्य बोधीप्रकाश गायकवाड, मुख्याध्यापिका मंजुश्री खंडागळे, आप्पू कडगंची,मुख्याध्यापक विनोद वर,मुख्याध्यापक अविनाश भालशंकर उपस्थित होते. प्रस्ताविक मुख्याध्यापक सत्यवान पाचकूडवे यांनी केले. सूत्रसंचालन प्रवीण पाटील यांनी तर आभार प्रदर्शन साहेबलाल लालखां यांनी केले.



आदित्य ठाकरे आणि माझ्यामध्ये मतभेद नाहीत. शिवसेनेमध्ये जन्मापासून आहे. पक्षात राज्यसभेचा खासदार किंवा मंत्री होण्यासाठी आलो नाही. बाळासाहेबांचा विचार महाराष्ट्रात नेण्यासाठी काम करतो, मी स्वत:ला एक शिवसैनिक मानतो.
**-संजय राऊत,** खासदार, उबाठा


# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

शनिवार, २८ मार्च २०२६ ३




हिंदुत्व उरले कुठे तुम्ही गुलामी करत आहात. नाव उद्धव ठाकरेंचे घेत राहुल गांधीचा प्रचार करण्याचे काम सुरू आहे. हिंदुत्ववाद काय आहे हे राऊतांनी सांगू नये कारण ते काँग्रेसचे तीर्थ पित आहेत. तुम्ही काँग्रेसच्या तीर्थाचा विचार करा.
**-नवनाथ बन,** भाजपा प्रवक्ते



उत्तरप्रदेशातील प्रयागराज संगमावर पहाटेच्या सुमारास सूर्यनारायणाला अर्घ्य देताना भाविक

# युद्धविरामाला १० दिवसांची मुदतवाढ

## ट्रम्प यांची घोषणा ● वाटाघाटीसाठी इराण तयार ● ऊर्जा प्रतिष्ठानांवरील हल्ले थांबविण्याचा सैन्याला आदेश

**◆ वॉशिंग्टन, २७ मार्च**

इराणचे लष्कर आणि नौदल उद्ध्वस्त झाले आहे, मध्यस्थी राष्ट्रांमार्फत पाठविलेल्या प्रस्तावानंतर वाटाघाटी करण्यासाठी इराणचे सत्ताधारी तयार झाले आहेत. होर्मुझ सामुद्रधुनी खुली करण्यासंदर्भात त्यांनी सहमती दर्शविल्याने युद्धविरामाला दहा दिवसांची मुदतवाढ देण्यात येत असल्याची घोषणा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली.



इराणच्या ऊर्जा प्रतिष्ठानांवर हल्ले थांबविण्याचा आदेश सैन्याला दिला आहे. सहा एप्रिलपर्यंत अमेरिका इराणवर हल्ले करणार नाही. मात्र, त्यांनी प्रस्तावावर सहमती दर्शविण्यास टाळाटाळ करणे सुरू ठेवल्यास दिलेल्या मुदतीनंतर हल्ल्याची तीव्रता वाढविण्यात येईल, असा इशारा ट्रम्प यांनी समाज माध्यमावरील पोस्टमधून दिला.

दहा दिवसांपर्यंत इराणच्या ऊर्जा प्रकल्पांवरील हल्ले थांबविण्यात आले आहेत. दोन्ही देशांमध्ये सध्या शांतता प्रस्थापित करण्यासाठी चर्चा सुरू आहे. आमच्या प्रस्तावावर इराण अनुकूल असून, त्यांच्याकडूनच चर्चेचा प्रस्ताव आला होता. होर्मुझ सामुद्रधुनी खुली करण्याची आणि आखाती देशांवरील हल्ले पूर्णपणे थांबविण्याची अट ठेवली आहे. दोन दिवसांत आखाती देशांवर हल्ले झालेले नाही, तसेच दहा तेल टँकर होर्मुझमधून रवाना झाल्याची माहिती ट्रम्प यांनी दिली. दरम्यान, इराणने युद्धातील नुकसानीची भरपाई आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीवरील आपल्या सार्वभौमत्वाची मान्यता मागितली आहे.



### १० हजार सैनिक तैनात करणार

इराणसोबत शांतता चर्चा सुरू असताना अमेरिकेने पश्चिम आशियामध्ये १० हजार अतिरिक्त सैन्य तैनात करण्याचा निर्णय घेतला आहे. संरक्षण सचिव पीट हेगसेथ यांनी यासंदर्भात माहिती दिली. तैनातीचा उद्देश संभाव्य संघर्षांसाठी लष्करी पर्याय वाढवणे हा आहे. यामध्ये ८२ व्या एअरबोर्न डिव्हिजन व्यतिरिक्त भूदल, पायदळ आणि चिलखती वाहनांचा समावेश आहे. इराणने अमेरिकेचा प्रस्ताव नाकारल्यास त्यांना मोठी किंमत चुकवावी लागेल, असा इशारा हेगसेथ यांनी समाज माध्यमावरील पोस्टमधून दिला. (वृत्तसंस्था)

### पंतप्रधान मोदींसोबत समस्येवर तोडगा काढू

इराण, इस्रायल आणि अमेरिकेतील युद्धाच्या पृष्ठभूमीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर विश्वास दाखवत म्हटले की, प्रत्येक समस्येवर मिळून सोडगा काढतो, अशा मोदी आणि मी दोन व्यक्ती आहोत. तणाव कमी करण्यास आणि शांतता प्रस्थापित करण्यास भारताचा पाठिंबा आहे. मोदी यांच्यासोबत नुकत्याच झालेल्या चर्चेत त्यांनी त्यांनी सर्वांसाठी होर्मुझ सामुद्रधुनी खुली आणि सुरक्षित ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

## आंतरराज्यीय मानवी तस्करी नेटवर्क उद्ध्वस्त

**◆ तेजपूर, २७ मार्च**

आसाम रायफल्स आणि कचार पोलिसांच्या संयुक्त कारवाईत सिलचरमधून चालणाऱ्या एका आंतरराज्यीय मानवी तस्करी नेटवर्कचा भंडाफोड झाला आहे. गुप्त माहितीच्या आधारे, सुरक्षा दलांनी २५ मार्च रोजी छापा टाकून या रॅकेटचा भाग असल्याच्या संशयावरून चार जणांना अटक केली. अटक केलेल्यांमध्ये एका नायजेरियन नागरिकासह आसाम व मिझोराममधील तीन नागरिकांचा समावेश आहे.

हा गट त्रिपुरा आणि मिझोराममधील असुरक्षित मार्गांद्वारे अवैध सीमापार हालचालींना मदत करण्यात सक्रियपणे सहभागी होता, असे प्राथमिक तपासात दिसून आले. या नेटवर्कचे संबंध शेजारील देशांशी, विशेषतः बांगलादेश आणि म्यानमारशी असल्याचे मानले जाते. अधिकाऱ्यांनी सांगितले की, हे सिंडिकेट केवळ भारतात अवैध प्रवेशच सुलभ करीत नव्हते, तर गुन्हेगारी किंवा इमिग्रेशन उल्लंघनात सामील असलेल्यांसह कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांपासून वाचण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तींसाठी बाहेर पडण्याचे मार्गही उपलब्ध करून देत होते. (वृत्तसंस्था)

# इराणच्या नौदल तळांवर इस्रायलचे हल्ले

## शस्त्रास्त्र, क्षेपणास्त्र उत्पादन केंद्रावर ड्रोनचा मारा; १५ ठार, ३५ जखमी

**◆ तेल अवीव, २७ मार्च**

इराणने शुक्रवारी काही तासांच्या अंतराने इस्रायलवर क्षेपणास्त्रांचा मारा केला, यात नऊ जण जखमी झाले. हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून इस्रायलने होर्मुझ सामुद्रधुनीलगत इराणी नौदल तळांवर ड्रोनचा मारा केला. यात १५ सैनिक ठार, तर ३५ जखमी झाले. हल्ल्यात अनेक शस्त्रास्त्र, क्षेपणास्त्र उत्पादन केंद्र उद्ध्वस्त झाल्याची माहिती इस्रायलच्या आयडीएफ अर्थात् सैन्याने दिली.

इराणी नौदलाच्या सामरिक क्षमतेचा कणा मानले जाणारे अनेक तळ उद्ध्वस्त करण्यात आले. याशिवाय प्रगत क्षेपणास्त्रांच्या विकासासाठी तयार करण्यात आलेल्या स्थळांवर हल्ले चढविले. क्रूझ नौका, पाणबुड्या, हेलिकॉप्टर तसेच सागरी सुरुंग हल्ल्यात उद्ध्वस्त करण्यात आल्याचे आयडीएफने निवेदनात म्हटले आहे. इस्रायलच्या वायुदलाने इराणची राजधानी तेहरानच्या पायाभूत सुविधांना लक्ष्य करीत अनेक भागांत हल्ले चढविले. महामार्ग, लष्करी सुविधेसाठी बांधण्यात आलेले बंकर्स नष्ट करण्यात आले.

इराणच्या सरकारी प्रवक्त्याने इस्रायलने निवासी भागांवर हल्ले चढविल्याचा आरोप केला. मारलेले गेलेले १५ जण सैनिक नसून सामान्य नागरिक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. (वृत्तसंस्था)

### पाकिस्तानी दूतावासाजवळ स्फोट

इराणची राजधानी तेहरानमधील पाकिस्तान दूतावासाजवळ एक शक्तिशाली स्फोट झाला. दूतावासातील सर्व कर्मचारी आणि राजदूत सुरक्षित असल्याचे आणि परिसराचे कोणतेही नुकसान झाले नसल्याचे इराणच्या सरकारी प्रवक्त्याने म्हटले आहे. इस्रायलकडून इराणी लष्करी तळाला लक्ष्य करण्याच्या प्रयत्नात हे स्फोट झाले. घटनेनंतर दूतावासातील सर्व कर्मचाऱ्यांना सुरक्षित स्थळी हलविले.

## पाकिस्तानमधून ड्रोनद्वारे १० किलो हेरॉईन जप्त

**जयपूर :** राजस्थानच्या श्रीगंगानगर जिल्ह्यात सीमेपलीकडून ड्रोनद्वारे टाकण्यात आलेले सुमारे १० किलो हेरॉईन जप्त करण्यात आले आहे, असे अधिकाऱ्यांनी शुक्रवारी सांगितले. याप्रकरणी पाच जणांना अटक करण्यात आली असून, जप्त केलेल्या हेरॉईनची किंमत अंदाजे ५० कोटी रुपये असल्याचेही त्यांनी सांगितले.

गुरुवारी भारत-पाकिस्तान सीमेवरील २ केएनडी गावाजवळ ड्रोनद्वारे मादकपदार्थ टाकण्यात आले होते. गुप्तचर माहितीच्या आधारे, पोलिस आणि बीएसएफने संयुक्त शोधमोहीम सुरू करून परिसराला वेढा घातला.

# दहशतवादी भरती मॉड्युलचा भंडाफोड

### पाकिस्तानात घेतले तीन महिने प्रशिक्षण

**◆ श्रीनगर, २७ मार्च**

जम्मू-काश्मीर पोलिसच्या गुप्तचर विभागाने श्रीनगर, गांदरबल आणि शोपियाँ जिल्ह्यांमध्ये छापे टाकून लष्कर-ए-तोयबाच्या एका दहशतवादी भरती मॉड्युलचा भंडाफोड केला. याप्रकरणात तोयबासाठी काम करणाऱ्या तिघांना अटक करण्यात आली. शब्बीर अहमद, जफर सिद्दीकी आणि अस्लम शेख अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

अटक करण्यात आलेले दहशतवादी मॉड्युलचे पाकिस्तान आणि बांगलादेशातील दहशतवाद्यांशी संबंध असल्याच तपासात समोर आल्याचे एका पोलिस अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला सांगितले. ही कारवाई यूएपीए कायद्यांतर्गत दाखल एका प्रकरणाच्या तपासाचा भाग म्हणून करण्यात आली. हे मॉड्युल सीमेपलीकडील सूत्रधारांसोबत काम करत होते आणि त्याचे नेटवर्क बांगलादेशपर्यंत पसरलेले होते. या मॉड्युलचा सूत्रधार शब्बीर अहमद असल्याचे तपासात उघड झाले. जो गांदरबलच्या कंगन भागातील रहिवासी आहे. त्याने व्याप्तकाश्मीरमध्ये शस्त्रास्त्रांचे प्रशिक्षण घेतले होते. यात एके-४७ रायफल चालवणे, रॉकेट लाँचर आणि आयईडी बनविण्याचा समावेश होता.



तो आधी अतिरेक्यांसाठी काम करायचा. नंतर तोयबामध्ये सामील झाला.

## लष्कर-ए-तोएबाचे दोघे अटकेत

### बांगलादेश मार्गे भारतात प्रवेश

शब्बीर अहमद याने बांगलादेशमार्गे भारतात प्रवेश केला होता. त्याचा अनेक दहशतवादी कारवायांमध्ये सहभाग होता. यापूर्वी पोलिसांनी त्याचा शोपियाँतील साथीदार इरफान अहमद याला अटक केली होती. आरोपी दहशतवादी पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमधील दहशतवाद्यांच्या संपर्कात होते. छापेमारीत पोलिसांनी मोबाईल फोन, लॅपटॉप, सिमकार्ड आणि इतर डिजिटल उपकरणांसह अनेक महत्त्वाचे पुरावे जप्त केले. (वृत्तसंस्था)

# पिकअपची ट्रेलरला धडक, सात ठार

### महिला-मुलांसह १८ भाविक जखमी

**◆ कौशांबी, २७ मार्च**

कानपूर-प्रयागराज महामार्गावर झालेल्या एका भीषण अपघातात सात जणांचा मृत्यू झाला तर महिला व मुलांसह १८ भाविक जखमी झाले. भरधाव पिकअपवरील नियंत्रण सुटल्याने ते रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रेलरला धडकले. यात पिकअप वाहन पूर्णतः उद्ध्वस्त झाले. ही घटना शुक्रवारी दुपारी डोरमा पेट्रोल पंपजवळ घडली.

पिकअपमध्ये महिला आणि मुलांसह सुमारे २५ जण प्रवास करीत होते. हे सर्व फतेहपूर जिल्ह्यातील मालवण भागातील बारोखर गावचे रहिवासी आहेत. त्यांनी रामनवमीनिमित्त शीतला धामला भेट देण्यासाठी सकाळी पिकअप बुक केली होती. दुपारी परत येत असताना हा अपघात घडला.

या घटनेमुळे घटनास्थळी गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. रस्त्यावरील जखमींचा आक्रोश ऐकून स्थानिकांनी मदतीसाठी धाव घेतली. माहिती मिळताच पोलिस आणि आरोग्य विभागाची पथके घटनास्थळी पोहोचले. जखमींना रुग्णालयात नेण्यासाठी चार रुग्णवाहिका तैनात करण्यात आल्या. रुग्णालयात नेत असताना सात जणांचा मृत्यू झाला, तर इतरांवर उपचार सुरू आहेत. या अपघातामुळे महामार्गावर काही काळ वाहतूक कोंडी झाली होती. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### हनुमान जयंतीला दिसणार ‘रामायण’ची झलक

**मुंबई :** ‘रामायण’ हा २०२६ मधील एक भव्य चित्रपट आहे. या चित्रपटातील भगवान श्रीरामाची पुढील झलक २ एप्रिलला म्हणजेच हनुमान जयंतीला दाखवली जाईल. रामनवमीच्या दिवशी चित्रपटाचे सह-निर्माता नमित मल्होत्रा यांनी समाज माध्यमावर पोस्ट जारी करून भव्य अनावरणाची माहिती दिली. आम्ही ‘रामायण’ची पुढील झलक २ एप्रिल, हनुमान जयंतीच्या शुभ मुहूर्तावर शेअर करण्यास उत्सुक आहोत. तिथे आम्ही अनेक वर्षांची मेहनत एका भव्य वर्ल्ड रिव्हीलद्वारे चाहत्यांसोबत शेअर करू आणि हा खास क्षण संपूर्ण जगात साजरा करू. तुमचे प्रेम, विश्वास आणि धैर्याबद्दल धन्यवाद, असे त्यांनी या पोस्टमध्ये लिहीले आहे.




# भारतासोबतचे समान हितसंबंध मतभेदांपेक्षा महत्त्वाचे


### चीनच्या परराष्ट्र मंत्र्यांची स्पष्टोक्ती

**◆ बीजिंग, २७ मार्च**

भारत आणि चीनमधील संबंध आता सुधारणा आणि विकासाच्या दिशेने वाटचाल करत आहेत. दोन्ही देशांचे समान हितसंबंध त्यांच्या मतभेदांपेक्षा अधिक महत्त्वाचे आहेत आणि दोघांनी प्रतिस्पर्धी म्हणून नव्हे, तर भागीदार म्हणून काम केले पाहिजे, असे चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांनी स्पष्ट केले.



चीनमधील भारतीय राजदूत प्रदीप रावत यांच्या निरोप समारंभ कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित वांग यी यांनी आपल्या संबोधनात म्हटले की, दोन्ही देशांच्या नेत्यांच्या मार्गदर्शनात संबंध सुधारत आहेत. चीन भारतासोबत मिळून काम करण्यास तयार आहे. दोन्ही देशांनी एकमेकांना धोका न मानता विकासाची संधी म्हणून पाहिले पाहिजे. चीन- भारत प्रतिस्पर्धी नव्हे, तर भागीदार असावे. जोपर्यंत द्विपक्षीय संबंधाला बळकटी मिळत नाही, तोपर्यंत जगाचे आधुनिकीकरण शक्य नाही. यावेळी त्यांनी राजदूत प्रदीप रावत यांच्या कार्याची आणि योगदानाची प्रशंसा केली. दरम्यान २०२० मध्ये लडाखमधील गलवान खोऱ्यातील लष्करी तणावानंतर दोन्ही देशांमधील संबंध बिघडले होते. जवळपास पाच वर्षांच्या तणावपूर्ण संबंधानंतर, २०२४ मध्ये रशियातील कझान येथे झालेल्या ब्रिक्स शिखर परिषदेदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि शी जिनपिंग यांच्या भेटीनंतर द्विपक्षीय संबंध सुधारण्याची प्रक्रिया सुरू झाली. दोन्ही देश सामान्य आणि स्थिर संबंध पुन्हा प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत आहेत. (वृत्तसंस्था)




फ्रान्समध्ये आयोजित जी-७ परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीच्या सत्रादरम्यान एस. जयशंकर यांचे टिपलेले छायाचित्र

### माधुरी पतीसह पोहोचली काशीला

**वाराणसी :** बॉलिवूड अभिनेत्री माधुरी दीक्षित पती श्रीराम नेने यांच्यासोबत काशीला पोहोचल्या. दोघे ‘नमो’ घाटावर अलकनंदा क्रूझमध्ये बसले. येथे त्यांनी गंगा घाटाचे दिव्य दृश्य पाहिले. यावेळी या जोडप्याने स्वतः काढलेले फोटोही शेअर केले. क्रूझमधून फिरताना माधुरी दीक्षित यांनी कुल्हड चहाचा आस्वाद घेतला. ‘दशाश्वमेध’ घाटासमोर गंगा आरती केली आणि दीपदान केले. माधुरी दीक्षित एका ज्वेलरी शॉपच्या उद्घाटनासाठी काशीला पोहोचल्या होत्या. यावेळी श्रीराम नेनेही होते. काशी सांस्कृतिक आणि आध्यात्मिक नगरी आहे. येथील सुंदरता पाहण्यासाठी त्या खूप उत्सुक होत्या. विमानतळावर माधुरी दीक्षितचे चाहते उपस्थित होते.



# उष्णता ठरतेय् हवामान बदलाचा जीवघेणा घटक

## अहवालातील माहिती ● उष्ण प्रदेशांमध्ये वाढू शकतो मृत्युदर

**◆ वॉशिंग्टन, २७ मार्च**

हवामान बदलाचा सर्वांत मोठा परिणाम वादळे किंवा पूर नव्हे तर, उष्णता आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात लोकांचा मृत्यू होऊ शकतो. याचा सर्वाधिक फटका गरीब आणि उष्ण प्रदेशांना बसेल, असा इशारा एका नवीन अहवालात देण्यात आला.

‘क्लायमेट इम्पॅक्ट लॅब’च्या मृत्यूदर अहवालानुसार, थंड प्रदेशांमध्ये मृत्यू कमी होण्याची शक्यता असली तरी, कोणतीही उपाययोजना न केल्यास उष्ण देशांमध्ये आणि शहरांमध्ये मृत्यूदर वाढेल, असे अहवालात सांगितले आहे. स्कँडिनेव्हियासारख्या थंड प्रदेशांमध्ये तापमानात थोडी वाढ झाल्याने एक लाख लोकांमध्ये ७० जणांचा मृत्यू होण्याची शक्यता आहे, तर उत्तर आफ्रिका, मध्यपूर्व आणि नैऋत्य आशियासारख्या उष्ण प्रदेशांमध्ये उष्णतेमुळे होणाऱ्या मृत्यूंची संख्या राहण्याची शक्यता अहवालात वर्तवण्यात आली. अहवालानुसार पाकिस्तानमध्ये उष्णतेमुळे २०५० पर्यंत एक लाख लोकांमध्ये ५१ जणांचा मृत्यू होऊ शकतो. उष्णतेचा सर्वाधिक फटका संसाधनांची कमतरता असल्यामुळे गरीब देशांना सर्वाधिक बसतो.




तापमानातील बदलांमुळे उच्च उत्पन्न असलेल्या देशांमध्ये सुमारे ३९ हजार लोकांचा मृत्यू होऊ शकतो. याच्या तुलनेत कमी उत्पन्न असलेल्या देशांना उष्णतेचा धोका जास्त असतो. म्हणजेच, त्या देशांमध्ये तीन लाख ९१ हजार मृत्यू होण्याची शक्यता आहे. पूर्व आफ्रिकेतील जिबुतीमध्ये तापमानामुळे होणाऱ्या मृत्यूंमध्ये वाढ होण्याचा अंदाज आहे. मध्यपूर्वेतील श्रीमंत देश कुवैतमध्ये हवामान सारखे असूनही, हे प्रमाण दुप्पट आहे. जिबुतीमध्ये, तापमानाशी संबंधित मृत्युदरात दर एक लाख लोकांमागे ५५ मृत्यूंची वाढ होण्याचा अंदाज आहे. तो एचआयव्ही/एड्सच्या सध्याच्या मृत्युदराच्या बरोबरीचा आहे, तर कुवैतमध्ये दर एक लाख लोकांमागे २५ अतिरिक्त मृत्यूंचा अंदाज आहे, जो हृदयविकाराच्या सध्याच्या मृत्यूदराच्या निम्म्यापेक्षा कमी आहे. (वृत्तसंस्था)

### पाकिस्तानात होऊ शकतात एक तृतीयांश मृत्यू

जगभरातील शहरांमधील एक लाखांहून अधिक रहिवाशांचा वाढत्या तापमानामुळे मृत्यू होऊ शकतो आणि यापैकी एक तृतीयांश मृत्यू पाकिस्तानी शहरांमध्ये होतील. हवामानाचे परिणाम देशानुसार वेगवेगळे असतात. अमेरिकेत, उत्तरेकडील राज्यांमध्ये आणि रॉकी पर्वतरांगांमध्ये मृत्यूंची संख्या कमी होऊ शकते, तर दक्षिणेकडील भागात मृत्युदर वाढण्याचा धोका आहे, असे अहवालात दिसून येते.

## मणिपूरमध्ये बंडखोरांना अटक

**◆ इम्फाळ, २७ मार्च**

मणिपूरच्या इम्फाळ पूर्व जिल्ह्यात प्रतिबंधित पीपल्स लिबरेशन आर्मीच्या एका कार्यकर्त्याला अटक केली, अशी माहिती पोलिसांनी शुक्रवारी दिली.

या बंडखोराला गुरुवारी खुरई अंगोम लेकाई भागातील त्याच्या निवासस्थानातून अटक करण्यात आली, असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. चुराचंदपूर जिल्ह्यातून एका सशस्त्र संघटनेच्या सदस्यालाही अटक करण्यात आली असून, त्याच्या ताब्यातून ९ एमएम व्यासाचे पिस्तूल आणि मॅग्झिन जप्त करण्यात आले आहे. केंद्र आणि राज्य सरकार या दोघांसोबत कारवाई स्थगिती करारावर स्वाक्षरी करणाऱ्या कुकी नॅशनल फ्रंट या संघटनेच्या एका सक्रिय सदस्याला बुधवारी चुराचंदपूर जिल्ह्यातील तुईबोंग भागातून अटक करण्यात आली. (वृत्तसंस्था)

### सिद्धू मुसेवालाचे गाणे लवकरच होणार प्रदर्शित

**लुधियाना :** दिवंगत पंजाबी गायक सुखदीपसिंग सिद्धू मुसेवालाच्या ‘बरोटा’ या गाण्याच्या यशानंतर लवकरच आणखी एक गाणे प्रदर्शित होणार आहे. याची माहिती सिद्धू मुसेवाला यांच्या इन्स्टाग्राम पेजवर देण्यात आली. याव्यतिरिक्त, ‘बरोटा’ला पसंती दिल्याबद्दल चाहत्यांचे आभारही मानण्यात आले आहेत. सुमारे तीन महिन्यांपूर्वी प्रदर्शित झालेल्या ‘बरोटा’ गाण्याने नवीन विक्रम रचले आहेत. युट्यूबवर हे गाणे १० कोटींहून अधिक लोकांनी पाहिले आहे, तर यावर एक कोटींहून अधिक लोकांनी कमेंट्सही केल्या आहेत. कमेंट्सच्या बाबतीत हे गाणे जगात दुसऱ्या स्थानावर पोहोचले आहे. सिद्धू मुसेवालाच्या मृत्यूनंतर सुमारे १२ गाणी प्रदर्शित झाली आहेत.



CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# या उदासीनतेवर उपाय काय?

कोणत्याही सामाजिक समस्यांच्या सोडवणुकीसाठी सरकारने जेवढे सजग असावे लागते, तेवढीच सतर्कता समाजानेही बाळगावयास हवी. म्हणजे, सरकार आणि समाज यांनी सामूहिकपणे समस्यांचा सामना केल्यास त्या लवकर सोडविणे शक्य होत असते, अन्यथा अनेक समस्या दीर्घकाळापासून समाजाच्या मानगुटीवर ठाण मांडून बसून राहतात. आजकाल समस्यांचा एवढा डोंगर समोर उभा ठाकला आहे की, कोणत्या समस्येस अगोदर सामोरे जावे आणि कोणती समस्या सोपी करण्यास प्राधान्य द्यावे याचाच संभ्रम सर्वत्र माजलेला दिसतो. एखादी जुनाट, दीर्घकाळापासून सतावणारी समस्या सोडविण्याच्या दृष्टीने समाज व सरकार यांनी समंजसपणे काही पावले टाकण्यास सुरुवात करावी तोवर त्याहूनही उग्र अशी नवीच समस्या समोर उभी राहते आणि जुन्या समस्येची सोडवणूक करण्याचे प्राधान्यच मागे पडून जाते. गेल्या तीन दशकांहून अधिक काळ महाराष्ट्राच्या दुर्गम भागांतील आदिवासी समाजाबरोबरच आता शहरी भागांतही भेडसावणारी कुपोषण आणि बालमृत्यूची समस्या सोडविण्याचे आजवरचे सारे प्रयत्न पूर्वीच यशस्वी झाले असते. या समस्येची पाळेमुळे कोठे रुजली आहेत, याची सरकारांना आणि समाजासही नेमकी जाणीव आहे. कोणत्या उपायांमुळे ती उपटून काढता येतील यावरही आजवर बराच खल झाला असून काही उपाय हाती लागलेले आहेत. पण तरीही, ही समस्या कमी न होता दिवसेंदिवस उग्र होताना दिसत असल्याने नव्या समस्यांमध्ये गुरफटत असतानाही या जुन्या समस्येचा विळखा सोडविता येत नसल्याची स्थिती निर्माण झाली आहे. आता केवळ विदर्भातील मेळघाटासारख्या आदिवासी भागातच नव्हे, तर शहरी भागातही, विशेषतः मुंबईसारख्या प्रगत, अत्याधुनिक आणि विकसित महानगरातील कुपोषणासारख्या समस्येचा विळखा पडल्याचे विविध पाहणी अहवालांतून स्पष्ट झाल्याने कुपोषण-बालमृत्यूसारख्या कोवळ्या जिवांचा घास घेणाऱ्या समस्येचा सामना करण्यास सर्वोच्च प्राधान्य द्यावेच लागेल, अशी अपरिहार्य स्थिती निर्माण झाली आहे. म्हणूनच या समस्येची याआधीही वारंवार दखल घेऊन त्यावर तीव्र चिंता व्यक्त करणाऱ्या न्यायालयाने आता पुन्हा या समस्येत लक्ष घातले ही बाब स्वागतार्ह ठरते.


मेळघाट आणि परिसरात कुपोषणामुळे बालकांच्या, गर्भवती महिलांच्या किंवा स्तनदा मातांच्या मृत्यूंचा मुद्दा महाराष्ट्राच्या मानगुटीवरून दूर होत नसल्याबद्दल मुंबई उच्च न्यायालयाने गुरुवारी तीव्र चिंता व्यक्त केली. ही समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत न्यायालयाने गेल्या तीन दशकांत अनेक आदेश दिले, वेगवेगळ्या उपायांचा अवलंब करण्याच्या अनेक सूचना सरकारांना दिल्या, परंतु न्यायालयाच्या आदेश आणि हस्तक्षेपानंतरही ही समस्या कायम राहिली ही प्रगत महाराष्ट्राची शोकांतिका आहे, अशी खंत व्यक्त करताना न्यायालयाने मांडलेल्या मुद्याचे गांभीर्य लक्षात घ्यावयास हवे. मेळघाटातील ही समस्या सोडविण्यासाठी अनेक सामाजिक संस्था-संघटना आणि व्यक्तींचे समूह सातत्याने प्रयत्न करीत असतात. सरकारी धोरणांची जबाबदारीपूर्वक अंमलबजावणी व्हावी यासाठी पाठपुरावा सुरू असतो. म्हणजे या समस्येबाबत समाज पुरेसा सतर्क आहे, हे स्पष्ट झाले आहे; किंबहुना गेल्या तीन दशकांपासून या समस्येकडे सातत्याने सरकारचे लक्ष वेधण्याचे काम समाजाने समंजसपणे पार पाडलेले आहे. त्यामुळेच उपाययोजनांबाबतची धोरणे आखणे सरकारला भाग पडलेले आहे. असे असतानाही त्यांची अंमलबजावणी करण्यात जर उदासीनता दिसत असेल, तर त्याबाबत समाजाने सरकारी यंत्रणेस जाब विचारावयास हवा. सरकार सजग असूनही यंत्रणा मात्र सुस्त असतील, तर सरकारी धोरणे केवळ कागदावरच राहतात आणि ती प्रभावी असूनही त्याचे परिणाम मात्र शून्यच राहतात याचे याहून अन्य वेगळे बोलके उदाहरण महाराष्ट्रासमोर नसावे. तशा अन्य अनेक समस्याही केवळ अशाच कारणांमुळे कायमच्या रेंगाळत असल्याचेही स्पष्ट झालेले आहे. शेतकऱ्यांच्या समस्या ही अशीच एक समस्या आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसमोर समस्यांचा डोंगर उभा का राहिला, याची कारणे एव्हाना पुरेशी स्पष्ट झालेली आहेत. त्यावर कर्जमुक्ती हा कायमचा तोडगा नाही, तर शेतीस पूरक व्यवसायांसाठी शेतकऱ्यास प्रोत्साहन देणे हा एक पर्याय ठरू शकतो. त्यासाठी काही धोरणे अस्तित्वात आहेत. पण त्याच्या अंमलबजावणीचा मुद्दा ऐरणीवर येतो, तेव्हा अनेक शेतकरी अशा योजनांच्या लाभापर्यंत पोहोचत नाहीत, असेच उत्तर समोर येते. बालमृत्यू आणि कुपोषणाच्या समस्येसही असेच काही कारण असावे. अशा समस्या सोडविण्यासाठी गरजेचे असलेल्या आर्थिक स्रोतांची राज्याकडे वाणवा असती, तर सक्षमीकरणाच्या उद्देशाने राबविल्या जाणाऱ्या योजनांचा अनाठायी लाभ उकळणाऱ्या प्रवृत्तींना लगाम घालण्याऐवजी तेथे तिजोरीची तोंडे उघडी करणे सरकारांना शक्य झाले नसते. एका बाजूला अशा योजनांमध्ये अनेक अपात्र लाभार्थी घुसखोरी करून सरकारच्या योजनेचा लाभ घेत आहेत तर दुसरीकडे गरजवंत असंख्य गरीब कुटुंबांना उपजीविकेच्या पुरेशा साधनांच्या अभावी कुपोषणासारख्या समस्येचा दीर्घकाळ सामना करावा लागत आहे, हे विषम सामाजिक चित्र सजग सरकारला आणि सतर्क समाजाला विषण्ण करणारे आहे.

महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यासमोर कुपोषण आणि बालमृत्यू हे एक गंभीर आणि जुनाट आव्हान आहे. विदर्भाच्या आदिवासी परिसरातील मेळघाट असो किंवा मुंबईसारख्या महानगरातील झोपडपट्ट्या असोत, कुपोषणाचे स्वरूप वेगळे असले, तरी त्याची सामाजिक दाहकता सारखीच आहे. अमरावती जिल्ह्यातील मेळघाटातील धारणी आणि चिखलदरा हे तालुके गेल्या तीन दशकांपासून कुपोषण व बालमृत्यूच्या समस्येने ग्रासलेले आहेत. आजही या भागांत आरोग्य सुविधांचा अभाव दिसतो. अंधश्रद्धांच्या आहारी गेलेल्या समाजास त्यापासून मुक्त करण्यासाठी मोहिमा राबविण्याच्या प्रयत्नांत सरकारी यंत्रणा उदासीन असल्याची खंत सामाजिक संस्था-संघटना आणि या क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींकडून व्यक्त केली जाते तर मुंबईतील झोपडपट्ट्यांतील अस्वच्छता, शुद्ध पाण्याचा अभाव, स्थलांतरितांच्या कुटुंबांची आर्थिक विपन्नावस्था अशी अनेक कारणे शहरी कुपोषणाची समस्या उग्र करतात. अशा समस्या सोडविण्यासाठी सरकारी यंत्रणांचा परस्परांत आणि समाजातील सजग घटकांसोबत समन्वय असणे गरजेचे असते. सरकारी योजनांचा लाभ समस्याग्रस्तांपर्यंत पोहोचविण्यासाठी हा समन्वय आवश्यक आहे. मात्र, त्याचाच अभाव असल्याचा आरोप यंत्रणांवर केला जातो. खोटी आकडेवारी देऊन वास्तव लपविण्याचा प्रयत्न झाल्यास गरजवंतांपर्यंत योजनांचे लाभ पोहोचत नाहीत, असाही आक्षेप घेतला जातो. त्यामुळे कुपोषण व बालमृत्यू ही केवळ आरोग्याची समस्या नसून ती सामाजिक समस्या आहे. ते आर्थिक विषमतेचे लक्षण आहे. सरकारी आकडेवारीपेक्षा या समस्येचे वास्तव अधिक भीषण आहे, असे ९० च्या दशकातील अभ्यासातूनच उघड झाले, तेव्हा समाज आणि सरकारही हादरले होते. गेल्या वर्षभरात मेळघाटात ४०० हून अधिक बालमृत्यूंची नोंद झाली आहे. मात्र, जन्मतःच मृत असलेल्या अर्भकांची संख्या मोजल्यास हा आकडा त्याहूनही जास्त असू शकतो, असे म्हटले जाते. मुंबईच्या गोवंडी, मानखुर्दसारख्या उपनगरांत बालमृत्यूंचा दर तर केरळसारख्या राज्यांच्या तुलनेतही अधिक आहे. येथील कुपोषणाचे कारणे ही अन्नाच्या अभावापुरती मर्यादित नाहीत तर अस्वच्छता आणि संसर्गजन्य आजारांशीही निगडित असल्याचे स्पष्ट झाले आहे. आजवर शेकडो कोटी रुपये खर्च करूनही या समस्येचे कायमचे निराकरण का होत नाही, याचे कारण केवळ अंमलबजावणीच्या उदासीनतेतच दडलेले असेल, तर त्यावर कठोर उपाययोजना व्हावयास हव्यात. पंतप्रधानपदाचा कार्यभार हाती घेताना नरेंद्र मोदी यांनी सरकारी कर्मचाऱ्यांना उद्देशून एक इशारा दिला होता. 'कार्यक्षमता दाखवा, नाही तर पायउतार व्हा' असे त्यांनी तेव्हा बजावले होते. सरकारी कर्मचाऱ्यांना त्या इशाऱ्याचा इतक्यात विसर पडला असेल, तर त्याची जाणीव सतर्क समाजाने करून द्यावयास हवी.

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# हतबल उद्धव ठाकरे



महाराष्ट्राच्या विशेषतः मुंबईच्या राजकारणात एकेकाळी निर्विवाद वर्चस्व गाजवणाऱ्या शिवसेनेला सध्या अनेक आघाड्यांवर आव्हानांचा सामना करावा लागत आहे. पक्षांतर्गत असंतोष आणि मोठ्या नेत्यांमधील वाद यामुळे हा गट एका कडीण टप्प्यातून जात असल्याचे चित्र आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या निधनानंतर उद्धव ठाकरे यांनी पक्षाची धुरा सांभाळली; मात्र गेल्या काही वर्षांतील घडामोडींनी पक्षाचे भवितव्य अनिश्चिततेच्या गर्तेत ढकलले आहे.

ठाकरे गटातील अंतर्गत अस्वस्थता अलिकडच्या काळात अधिकच स्पष्ट झाली आहे. विशेषतः आदित्य ठाकरे आणि पक्षाचे मुखपत्र 'सामना'चे कार्यकारी संपादक संजय राऊत यांच्यातील वाद सध्या चर्चेचा विषय बनला आहे. ठाकरे गटाच्या खासदारांच्या बैठकीत हा वाद विकोपाला गेल्याचे वृत्त आहे. राज्यसभेच्या एका जागेसाठी संजय राऊत यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांचे नाव सुचवल्याने आदित्य ठाकरे संतप्त झाले होते.

सूत्रांच्या माहितीनुसार, आदित्य ठाकरे यांनी राऊतांना थेट इशारा दिला की, '२०२८ ला तुम्ही खासदार म्हणून दिसणार नाहीत.' सोशल मीडियामध्ये तर या बैठकीत 'हायव्होल्टेज ड्रामा' झाल्याचे आणि आदित्य ठाकरे यांनी संजय राऊत यांची कॉलर पकडल्याचे दावे केले आहेत. खरे-खोटे माहीत नाही; पण तणाव प्रचंड वाढला आहे एवढे निश्चित. भाजप प्रवक्ते नवनाथ बन यांनीही या घटनेचा उल्लेख केला आहे. या घटनेमुळे ठाकरे गटातील निर्णय प्रक्रियेवर आणि नेतृत्वावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. संजय राऊत हे उद्धव ठाकरे यांचे निकटवर्तीय मानले जातात आणि पक्षाच्या धोरणात्मक निर्णयात त्यांचा महत्त्वाचा सहभाग असतो. अशा परिस्थितीत आदित्य ठाकरे यांच्यासारख्या युवा नेत्याने राऊतांना दिलेला इशारा हा पक्षातील वाढत्या मतभेदांचे द्योतक आहे. त्याचबरोबर एकनाथ शिंदे ऑपरेशन टायगर राबवून उबाठा गट फोडणार असल्याच्या चर्चेने उबाठा गटात अस्वस्थता आहे. उबाठा नेत्यांचे म्हणणे आहे की, उद्धव ठाकरे प्रकृतीमुळे महाराष्ट्राचा दौरा करू शकत नाहीत, पण आदित्य ठाकरे तरुण आणि सशक्त आहेत; मग ते का बाहेर पडत नाहीत? खरं तर या प्रश्नाचं उत्तर अगदी सोपं आहे. आदित्य ठाकरेंना वाटतं की, शिवसेना ही त्यांची खाजगी कंपनी आहे, जी आजोबांनी उभारली होती आणि आता वारसा हक्काने ते कंपनीचे मालक आहेत. बाकीचे नेते नोकर आहेत. कार्यकर्त्यांबद्दल त्यांच्या मनात कोणती भावना असेल, याची कल्पनाही करवत नाही. मग नोकर मालकांसाठी झटणार की मालक नोकरांसाठी झटणार? उद्धव ठाकरेंचा स्वभाव कोणालाही न भेटण्याचा आहे. याचा समाचार नीलम गोऱ्हे यांनी घेतला आहे. उद्धव ठाकरे कामे करत नाहीत, कोणाला भेटत नाहीत हे त्यांच्यापासून दूर गेलेले आणि आता दूर जाऊ पाहणारे सगळेच लोक म्हणत आहेत. विशेष म्हणजे पक्ष फुटल्यानंतरही त्यांनी त्यांच्या कार्यात बदल केलेला नाही, ही खंतही गोऱ्हे यांनी व्यक्त केली आहे.

राज्यसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर प्रियांका चतुर्वेदी यांची नाराजीही समोर आली आहे. चतुर्वेदी या ठाकरे गटाकडून राज्यसभेच्या उमेदवारीसाठी इच्छुक होत्या; मात्र संजय राऊत यांनी शरद पवार यांचे नाव सुचवल्याने त्यांची संधी हुकली. संजय राऊत यांनी यावर स्पष्टीकरण देताना म्हटले आहे की, ठाकरे गटाकडे पुरेसे संख्याबळ नसल्यामुळे प्रियांका चतुर्वेदी यांना पुन्हा उमेदवारी देणे शक्य नव्हते आणि महाविकास आघाडीतील समन्वयासाठी शरद पवार यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेण्यात आला. या घटनेमुळे महाविकास आघाडीतील घटक पक्षांमधील जागावाटपाचा गुंता आणि ठाकरे गटातील नेत्यांच्या अपेक्षांचा संघर्ष समोर आला. तसेच, महाविकास आघाडीतील प्रत्येक घटक पक्षाला आपल्या नेत्यांना संधी देण्याची इच्छा असल्याने भविष्यातही अशा प्रकारचे वाद निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

उद्धव ठाकरे यांच्या राजकीय प्रवासात देवेंद्र फडणवीस यांच्यासोबतचे त्यांचे संबंध नेहमीच चर्चेचा विषय राहिले आहेत. २०१७ च्या मुंबई महानगर पालिका निवडणुकीत शिवसेना आणि भाजपा स्वतंत्रपणे लढले होते. या निवडणुकीत शिवसेनेला ८४ जागा मिळाल्या होत्या, तर भाजपाने ८२ जागा जिंकून शिवसेनेला कडवी टक्कर दिली होती. त्यावेळी भाजपाने काही अपक्षांच्या मदतीने मुंबई महानगर पालिकेत सत्ता स्थापन करणे सहज शक्य होते. तसेही देवेंद्र फडणवीस संख्याशास्त्राचे जादूगार आहेत. मात्र, देवेंद्र फडणवीस यांनी बाळासाहेब ठाकरे यांच्याबाबतचा आदर आणि उद्धव ठाकरे यांच्यासोबतची मैत्री जपण्यासाठी पालिकेवर दावा ठोकला नाही आणि मुंबई महानगर पालिकेची सत्ता ठाकरेंकडेच राहू दिली. या घटनेचा उल्लेख अनेकदा फडणवीस यांनी केला आहे की, त्यांनी त्यावेळी 'मोठे मन' दाखवले होते. मात्र, २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर उद्धव ठाकरे यांनी भाजपासोबतची युती तोडून राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेससोबत महाविकास आघाडी स्थापन केली आणि मुख्यमंत्रिपद स्वीकारले. त्यांनी भाजपाचा 'विश्वासघात' केला आणि फडणवीस यांचासारखा सच्चा मित्र गमावला. फडणवीस हे यारो के यार म्हणून ओळखले जातात. मित्राच्या चुका पोटात घालणारे, त्यांच्या मागे खंबीरपणे उभे राहणारे फडणवीस उद्धव ठाकरेंना सांभाळून घेत होते. परंतु मुख्यमंत्रिपदाच्या लालसेपोटी त्यांनी चांगला मित्र गमावला आणि पुढे पक्षही गमावला. संजय राऊत, जे जनतेतून कधीच निवडून येऊ शकत नाही, ज्यांना कोणताच जनाधार नाही, जे सतत बोलत असतात, शिव्या घालत असतात, अशांना उद्धव ठाकरेंनी चाणक्य बनवल्यावर पक्षाची वाताहत होणारच होती.

आजच्या घडीला उद्धव ठाकरे गट एका मोठ्या राजकीय संकटातून जात आहे. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील बंडखोरीमुळे पक्षाला मोठे खिंडार पडले, पक्षाचे नाव आणि चिन्हही गमवावे लागले. यामुळे उद्धव ठाकरे यांची राजकीय ताकद मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. देवेंद्र फडणवीस सध्या राज्याचे मुख्यमंत्री आहेत, तर एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री म्हणून कार्यरत आहेत. याउलट, उद्धव ठाकरे यांच्याकडे सध्या कोणतेही महत्त्वाचे पद नाही. ही परिस्थिती ठाकरे पिता-पुत्राने स्वतःच निर्माण केली आहे, अशी टीका विरोधकांकडून सातत्याने केली जाते. बाळासाहेब ठाकरे यांनी मराठी व हिंदुत्वाच्या मुद्यावर शिवसेना उभी केली होती. मात्र, उद्धव ठाकरे यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेससोबत आघाडी केल्याने त्यांच्या पारंपरिक मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. बाळासाहेबांचा वारसा संपुष्टात आणल्याचा आरोपही त्यांच्यावर केला जातो. पक्षातील अंतर्गत वादामुळे कार्यकर्त्यांमध्येही अस्वस्थता वाढली आहे. शिंदे 'ऑपरेशन टायगर' करणार अशा चर्चांमुळे ठाकरे गटातील नेत्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. उद्धव ठाकरे हतबल आहेत; मात्र या हतबलतेचं श्रेय पूर्णपणे त्यांनाच दिले पाहिजे. असो!

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**अनिल उमाकांत फेकरीकर**

# आता पैसे मोजा अन् दुःख सांगा!

कालच्या वेदना सहन करीत उद्याच्या सुखासाठी आज चाललेली जिवाची ओढाताण म्हणजे आयुष्य होय. आज १०० पैकी ९९ जण अशाच स्वरूपाचे जीवन जगत आहेत. परिणामी काही जण दुःखी झाले आहेत. अशा दुःखी लोकांना मन हलके करायचे आहे. त्यांना मनातले काही सांगण्यासाठी विश्वासू ऐकणारे हवे आहेत. पण वर्तमानात तुमचे दुःख ऐकून त्यावर फुंकर घालणारे शोधूनही सापडणार नाहीत. केवळ जखमांवर मीठ चोळणारेच सापडतील. अशा निष्ठूर जगात वावरणाऱ्यांना दिलासा मिळावा म्हणूनच की काय मुंबईत पृथ्वीराज पूनमचंद बोहरा नावाच्या युवकाने 'पैसे मोजा अन् दुःख सांगा' अशी पाटी लावत चौपाटीवर आगळेवेगळे दुकानच थाटले आहे.

राजस्थानात एखाद्या गावात श्रीमंत माणूस मरण पावल्यावर त्याच्या अन्त्यसंस्काराच्या वेळी पैसे देऊन रडणाऱ्या स्त्रियांना बोलावतात. त्यांना 'रुदाली' असे म्हणतात. आज आपली सोडा, पैसे घेऊन रडणारी माणसं काही केल्या मिळत नाहीत. एवढी निष्ठूरता सर्वत्र दिसत असल्याने पृथ्वीराज पूनमचंद बोहरा या युवकाने दुःख ऐकून घेत पोट भरण्याचा नवा व्यवसाय थाटणे थोडे हटकेच म्हणावे लागेल. विशेष म्हणजे पृथ्वीराज बोहरा हेही राजस्थानी असून पदवीधर आहेत. तत्त्वज्ञान विषयात पारंगत पृथ्वीराज विवाहित असून त्यांना कोरोना काळात बऱ्याच अडचणींचा सामना करावा लागला. तेव्हा चारही बाजूंनी दुःखी-पीडितांचा भरणा होता. कुणीही कुणाचे ऐकून घ्यायला तयार नव्हता. आजही तीच परिस्थिती कायम आहे. म्हणूनच की काय, प्रत्येक जण मनातून निराश झाला आहे. निराशा ही कॅन्सरपेक्षाही भयावह असते, असे पृथ्वीराज बोहरा मानतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार १०० पैकी २५ लोक मानसिक आजाराने पीडित आहेत. या स्थितीत आपण काही तरी करायला हवे, असा विचार पृथ्वीराज बोहरा यांच्या मनात आला. त्यानंतर आपले दुःख ऐकतो, तुम्ही पैसे मोजा, असा नवा फॉर्म्यूलाच पृथ्वीराजने व्यवसायातून समोर आणला. दुःख ऐकणे हा व्यवसाय असला तरी यातून त्यांची समाजसेवाही महत्त्वपूर्ण मानायला हवी. ते केवळ दुःख ऐकत नाही, तर पीडितांना मार्गदर्शन करून त्यांच्या आयुष्यात रंगत आणतात. वाईट गोष्टीतूनही रोजगार निर्मिती होऊ शकते, हेही त्यांनी दाखवून दिले. जिथे दोन घास प्रेमाने खाता येतील अशी पंगत आणि हक्काने मन मोकळं करता येईल अशी संगत आयुष्यात लाभली तर जगण्यातली रंगत वाढत जाते. दुर्दैवाने आज कौटुंबिक संवाद संपलेला आहे. सर्व जण मोबाईलच्या चक्रव्यूहात अडकले आहेत. रीलच्या चक्करमध्ये रीअल लाईफ लोक विसरले आहेत. आईला मुलांचे ऐकायला वेळ नाही. वडिलांची व्यथा ऐकण्याची मुला-मुलींची तयारी नाही. मित्रही रोज भेटतात, पण संवाद न साधता घरी जातात. कार्यालयात आपल्या दुःखी सहकाऱ्याला समजून घेण्याची कुणाचीही इच्छा नाही; उलट ते त्याच्या चुका काढून 'खबरीलाल' बनण्यातच धन्यता मानतात. या सर्व कारणांमुळे कुणाचे दुःख उमगतच नाही. तसे पाहता आपल्या लोकांनी केलेली विचारपूस औषधालाही मागे टाकत असते. आज कुणीही कोणाची विचारपूस करीत नाही. लोक म्हणतात माणसाची सही आणि स्वभाव बदलत नाही. परंतु बोटाला जखम झाली तर सही बदलते. मनाला जखम झाल्यावर स्वभावही बदलतो. असाच प्रकार समाजात वाढलेला आहे. याच कारणाने दुःख जाणून घेणारे नामशेष होत आहेत. समजा एखाद्याने दुःख जाणून घेतले तर तो त्यावर फुंकर घालण्यापेक्षा मीठ चोळून माणुसकीला काळिमा फासतो. परिणामी दुःखी-पीडित अधिकच संकटात सापडून निराश होऊन आत्महत्येचा मार्ग पत्करतो. समजा आत्महत्या करण्याचे धाडस न झाल्यास मधुमेह, रक्तदाब, हृदयविकार, कॅन्सरसारख्या जीवघेण्या आजारांना बळी पडतो. वैद्यकीय उपचारांमुळे त्याची अर्थव्यवस्था डबघाईस जाते अन् तो जिवंतपणीच मरणयातना भोगतो. एवढे सर्व प्रकार मन हलके न झाल्याने होतात. पण समजा पृथ्वीराजने पैसे घेऊन का असेना कुणाचे दुःख, वेदना समजून घेत त्यावर फुंकर घातल्यास नक्कीच त्याचे मन हलके होते. त्याच्यात जगण्याची आशा वाढते अन् तो पुन्हा उठून धावायला लागतो. याला आपण सर्वांनी समाजसेवाच म्हणायला हवी. समजा आपल्या कृतीने कुणाच्या आयुष्यात आनंदाचे झाड लागत असेल तर नक्कीच ते सर्वांनी लावावे. एकंदरीत पाहता अश्रूंना वजन नसतं, पण निघाल्यावर मन मात्र हलकं होऊन जातं. त्यानुसार आपण लोकांच्या चेहऱ्यावर हास्य आणले तर ती फार मोठी जनसेवा ठरते. येथूनच देशाच्या प्रगतीचाही आलेख उंचावेल.



९८८१७१७८५९

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# हे तर पुरोगामी भोंदू!

आजच्या काळात एक विचित्र पद्धत समाजात रूढ होत चालली आहे. कोणतेही वादग्रस्त प्रकरण समोर आले की, त्याला लगेच 'भोंदूबाबा' किंवा हिंदुत्वाशी जोडून टाकायचे. मात्र, एखादा मौलाना अडकला तर मात्र 'भोंदू मौलाना' असे कोणी संबोधणार नाही. ही आहे डाव्या विचारांची, पुरोगाम्यांच्या इकोसिस्टिमची पद्धत. विचार करायला वेळच मिळू नये इतक्या तातडीने हॅमरिंगचे कर्तव्य हे लोक चोखपणे बजावतात. जणू काही हा शब्द वापरला की सत्य उघड झाले, दोषी ठरले आणि प्रकरण संपले. सगळे काही हेच लोक ठरवून मोकळे होताना दिसतात. महाराष्ट्रात अशोक खरात प्रकरणात समोर आलेली दिग्गज नावे बघितल्यावर यातील बरेच लोक पुरोगामित्वाचा डंका पिटणारे दिसतात. मग यावर पडदा कसा टाकायचा, तर 'भोंदूबाबा' उचलून धरायचे, व्हायरल व्हिडीओमध्ये देवाची प्रतिमा दिसत असल्यावर लक्ष केंद्रित करायचे आणि त्यावर आक्षेप घ्यायचा. असे विविध फाटे फोडून प्रकरण एखाद्या थोतांडाकडे नेऊन पुरोगाम्यांच्या कृत्यांवर पांघरूण घालण्याचा केविलवाणा प्रयत्न या 'पुरोगामी भोंदूं'नी चालविला आहे. यासंदर्भात लक्षात घेण्याजोगे एक सुभाषित आहे- 'इफ थॉट करप्ट्स लँग्वेज, लँग्वेज कॅन ऑल्सो करप्ट थॉट.' याचा अर्थ असा की, विचार भाषा बिघडवते, पण भाषादेखील विचार बिघडवू शकते. चुकीच्या पद्धतीने चुकीचे विचार कसे पेरले जाऊ शकतात, याचेच उदाहरण आपण या प्रकरणाच्या निमित्ताने बघतो आहोत.

एखादा माणूस चुकीचा निघतो, तेव्हा त्याला ठग म्हणणे, गुन्हेगार म्हणणे, महाठग किंवा अगदी 'भोंदू' म्हणणेदेखील समजून घेता येते; पण त्याला 'बाबा' म्हणणे ही केवळ शब्दांची चूक नसते. ती जाणीवपूर्वक केलेली शाब्दिक चलाखी आहे. या प्रकरणात खरातने स्वतःला कुठेही बाबा संबोधलेले नाही. तसा पेहरावदेखील त्याने केलेला नाही. अत्यंत नीटनेटका आणि सुटाबुटात वावरणारा खरात स्वतःला कॅप्टन संबोधतो. असे असताना 'भोंदू पुरोगाम्यांची' इकोसिस्टिम तो शब्द वापरून संशयाची सावली दाट करते. कारण बाबा या शब्दामागे एक वेगळी परंपरा आहे. या शब्दाचे एक वेगळे स्थान आहे. त्या शब्दात श्रद्धा आहे, अध्यात्म आहे, संस्कार आहेत आणि हे सगळे थेट कोणत्या समुदायाशी जोडले जाते, हे या इकोसिस्टिमला ठाऊक आहे. त्याचाच फायदा घेत संभ्रम निर्माण करून आपले झाकून ठेवणे आणि दुसऱ्याला बदनाम करण्याचा हेतू साध्य करण्यात हे 'भोंदू पुरोगामी' यशस्वी होतात.

अशोक खरात ही व्यक्ती भजन-कीर्तन करणारी नाही, प्रवचन देणारी नाही, अध्यात्म शिकवणारी नाही. ती लोकांच्या श्रद्धेवर नव्हे, तर त्यांच्या भीतीवर आणि स्वार्थावर आपले काम करीत आहे. मग ती व्यक्ती बाबा कशी, हा प्रश्न कुणी विचारत नाही. कारण तो विचारणे कठीण आहे. त्यापेक्षा अशांना भोंदू बाबा म्हणणे सोपं आहे. एका इकोसिस्टिमने ते प्रचलित केलेले असल्यामुळे इतर लोकही कुठलाही विचार न करता त्याच विशेषणाचा सरसकट वापर करताना दिसतात.

खरे पाहिले तर खरातच्या जाळ्यात अडकणारे लोक कोण आहेत, हा प्रश्न जास्त महत्त्वाचा आहे. हे लोक गोरगरीब, भाबडे, अशिक्षित आहेत का...? की ते सत्तेच्या जवळचे, पैशाच्या बळावर जगणारे, स्वतःच्या फायद्यासाठी काहीही करायला तयार असलेले लोक आहेत...? उत्तर आपल्याला ठाऊक आहे. मात्र, त्याचा ऊहापोह होऊ न देण्यासाठी यंत्रणा कामी लागली आहे आणि त्या यंत्रणेच्या शब्दच्छलात भोळाभाबडा सामान्य माणूस सापडतो आहे. त्या बिचाऱ्याला त्यामागच्या षडयंत्राची जाणीव होण्यासाठी विचार करण्याची संधीच मिळत नाही. माध्यमांमध्येही हा शब्द सहजपणे वापरला जातो. कारण तो 'भोंदू पुरोगाम्यांनी' तसा हॅमर केला आहे. पण, त्या शब्दामागे किती मोठा अर्थ लपलेला आहे, याचा विचार केला जात नाही. समाजात काही लोक स्वतःला पुरोगामी म्हणवतात, धर्मावर टीका करतात, परंपरेवर प्रश्न उपस्थित करतात. पण, तेच अशा प्रकारात अडकतात तेव्हा मात्र त्यांचे पितळ उघडे पडते. मग त्यावर पांघरूण घालण्यासाठी चाललेली त्यांची धडपड केविलवाणी असते.

### शिक्षित की अशिक्षित


आपण नेहमी एक सोपी आणि सरधोपट मांडणी करतो. अंधश्रद्धा ही अशिक्षितपणातून जन्माला येते आणि ती मुख्यतः ग्रामीण, आदिवासी, दलित किंवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांत फोफावते. शिक्षण मिळाले की माणूस विवेकी होतो, तो प्रश्न विचारायला शिकतो आणि अशा गोष्टींपासून दूर राहतो, हा एक सर्वमान्य समज समाजात घट्ट बसलेला आहे. पण अलिकडच्या गाजलेल्या अशोक खरात प्रकरणाकडे नीट पाहिले, तर हा समज केवळ अपुरा नाही तर भ्रामक असल्याचे स्पष्ट होतं. कारण या प्रकरणातील कथित खरातग्रस्त लोक पारंपरिक अर्थाने अंधश्रद्धेचे बळी नाहीत. इथे कुठेही तळागाळातील, भाबड्या, अशिक्षित लोकांची रांग दिसत नाही. उलट या प्रकरणांमध्ये नावे येतात ती उच्चशिक्षित, प्रभावशाली, आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि समाजात मानमरातब असलेल्या लोकांची. ते निर्णयक्षमता असलेले, धोरण ठरवणारे, इतरांना मार्गदर्शन करणारे लोक आहेत. तेच जर अशा जाळ्यात अडकताना दिसले, तर मग अंधश्रद्धेचे मूळ नेमके कुठे आहे, हा प्रश्न अधिक गंभीर होतो.

अशोक खरात प्रकरणाने पहिल्यांदा डोके वर काढले तेव्हा सुरुवातीला समाजात एकच प्रतिक्रिया होती- आणखी एक भोंदू बाबा. पण जसजशी माहिती बाहेर येत गेली, तसतसे लक्षात आलं की, इथे खेळ काही वेगळाच आहे. इथे श्रद्धा नव्हती, इथे भक्ती नव्हती. इथे होती एक अदृश्य भीती, एक लोभ, सत्तेच्या जवळ राहण्याची किंवा स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवण्याची धडपड. आणि ही धडपड करणारे लोक कोण होते? तेच होते- जे स्वतःला सुशिक्षित, प्रगत, विवेकी म्हणवतात. आपण ज्या गोरगरीब, ग्रामीण, आदिवासी किंवा दलित समाजावर अंधश्रद्धेचा ठपका ठेवतो, त्यांचे वास्तव वेगळं आहे. त्यांच्यासाठी श्रद्धा ही जगण्याचा आधार असते, ती त्यांची मानसिक ताकद असते. ते देवाकडे वळतात. कारण त्यांच्याकडे पर्याय कमी असतात. पण ते स्वतःच्या सन्मानाला सहजपणे तडा जाऊ देत नाहीत. त्यांच्यासाठी इज्जत ही अजूनही काचेप्रमाणे नाजूक आणि जपण्यासारखी असते. उच्चभ्रू, सुशिक्षित वर्गाची मानसिकता वेगळी आहे, हे खरात प्रकरणाने उघड केले आहे. चौकशीत आणखी काय ते बाहेर येईल. सध्या एवढेच म्हणता येते की, खरातने जे काही केले, ते अनैतिकच आहे. फक्त त्याला 'बाबा' हे विशेषण लावून पुरोगामी मंडळींना काही तरी वेगळे सूचित करायचे असते, हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

९२७०३३३८८६

### ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व हरपले

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या निधनामुळे इतिहास संशोधन क्षेत्रातील एक ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व हरपले आहे. त्यांच्या जाण्याने शिवचरित्र आणि मराठा इतिहासाचा वस्तुनिष्ठ अभ्यास करणारा व्यासंगी संशोधक गमावल्याची भावना व्यक्त होत आहे. डॉ. पवार यांनी आयुष्यभर महाराष्ट्राचा गौरवशाली इतिहास दस्तऐवजांच्या आधारे अभ्यासून तो समाजासमोर मांडला. छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते क्रांतिसिंह नाना पाटील यांसारख्या महान व्यक्तिमत्त्वांचा त्यांनी वास्तववादी वेध घेतला. त्यांच्या लेखणीत सत्याचा आग्रह आणि अभ्यासाची खोली होती. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या वैचारिक जडणघडणीत मोठी हानी झाली आहे. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.



**विश्वनाथ पंडित**/ठाणे

### विमान प्रवास किती सुरक्षित?

दिल्लीवरून लंडनला निघालेलं विमान तांत्रिक बिघाडामुळे सात तास आकाशात भरकटून पुन्हा दिल्ली विमानतळावर उतरले. विमान सौदी अरबच्या हवाई क्षेत्रात असताना विमानात तांत्रिक बिघाड दिसू लागला. आज विमान क्षेत्रात एवढा हलगर्जीपणा झाला आहे की, विमान प्रवास करताना आता कोणीही जीव मुठीत घेऊनच प्रवास करीत आहे. हेलिकॉप्टर्स अनेक वेळा पडतात, ती शिकाऊ असतात. त्याचं काही वाटत नाही, परंतु ज्यावेळी मोठ्या विमानात तांत्रिक बिघाड होतो किंवा अपघात होतात त्यावेळी सुरक्षिततेबाबत विचार करावा लागतो. ज्यावेळी असा प्रवास तांत्रिक बिघडण्याचा असू शकतो त्यावेळी प्रवाशांची काय हालत होत असेल, याचा विचार केलाय का कधी? एवढं नक्की की, विमानांच्या सुरक्षिततेबाबत नेहमीच संशय व्यक्त केला जात आहे.

**शिरीष बने**/मुंबई, ९२२४२९९२३०

## वाचक पत्रे

### महाप्रसाद आणि अन्नाची नासाडी

रामनवमी-हनुमान जयंती उत्सवाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर महाप्रसादाचे वाटप केले जात असते. लग्न, रिसेप्शन, महाप्रसाद या ठिकाणी आपण जातो तेव्हा प्रत्येकाने स्वतःपुरते हेच ठरवावे की, मी अन्नाचा एकही कण पानात टाकणार नाही. मला हवे तेवढेच वाढून घेईन. परंतु चित्र उलटे दिसते. अशा वेळी दुसऱ्या दिवशी बऱ्याच प्लेट्समध्ये अन्न टाकलेले आढळून येते. गजानन महाराजांनी गजानन विजय ग्रंथात पहिल्याच अध्यायात मोठी शिकवण दिली आहे. स्वतः उष्ट्या पत्रावळीतील अन्न शोधन करून एक एक कण वेचून खात होते. त्यातून त्यांना आपल्याला हीच शिकवण द्यायची आहे की, अन्न हे पूर्णब्रह्म आहे. त्याचा एकही कण वाया जाऊ देऊ नये. जेव्हा आपण कुठल्याही महाप्रसादाला जातो तेव्हा फार मोठे अन्न लोकांनी पानात टाकलेले दिसून येते. व्यवस्थापक वारंवार याबाबत सूचना करीत असतात. तरीदेखील याकडे दुर्लक्ष करताना दिसतात. ही गोष्ट फक्त महाप्रसाद किंवा कार्यप्रसंगीच अमलात आणावी असे नाही तर रोजच्या दैनंदिन जीवनातही स्वतःपुरती पक्की ठरवावी.

**स्नेहल खंडागळे** /नागपूर

### लग्नसोहळा एक इव्हेंट होतोय

ग्रामीण भागात असलेली एकत्र कुटुंब पद्धती आता नामशेष होताना दिसत आहे. त्यामुळे भावकीचा विचार संपल्यागत झाला आहे. ग्रामीण भागात पूर्वी जे लग्न सोहळे चार-पाच दिवस चालायचे ते आता एकाच दिवसात शहरातल्या एखाद्या मंगल कार्यालयात होऊ लागले आहेत. 'माझ्या घरासमोरच्या अंगणातच मंडप टाकणार, अंगण पुरले नाहीतर संपूर्ण शेतात मंडप टाकणार; पण लग्न माझ्या घरासमोर वा शेतातच होणार' हा जुन्याजाणत्या मंडळींचा तोरा संपुष्टात आला आहे. लोक लग्न सोहळे मंगल कार्यालयात उरकू लागले आहेत. मंगल कार्यालयांत अगदी स्वागतासाठीदेखील माणसे पैसे देऊन भाड्याने मिळू लागली. हवे तेवढे पैसे मोजून घरातील मुलीचे-मुलांचे लग्न मोठ्या थाटात करण्याच्या उद्देशाने गरीब माणूस आणखीनच कर्जाच्या ओझ्याखाली जाऊ लागला. ऋण काढून सण साजरा करण्याच्या प्रकारांत ग्रामीण भागात वाढ होऊ लागली. कार्यालयाचे भाडे, हुंडा, मानपान, मिरवणूक, लग्नबस्ता, सोने आदींचे बाजारीकरण झाले. ग्रामीण भागातील लग्नाची पद्धत बदलत चालल्याने वयोवृद्धांमध्ये खंत व्यक्त केली जात आहे. लग्न म्हणजे दोन घराण्यांचा आनंद सोहळा असतो. अनेक इव्हेंट मॅनेजमेंट कंपन्या यासाठीचे व्यवस्थापन करतात. यासाठी वर-वधूकडील मंडळी लागेल तेवढा पैसे खर्च करतात. लग्न जर संध्याकाळी असेल तर दुपारच्या वेळेत आलेल्या पाहुण्यांच्या मनोरंजनासाठी गाण्यांचा कार्यक्रम ठेवला जातो. लग्नाला गर्दी दिसावी यासाठी सेलिब्रिटींनाही आमंत्रित केले जाते. एकूणच आताच्या लग्न सोहळ्याला इव्हेंटचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

**ॲड. रूपाली हिरवे**/पुणे, ९७६६४०५१२५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

## महत्वाचे...



### श्री सिध्देश्वर पेठ नवरात्र महोत्सव चौक मंडळातर्फे रामजन्मोत्सव साजरा

**सोलापूर, दि. २७ मार्च-**

येथील श्री सिद्धेश्वर पेठ नवरात्र महोत्सव चौक मंडळाच्या वतीने श्रीराम जन्मोत्सव साजरा करण्यात आला. श्रीराम जय राम जय जय राम असा जयघोष ऐकायला मिळाला. दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. यावेळी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार सरवसे, ट्रस्टी सचिव शंतनु गायकवाड, रवी साखरे, पृथ्वी सुरवसे, गणेश अंजीखाने, विठ्ठल वाघमोडे, अशिष टेळे, गणेश लोखडे, अध्यक्ष राहुल वाघमोडे, अभिषेक धडे, राम वाघमोडे, शाम वाघमोडे, रणदिवे उपस्थित होते. मंडळाच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मनोज फुलारी, संजय जाधव, नितीन वाघमोडे, ओंकार रणदिवे, निलेश चोपडे, अमोल जाधव, निलेश मोठे आदींनी परिश्रम घेतले.




### दमाणी नगरात रामनवमी निमित्त पाणपोईचे उद्घाटन

**सोलापूर, दि. २७ मार्च-**

शहरातील दमाणी नगर येथील विठ्ठल मंदिर परिसरात रामनवमी चे औचित्य साधत गवळी वस्ती तालीम संघाच्या वतीने पाणपोई उभारण्यात आली. ही पाणपोई नगरसेविका मृण्मयी महादेव गवळी यांच्या संकल्पनेतून साकारण्यात आली आहे. पाणपोईचे उद्घाटन नगरसेवक गणेश वानकर, नगरसेविका मृण्मयी गवळी, सोनाली गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला महादेव गवळी, औदुंबर जगताप, अर्जुन गायकवाड, बाळासाहेब घुले, संतोष मोरे, जगदीश भोसले, सुनील कदम, लखन कारंडे, ईश्वर हिरे, संदीप काशीद, विष्णू जगताप, अविनाश सुरवसे, प्रशांत साळुंखे, शेखर कवठेकर उपस्थित होते.

### न.प.सांगोलाचा कर भरणा ३१ मार्चपूर्वी करा

**सांगोला, दि.२७ मार्च -**

सांगोला नगरपरिषद हद्दीतील नागरिकांनी मालमत्ता कर, गाळा भाडे व पाणीपट्टीची संपूर्ण रक्कम दि.३१ मार्च पूर्वी वेळेत भरून नगरपरिषदेस सहकार्य करावे असे आवाहन मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांनी केले आहे. नगरपरिषदेकडून थकबाकीदार गाळेधारकांचे गाळे सील करणे, मालमत्ता व पाणीपट्टी थकबाकीदारांचे नळ कनेक्शन कट करण्याची कारवाई करणेत येत आहे. २७ मार्चपर्यंत एकत्रित मालमत्ता कर ३ कोटी ३१ लाख रुपये वसूल तर ३ कोटी २२ लाख रुपये थकीत वसूल बाकी आहे. पाणीपुरवठा विभागाकडील पाणीपट्टीची वसुली १६८.३५ लाख इतकी आहे. अजून १ कोटी १६ लाख रुपये वसूल बाकी आहे. गाळा भाडे ६२ लाख वसुली झालेली आहे अशी माहिती कार्यालयीन अधीक्षक सचिन पाडे यांनी दिली.

# मंगळवेढा-मरवडे मार्गालगत पोलिस अधिक्षक पथकाची जुगार अड्ड्यावर धाड, १८ लाखांचा मुद्देमाल जप्त

## स्थानिक पोलीसांची अवैध धंद्याकडे डोळेझाक होत असल्याने नागरिकातून संताप

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. २७ मार्च -**

मंगळवेढा ते मरवडे रोडवर तळसंगी हद्दीत एका हॉटेलच्या पाठीमागे पत्र्याच्या शेडमध्ये चालणाऱ्या जुगार अड्ड्यावर जिल्हा पोलीस अधिक्षक यांच्या पथकाने छापा टाकून १८ लाख ४ हजार १७५ रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन १८ जणाविरुध्द गुन्हे दाखल झाले आहेत.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,मंगळवेढा-मरवडे रोडवर असलेल्या प्रिया हॉटेलच्या पाठीमागे शेतात जुगार अड्डा चालू असल्याची गोपनीय माहिती पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांना मिळताच त्यांनी यातील फिर्यादी पोलीस निरीक्षक (वाचक शाखा) देवीदास करंडे यांच्यासह पथकाला दि.२६ रोजी पाठवून ४.१० वाजता सदर ठिकाणी पोलीसांनी छापा टाकला त्यावेळी वरील सर्व आरोपी गोलाकार बसून ५२ पानाच्या पत्त्यावर तिरट नावाचा जुगार खेळताना मिळून आले. सदरचा जुगार अड्डा नवनाथ दंडवते,अनिल डांगे,विष्णुपंत वाकडे हे चालवत असल्याचे जागेचे मालक गवळी (रा.भालेवाडी) सार्वजनिक जुगारचा अड्डा चालविण्याकरिता उपलब्ध करुन दिला आहे म्हणून नवनाथ दंडवते (शनिवार पेठ,मंगळवेढा),गणेश गवळी (भालेवाडी),बापू खराडे (शनिवार पेठ,वडरगल्ली,मंगळवेढा), अनिल डांगे,विष्णूपंत वाकडे यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून अन्य ११ ते १२ अनोळखी इसम ही यामध्ये सहभागी असल्याचे म्हटले आहे.

या छाप्यामध्ये मोबाईल,मोटर सायकली,जुगार साहित्य आदींचा समावेश आहे. याचा अधिक तपास पोलीस हवालदार मनोज खंडागळे हे करीत आहेत. दरम्यान मंगळवेढ्यात डीवायएसपी दर्जाचे एक अधिकारी,पोलीस निरीक्षक दर्जाचे एक,सहाय्यक पोलीस निरीक्षक दर्जाचे दोन,पोलीस उपनिरीक्षक दर्जाचे तीन असे एकूण अधिकाऱ्यांची संख्या असताना हा जुगार अड्डा कसा काय चालू होता असा संतापजनक सवाल तज्ञ मंडळींनी केला आहे. यापुर्वीही पंढरपूर येथील महिला आयपीएस अधिकारी यांनीही धाड टाकली होती. अजूनही तो अड्डा सुरु असल्याने पोलीसांच्या कर्तव्यावरच शंका व्यक्त केली जात आहे. ज्यांच्या हद्दीत दोन नंबर धंदे आढळतील त्यांना जबाबदार धरुन त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

# बोराळे येथे चोरट्यांनी दोन घरफोड्या करुन ९९ हजाराचा मुद्देमाल नेला चोरुन

## चोरीची मालिका संपता संपेना, नागरिकांचा जीव लागला टांगणीला

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा दि. २७ मार्च -**

बोराळे येथे दोघांच्या घराचे कुलूप व कडी कोयंडा तोडून चोरट्याने कपाटात ठेवलेले सोन्याचे दागीने रोख रक्कम असा एकूण ९९ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरुन नेण्याचा प्रकार घडला असून या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुध्द पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान मंगळवेढा शहरात झालेल्या चोरीतील चोरटे पकडण्यात पोलीसांना यश आले नसताना बोराळे येथे पुन्हा चोरीचा प्रकार घडल्याने चोरटे शिरजोर झाल्याच्या प्रतिक्रीया नागरिकामधून व्यक्त होत आहेत.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी गोकर्ण पाटील (रा.बोराळे) व शशिकांत लंगोटे या दोघांची घरे दि.२५ रोजी मध्यरात्री अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप कडी कोयंडा तोडून घरात प्रवेश करुन लोखंडी गोदरेज कपाटात ठेवलेले सोने,रोख रक्कम,चांदीचे दागीने असा एकूण ९९ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल लबाडीने चोरुन नेला असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. दरम्यान माणिक म्हमाणे यांच्या बंद घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश करुन घरातील साहित्य अस्ताव्यस्त केले असून काही एक चोरीस गेले नाही,फक्त चोरीचा प्रयत्न झाल्याचे तक्रारीत नमूद केले आहे. याचा अधिक तपास पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे करीत आहेत.

# पंढरपूर-शेगाव नवीन रेल्वेमार्ग मंजूर करा

## खा. ओमराजे निंबाळकर यांची लोकसभेत मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २७ मार्च-**

धाराशिव लोकसभेचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी लोकसभेत अत्यंत महत्त्वाचा आणि जनतेच्या जिव्हाळ्याचा प्रश्न प्रभावीपणे उपस्थित करत पंढरपूर-शेगाव नवीन रेल्वेमार्ग मंजूर करण्याची जोरदार मागणी केली.

सोलापूर, धाराशिव आणि बुलढाणा या तीन जिल्ह्यांच्या दृष्टीने हा रेल्वेमार्ग अत्यंत महत्त्वाचा असून, तो महाराष्ट्रातील लाखो भाविकांच्या श्रद्धेशी निगडित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

लोकसभेत बोलताना खासदार निंबाळकर यांनी नमूद केले की, पंढरपूर विठ्ठल-रुक्मिणी मंदिर आणि शेगाव गजानन महाराज मंदिर ही महाराष्ट्रातील दोन प्रमुख तीर्थक्षेत्रे असून, येथे दरवर्षी कोट्यवधी भाविक दर्शनासाठी येतात. मात्र, या दोन्ही तीर्थक्षेत्रांना थेट रेल्वेने जोडणारा मार्ग नसल्याने भाविकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. प्रस्तावित रेल्वेमार्ग पूर्ण झाल्यास प्रवास अधिक सुलभ, जलद आणि सुरक्षित होईल, मराठवाडा विदर्भ व पश्चिम महाराष्ट्र रेल्वे मार्गाने थेट जोडला जाईल. ज्याचा फायदा सामान्य नागरिक आणि भाविकांना होणार आहे.

या मार्गामुळे व्यापार, उद्योग, शेती माल वाहतूक आणि रोजगाराच्या संधींना चालना मिळणार असून, या मागास भागाच्या विकासाला नवी गती मिळेल, असे त्यांनी सांगितले. तसेच, धाराशिव जिल्ह्यातील भूम आणि परंडा तालुक्यातील नागरिकांनी या रेल्वेमार्गासाठी अनेक वर्षांपासून सातत्याने लढा दिला आहे.

'रेल्वे संघर्ष समिती'च्या माध्यमातून जनतेने वेळोवेळी आंदोलने, निवेदने आणि पाठपुरावा करून ही मागणी जिवंत ठेवली आहे. या भागातील जनभावना अत्यंत तीव्र असून, सरकारने याची गांभीर्याने दखल घ्यावी, असे त्यांनी स्पष्ट केले.

# अध्यापनात 'एआय'चा वापर काळाची गरज

## सुभाष माने; माध्यमिक मुख्याध्यापक व तंत्रस्नेही शिक्षकांची कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मार्च-**

बदलत्या शैक्षणिक प्रवाहात तंत्रज्ञानाची सांगड घालणे अत्यावश्यक असून, कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर शिक्षकांनी आपल्या अध्यापनात करणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे माजी अध्यक्ष सुभाष माने यांनी केले.



सोलापूर शहर माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ, जितेश वस्तू भांडार डड्झ संचलित नवनीत ट्रेडर्स, सोलापूर, जिल्हा परिषद माध्यमिक विभाग आणि महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात शहरातील मुख्याध्यापक व तंत्रस्नेही शिक्षकांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्याच्या उद्घाटनप्रसंगी सुभाष माने बोलत होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून निरंतर शिक्षणाधिकारी सुलभा वठारे, नियंत्रण समितीचे सचिव रंगसिद्ध दसाडे, प्राचार्य महेश सरवदे, रविशंकर कुंभार, शहर मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष दत्तात्रेय गाजरे, सचिव विद्यानंद स्वामी, विद्या सचिव डॉ. श्रीपाद सुरवसे, नवनीत ट्रेडर्सचे मयूर शहा आदी मान्यवर उपस्थित होते. याशिवाय शहरातील विविध शाळांमधील १०२ मुख्याध्यापक आणि २१० तंत्रस्नेही शिक्षकांनी कार्यशाळेत सहभाग नोंदवला.

कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात प्रा. डॉ. गणेश मुडेगावकर यांनी 'अध्यापनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर' या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात प्रतीक मुनोत यांनी तंत्रज्ञानामुळे अध्यापन प्रक्रिया कशी सोपी व परिणामकारक होऊ शकते याचे प्रात्यक्षिक सादर केले. शेवटच्या सत्रात प्रा. डॉ. इसाक मुजावर यांनी 'ऑफिस ते वर्ग' या विषयावर मार्गदर्शन केले.

कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी शहर मुख्याध्यापक संघाचे इरफान शेख, इस्माईल शेख, राम ढाले, कार्तिक चव्हाण तसेच सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिव विद्यानंद स्वामी यांनी केले.

# महिला व बालकल्याण समिती सभापतीपदी ॲड. अमृता वाघे यांची निवड

**टेंभुर्णी, दि. २७ मार्च-**



जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी ॲड. अमृता वाघे यांची निवड झाली आहे. स्मृतीशेष कृष्णात दादा बोबडे यांच्या सामाजिक व राजकीय विचारांचा वारसा योगेश कृष्णात बोबडे व सुरजा योगेश बोबडे यांच्या मार्गदर्शनाखाली ॲड. वाघे यांनी सभापती पदाकडे आगेकूच केली आहे. ग्रामीण भागातील महिला, बालक आणि कुटुंबांच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस योजना राबवण्यावर भर दिला जाईल असे ॲड. वाघे यांनी आपले मत व्यक्त केले.

# किशोरावस्था, कर्करोग, लिंगभेद, थॅलेसेमिया याविषयी कार्यशाळा




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मार्च-**

फॅमली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा आणि इंडियन रेडक्रॉस सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने स्प्रिंट ह्युमॅनिटेरियन प्रकल्पांतर्गत डोलसंट सेक्शुअलिटी अँड रिप्रोडक्टिव हेल्थ इन इमर्जन्सी अर्थात आपत्ती व्यवस्थापनात किशोरवयीनांचे प्रजनन आरोग्य या विषयावर युवावर्गासाठी एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. ही कार्यशाळा श्रीमती गोपाबाई दमाणी रक्त संकलन केंद्राच्या सेमिनार हॉलमध्ये पार पडली.

कार्यशाळेचे उद्घाटन सोलापूर महानगरपालिका आरोग्य विभागाच्या ब्युरो इंचार्ज डॉ. मंजिरी कुलकर्णी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर होते.

व्यासपीठावर एफ.पी.ए.आय. सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, माजी अध्यक्षा प्रा. डॉ. नभा काकडे, इंडियन रेड क्रॉस सोसायटी सोलापूर शाखेचे चेअरमन डॉ. राजीव प्रधान, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी प्रा. वर्षा बंदिचोडे, तसेच युवा प्रतिनिधी ऐश्वर्या सावंत, साक्षी सर्वगोड, सृष्टी सर्वगोड आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. मंजिरी कुलकर्णी यांनी किशोरावस्था, कर्करोग प्रतिबंधासाठी एचपीव्ही लसीकरण व त्याविषयीचे गैरसमज यावर माहिती दिली. प्रा. डॉ. नभा काकडे यांनी लिंगभेद आधारित हिंसाचार या विषयावर प्रकाश टाकला. सुगतरत्न गायकवाड यांनी एचआयव्ही/एड्स विषयी माहिती दिली, तर वीरेंद्र परदेशी यांनी आपत्ती व्यवस्थापन आणि किशोरवयीन प्रजनन आरोग्य यातील परस्परसंबंध स्पष्ट केले. दमाणी रक्त संकलन केंद्राच्या जनसंपर्क अधिकारी अमरजा थिटे यांनी सीपीआर व प्रथमोपचाराचे प्रात्यक्षिक दिले. सोमपा अग्निशमन केंद्राचे अधिकारी समीर पाटील यांनी अग्निशमन व आपत्तीच्या वेळी युवकांची भूमिका यावर मार्गदर्शन केले. तसेच संगीता कोरे यांनी थॅलेसेमिया या विषयावर माहिती दिली.




# श्रीशैलम येथील महाअन्नदासोहचा समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मार्च-**

श्री सिद्धेश्वर सेवा संस्था सोलापूर यांच्या वतीने श्री क्षेत्र श्रीशैलम येथे दि. १४ ते १९ मार्च या कालावधीत आंध्र, कर्नाटक, महाराष्ट्र, तेलंगणा व गुजरात या राज्यातून येणाऱ्या शिवभक्तांना रोज दहा हजार भक्तांना महाप्रसाद वाटप करण्यात येते.

हजारो वर्षापासून ग्रामदेवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर महाराज आणि गुरु कपिल सिद्ध मल्लिकार्जुन महाराज यांची गुरु शिष्य या नात्याची ओळख येणाऱ्या काळात युवकांना व्हावे याच उद्दिष्टांने सोलापुरातील ५० युवक गेले दहा दिवस श्रीक्षेत्र श्रीशैलम येथे महाअन्नदासोह मध्ये सेवा बजावत असतात हा उपक्रम गेल्या दहा वर्षापासून सातत्याने अखंडितपणे या ठिकाणी सुरू आहे.

शुक्रवारी शिवानुभव मंगल कार्यालय येथे महा अन्नदासोह ची समाप्ती व महापूजा शहर उत्तरचे आमदार विजयकुमार देशमुख ग्रामदैवत सिद्धरामेश्वर महाराजांच्या यात्रेचे प्रमुख मानकरी राजशेखर हिरेहब्बू, मार्केट यार्डातील भाजीपाल्याचे उद्योजक भीमाशंकर झुरळे, नागनाथ बडुरे, सराफ उद्योजक भीमाशंकर करजगीकर, नगरसेवक शिवानंद पाटील, माजी नगरसेवक जगदीश पाटील, निलेश धाराशिवकर यांच्या शुभहस्ते ग्रामदैवत सिद्धरामेश्वर महाराजांच्या प्रतिमेचे महापूजन करून तब्बल तीन हजार शिवभक्तांना महाप्रसाद वाटप करण्यात आले.

**दि सासवड माजी शुगर फॅक्टरी लि. माळीनगर**
**रजि. ऑफिस माळीनगर, जि. सोलापूर**

भागधारकाचे नांव व गहाळ झालेल्या इक्वीटी शेअर्सची संख्या व नंबर्स

**कै. विजयराव कोंडीराम बोरावके**

| | | |
|---|---|---|
| १०: २११९८ ते २१९२०७ | ०२: २७६९७ ते २७६९८ | ०३: २२६७५ ते २२६७७ |
| ०१: ३३०४४ ते ३३०४४ | ०७: २४५५१ ते २४५५७ | १४: ६९२४९ ते ६९२६२ |
| ०५: २६२०४ ते २६२०८ | | २०: १०३८६३ ते १०३८८२ |

वरील शेअर्सचे मूळ शेअर सर्टिफिकेट झाल्याने नवीन (डुप्लिकेट) शेअर सर्टिफिकेट मिळणेबाबत वर नमूद भागधारकाच्या वारसांचा कंपनीकडे अर्ज आला आहे. सदरहू हेअर सर्टिफिकेट कोणाच्या हाती लागल्यास अगर ते त्यांनी म्हणजे सदरहू भागधारकाने कोणास गहाण, बेचन अगर तबदिल करुन दिल्यामुळे वगैरे कारणामुळे त्यावर कोणाचा हक्क, असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसांचे आत आमचेकडे दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि., माळीनगर, जि. सोलापूर या पत्त्यावर कळवावे, त्याप्रमाणे वरील मुदतीत कोणी काही न कळविल्यास मूळ शेअर सर्टिफिकेट ऐवजी डुप्लिकेट सर्टिफिकेट देणेबाबतचा निर्णय घेण्यात येईल व मग त्याबद्दल कोणतीही तक्रार चालणार नाही.

माळीनगर
ता. २४ मार्च २०२६

**दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि., करिता**
**गणेश ज्ञा. इनामके**
**मॅनेजिंग डायरेक्टर**

**जाहीरनामा**

दि. कि. अर्ज नंबर ०९/२०२६
निशाण नंबर - ७

**माढा येथील मे. सि. ज. ज्यु. डी. साहेब यांचे कोर्टात**
**(मा. श्री. ए.डी. कुलकर्णी साहेब कोर्ट)**

**श्रीमती पद्मीनी मोहन मस्के** -- **अर्जदार**
**विरुध्द**
**कोणी नाही** -- **सा.वाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार हे मौजे कोर्टी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर येथील रहिवासी असुन यातील अर्जदार यांनी त्यांचे मयत वडील बाबु महादेव उर्फ माधव खंडाळे यांचे नावे असणारे मौजे घोटी ता. माढा येथील जमीन गट नंबर २९५ व ३०७ या जमीनीवर त्यांचे वारस नोंद व्हावी म्हणून गाव कामगार तलाठी यांचेकडे विनंती केली होती परंतु संबंधीत गाव कामगार तलाठी यांनी यातील अर्जदार यांना ते मयत बाबु महादेव उर्फ माधव खंडाळे यांचे वारस असलेबाबतचे वारसप्रमाणपत्राची मागणी अर्जदार यांचेकडे केलेली आहे त्यामुळे यातील अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज हा वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने असे कळविण्यात येते की, जर अर्जदार हे मयत वडील बाबु महादेव उर्फ माधव खंडाळे यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणाचे म्हणणे असल्यास अथवा इतर कोणी वारस असल्यास त्यांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासुन पुढील १ महिन्यात अथवा वरिल अर्जाचे कामी नेमलेली तारीख १७/०४/२०२६ रोजी सकाळी ११ वाजता वरिल अर्जाचे कामी आपली कायदेशीर हरकत कागदोपत्री पुराव्यानिशी दाखल करावी. वरिल तारखेस मुदतीत कोणाची काही हरकत आली नाही तर वरिल वडील बाबु महादेव उर्फ माधव खंडाळे यांचे वारसाबाबत कोणाचेही काही हरकत नाही असे समजुन सदर अर्जदार हे मयत वडील बाबु महादेव उर्फ माधव खंडाळे यांचे कायदेशीर वारसदार आहेत असे वारस प्रमाणपत्र अर्जात नमुद केलेल्या कारणासाठी त्यांचे नावे व हक्कांत दिले जाईल त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत या प्रकरणी विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

हे जाहीर प्रसिध्दीकरण माझी सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली असे.
तारीख- २७/०३/२०२६

**सही/-**
**क. लिपीक**
**दि.न्या.क. स्तर माढा**

शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**दि. न्या.क. स्तर माढा**

**अक्कलकोट नगरपरिषद अक्कलकोट**

जा.क्र. २०२६/न.प.अ. कोट/बांधकाम-११/ संकलन-१/कावि-१२५१
दिनांक. २७/०३/२०२६

**जाहीर ई निविदा प्रसिध्दीकरण सन-२०२५-२६**

अक्कलकोट नगरपरिषदेने दलित्तेर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत तसेच लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत विविध विकास कामे करणे करिता तमाम सरकार मान्य मक्तेदार/संस्था यांचेकडून ऑनलाईन ई निविदा मागविण्यात येत आहेत. सदर कामाचे ई निविदा संबंधित सर्व प्रसिध्दीचा सविस्तर तपशील माहिती अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळ वर पहावयास मिळतील.

**सही/-**
**(रमाकांत डाके)**
**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद अक्कलकोट**

**जाहीर प्रसिध्दीकरण**

पुढील नेमली ता १७/४/२०२६
मृत्यु अर्ज नं. २४/२०२५

**बार्शी येथील मे. तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात**

**रामहरी महादेव गांधले** वय ५० वर्षे,
धंदा-शेती, रा. जोतीबाचीवाडी, ता. बार्शी -- अर्जदार
जि. सोलापूर
**विरुध्द**
ग्रामपंचायत जोतीबाचीवाडी. ता. बार्शी -- सा.वाला

ज्याअर्थी अर्जदार यांची आई सिताबाई महादेव गांधले यांचा मृत्यु दि.०२/०७/२०२३ रोजी व वडिल महादेव शेकु गांधले यांचा मृत्यु दि.२९/०५/२०१९ रोजी त्याचे राहते घरी जोतीबाचीवाडी येथे झालेला आहे.

सदर आई व वडिल हे अर्जदाराकडे राहण्यास होते व ते जोतीबाचीवाडी येथेच घरीच ती मयत झालेली आहे. अर्जदाराने त्याचे सदर मृत्यूची नोंद रितसर सा.वाला ग्रामपंचायतीचे जन्म मृत्यू रजिष्टरला करावी परंतु अर्जदाराचे कुटुंबातील व्यक्तीचे अडाणीपणामुळे सदर मृत्यूची नोंद सा.वाला ग्रामपंचायतीचे जन्म मृत्यूचे रजिष्टरला केली गेली नाही परंतु हल्ली अर्जदाराला त्याचे कायदेशीर अडचणीचे निवारणाकरीता त्याचे आई व वडिलाचे मृत्यूचे दाखल्याची गरज भासलेने अर्जदाराने सा.वाला ग्रामपंचायतीकडे अर्ज केला तेंव्हा तेथील अधिकाऱ्यांनी जन्म मृत्यूचे रजिस्टरची तपासणी करुन अर्जदाराचे आई व वडिलाचे मृत्यूची नोंद करण्यात आली नाही असे पत्र देवून कळविले. आई सिताबाई महादेव गांधले यांचा मृत्यु दि.०२/०७/२०२३ रोजी व वडिल महादेव शेकु गांधले यांचा मृत्यु दि.२९/०५/२०१९ रोजी मयत झाली असलेने त्यांचे मृत्यूची सा.वाला ग्रामपंचायतीचे जन्ममृत्यू रजिष्टरला करणेबाबत त्यांना मे. कोर्टाचे जरुर ते आदेश व्हावेत असे कथन करुन अर्जदारानी हल्लीचा अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, वर नमूद अर्जदाराच्या अर्जातील मागणी व विधानासंबंधाने जर कोणाचे कांही आक्षेप असतील तर संबंधीतानी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाले पासून ३० दिवसाचे आत वा पुढील नेमले तारीखेस मे. कोर्टात स्वतः वा माहितगार ॲडव्होकेट मार्फत हजर होवून आपले हरकती, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. अन्यथा मुदतीनंतर मे. कोर्टाचे पुढील हुकूम होतील.

हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे. ता. १७/०३/२०२६

**सही/-**
**तहसीलदार**
**तहसील कार्यालय. बार्शी**






# आरसीबीचे लक्ष पुन्हा विजेतेपदाकडे

◆ **बंगळुरू, २७ मार्च**

एका अभूतपूर्व शोकांतिकेनंतर पुन्हा सावरण्याचा प्रयत्न करणारे गतविजेते, आपले हरवलेले गतवैभव पुन्हा मिळवण्याच्या ध्येयाने प्रेरित झालेले दिग्गज संघ, आपले अस्तित्व सिद्ध करण्यासाठी धडपडणारे दोन महान खेळाडू व आपली छाप पाडण्यासाठी उत्सुक असलेले अनेक नवोदित खेळाडू शनिवारी सुरू होणाऱ्या २०२६ आयपीएल स्पर्धेत पुढील दोन महिन्यांत क्रिकेटप्रेमींना अनेक रोमांचक क्षण अनुभवण्याची संधी देणार आहे.

शनिवारी १९ व्या आयपीएल स्पर्धेचा सलामीचा सामना एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर यजमान व गतविजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू व सनरायझर्स हैदराबाद यांच्यादरम्यान खेळला जाणार आहे.

आयपीएलच्या १९ व्या हंगामात यजमान आरसीबीला अधिक थाटामाटात व दिमाखात प्रवेश करायला आवडले असते. परंतु, या सामन्याभोवती सध्या एक गंभीर आणि शोकाकुल वातावरण पसरले आहे; कारण ४ जून रोजी संघाच्या विजेतेपदाच्या जल्लोषादरम्यान स्टेडियमबाहेर झालेल्या चेंगराचेंगरीत ज्या ११ चाहत्यांना आपला जीव गमवावा लागला होता, त्यांच्या आठवणींचीच या सामन्याच्या पूर्वतयारीवर व वातावरणावर प्रकर्षाने छाप दिसून येत आहे.



बंगळुरू येथील एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर सराव सत्रादरम्यान आरसीबीचा कर्णधार रजत पाटीदार (मध्यभागी), विराट कोहली (डावीकडे) आणि जेकब बेथेल

### सराव सत्रात खेळाडू परिधान करणार ११ क्रमांकाची जर्सी

कर्नाटक राज्य क्रिकेट संघटना व आयपीएल व्यवस्थापनानेही त्या दुर्दैवी जीवांच्या स्मृती जिवंत ठेवण्यासाठी काही विशेष पावले उचलली आहेत.आयपीएलने स्टेडियममध्ये ११ जागा कायमस्वरूपी रिकाम्या ठेवण्याची घोषणा केली आहे. खुद्द स्टेडियमलाही आयपीएल सामने आयोजित करण्यासाठी राज्य सरकारच्या संबंधित विभागांकडून आवश्यक परवानग्या मिळविण्यापूर्वी काही महिने अनिश्चिततेच्या काळातून जावे लागले होते. आरसीबीचे खेळाडू पहिल्या सामन्याच्या दिवशी होणाऱ्या सराव सत्रादरम्यान, आपल्या जर्सीच्या पाठीमागे ११ हा क्रमांक छापलेली जर्सी परिधान करतील. आरसीबी व सनरायझर्स हैदराबाद या दोन्ही संघात महत्त्वाचे खेळाडू उपलब्ध नाहीत, त्यामुळे दोन्ही संघांची गोलंदाजीची फळी सध्या काहीशी कमकुवत पडत आहे.

### आरसीबीला हेझलवुड, यश दयालची उणीव भासणार

आरसीबी संघाला त्यांचा अत्यंत अचूक गोलंदाजीसाठी प्रसिद्ध असलेला गोलंदाज जोश हेझलवूड व डावखुरा वेगवान गोलंदाज यश दयाल यांच्याशिवाय खेळावे लागेल. या दोन्ही खेळाडूंनी २०२५ मधील संघाच्या विजेतेपदाच्या मोहिमेत अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली होती; परंतु विविध कारणांमुळे ते या वर्षीच्या हंगामात अनुपस्थित राहणार आहेत. हेझलवूड सध्या ऑस्ट्रेलियामध्ये आपल्या दुखापतीतून सावरण्याची प्रक्रिया पूर्ण करत असून, तो कदाचित स्पर्धेच्या पुढील टप्प्यात संघात सहभागी होऊ शकेल. दुसरीकडे, लैंगिक शोषणाचे आरोप असलेल्या यश दयालला मात्र या संपूर्ण हंगामातून बाहेरच राहावे लागेल.



हैदराबादचा हंगामी कर्णधार ईशान किशन

त्यांना अनुभवी वेगवान गोलंदाज भुवनेश्वर कुमार, फिरकीपटू कृणाल पांड्या, सुयश शर्मा व डावखुरा वेगवान गोलंदाज मंगेश यादव यांच्यावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून राहावे लागेल.

**आज पहिला सामना**
**रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू वि. सनरायझर्स हैदराबाद**
**स्थळ** : एम. चिन्नास्वामी स्टेडियम, बंगळुरू
**वेळ** : सायं. ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

सनरायझर्स हैदराबादला किमान सुरुवातीच्या टप्प्यात तरी त्यांचा कर्णधार पॅट कमिन्सच्या अनुपस्थितीत खेळावे लागेल. ईशान किशनची हंगामी कर्णधार म्हणून निवड करण्यात आली आहे.

परंतु त्यांचे पर्यायी खेळाडू फारसा आत्मविश्वास निर्माण करत नाहीत. ब्रायडन कार्स, जयदेव उनाडकट, हर्षल पटेल व हर्ष दुबेला सपाट खेळपट्ट्यांवर फलंदाजांकडून कडाक्याच्या आव्हानाचा सामना करावा लागू शकतो. दोन्ही संघ आपल्या गोलंदाजीतील उणिवा फलंदाजीच्या जोरावर भरून काढण्याची आशा बाळगून असतील. आरसीबीच्या संघात विराट कोहली, टीम डेव्हिड, फिल सॉल्ट, जेकब बेथेल, कर्णधार रजत पाटीदार व रोमारियो शेफर्ड यांसारखे दिग्गज खेळाडू आहेत; तर हैदराबादकडून ट्रॅव्हिस हेड, अभिषेक शर्मा, किशन व हेनरिक क्लासेन यांच्या माध्यमातून त्यांना चोख प्रत्युत्तर दिले जाऊ शकते. ◀(वृत्तसंस्था)

# चेन्नई, कोलकाता, मुंबई गतवैभव मिळविण्यास उत्सुक

◆ **मुंबई, २७ मार्च**

मुंबई इंडियन्स, चेन्नई सुपर किंग्ज व कोलकाता नाईट रायडर्स या तीन संघांनी मिळून आतापर्यंत १३ विजेतेपदे पटकावली आहेत. परंतु, गत हंगामात या संघांना मोठा संघर्ष करावा लागला होता.



मुंबई इंडियन्सला चौथ्या क्रमांकावर राहून प्ले-ऑफमध्ये स्थान मिळवण्यात यश आले होते; परंतु त्यावेळी त्यांची कामगिरी केवळ कशीबशी निभाव लावणारी होती हे स्पष्टपणे दिसून येत होते. त्यामुळे, पाच वेळा विजेतेपद पटकावणाऱ्या मुंबई इंडियन्स संघाला साजेसा असा दमदार खेळ या हंगामात नक्कीच करून दाखवण्याचा त्यांचा प्रयत्न असेल. केकेआर आणि सीएसके हे संघ अनुक्रमे आठव्या व दहाव्या क्रमांकावर राहिले होते. या दोन्ही संघांनी आपल्या संघरचनेत मोठे फेरबदल केले आहेत. सीएसकेने राजस्थान रॉयल्सकडून संजू सॅमसनला आपल्या संघात घेतले असून, मॅट हेनरी व नूर अहमदचाही समावेश केला आहे. सीएसकेला महेंद्र सिंह धोनीकडून एका शेवटच्या दमदार खेळीची अपेक्षा असेल; धोनीने आपल्या कारकिर्दीच्या भविष्याबाबतचे रहस्य मात्र अजूनही कायम ठेवले आहे.

केकेआरने टीम सेफर्ट, फिन ॲलन, रचिन रवींद्र व कॅमेरॉन ग्रीन यांच्या समावेशाद्वारे आपल्या फलंदाजीला अधिक बळकटी दिली आहे. विशेष म्हणजे, कॅमेरॉन ग्रीन हा आयपीएलच्या इतिहासातील परदेशी खेळाडूंमध्ये सर्वाधिक मानधन मिळवणारा खेळाडू ठरला आहे.



केकेआरचा कर्णधार अजिंक्य रहाणे हा संघाच्या वरच्या फळीला एकसंध राखणारा दुवा ठरेल; तर त्याचा उपकर्णधार रिंकू सिंग याला फिनिशरची भूमिका पार पाडावी लागेल. २०१४ पासून गत वर्षी निवृत्त होईपर्यंत आंद्रे रसेलने या संघासाठी फिनीशरची भूमिका यशस्वीपणे निभावली होती.

गोलंदाजीच्या बाबतीत वरुण चक्रवर्ती व सुनील नरेनच्या रूपाने त्यांच्याकडे दोन हुकमी एक्के आहेत; मात्र, त्यांची वेगवान गोलंदाजीची फळी ही चिंतेची बाब ठरली आहे. राजस्थान रॉयल्स आणि गुजरात टायटन्स आपल्या शिरपेचात आणखी एका विजेतेपदाचा तुरा खोवण्याच्या प्रयत्नात असतील, तर दिल्ली कॅपिटल्स, पंजाब किंग्स आणि लखनौ सुपर जायण्ट्स आपल्या पहिल्या विजेतेपदाच्या शोधात असतील. ◀(वृत्तसंस्था)



इम्तियाज अत्तार



प्रेम राठोड

## इंडियन मॉडेल पॅरेंट्स क्रिकेट स्पर्धेत समर्थ, गुलमोहोरचे विजय

**सोलापूर, दि. २७ मार्च-**

श्री अरुणोदय मल्टिस्टेट को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. प्रायोजित रेल्वे मैदानावर सुरु असलेल्या इंडियन मॉडेल पॅरेंट्स क्रिकेट लीग सिझन-१६ स्पर्धेत समर्थ इलेव्हन संघाने टायगर्स संघावर ६६ धावांनी मात केली. दुसऱ्या सामन्यात गुलमोहर संघाने व्ही.जी. ग्रुपवर ३१ धावांनी हरविले. इम्तियाज अत्तार व प्रेम राठोड सामन्याचा मानकरी ठरला. **संक्षिप्त धावफलक :** समर्थ : १२ षटकात ३ बाद १४२ (इम्तियाज आत्तार ४८, रवी माने नाबाद ४७, सचिन गारमपल्ली १७, एकनाथ शिंदे १५, बबलू वळसंगे, उमाशंकर जवळेकर व सागर कुंभार प्रत्येकी १ बळी) वि. वि. टायगर्स : १२ षटकात ८ बाद ७६ (सागर कुंभार २२, लक्ष्मण कावळे २२, मुस्तफा खैराटकर १३, महेश कंदी ३-८, अब्दुल काझी २-१४, इन्तियाज आत्तार २-८). गुलमोहरः १२ षटकात ६ बाद १११ (प्रेम राठोड नाबाद ४६, काशीनाथ कोळी २४, आनंद बबलेश्वर २३, अन्वर शेख २-१५) वि. वि. व्ही.जी. ग्रुप :१२ षटकात ८ बाद ८० (जुबेर तांबोळी २७, विकी खलानी १७, आनंद बबलेश्वर २-११. संदीप व्हटकर २-१७).





## अनंत झोडगे व सृष्टी गवळीची विद्यापीठ संघात निवड

**बार्शी, दि. २७ मार्च-**

श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शीच्या अनंत झोडगे व सृष्टी गवळी यांची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या खो-खो संघात निवड झाली आहे. अनंत हा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे २ ते ६ एप्रिल दरम्यान होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत सहभागी होईल. या संघाचे सराव शिबीर सुशीलकुमार शिंदे शारीरिक शिक्षण महाविद्यालय येथे डॉ. शिवानंद तोरवी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे. सृष्टी हिही २ ते ६ एप्रिल या कालावधीत अवधेश प्रतापसिंह विद्यापीठ, रेवा (मध्य प्रदेश) येथे होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत भाग घेतील. तिचे सराव शिबीर कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी येथे डॉ. सुभाष मारकड यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव पी. टी. पाटील, सहसचिव अरुण देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, प्राचार्य डॉ. ए. बी. शेख, प्रबंधक प्रमोद जाधव, संतोष कवडे यांनी अभिनंदन केले. या खेळाडूंना डॉ. हरिदास बारसकर, डॉ. विजयानंद निंबाळकर, डॉ.रामहरी नागटिळक, प्रा. संजय पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.




## राष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेत बार्शीच्या राजवर्धन तिवारीला रौप्य

**सोलापूर, दि. २७ मार्च-**

बार्शीच्या राजवर्धन तिवारीने गांधीधाम गुजरात येथे झालेल्या राष्ट्रीय मानांकित टेबल टेनिस स्पर्धेत रौप्य पदक पटकाविले. राजवर्धनने अंतिम सामन्यात पश्चिम बंगालच्या राजदीप बिस्वासबरोबर झालेल्या कडव्या लढतीत उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. हा सामना १०-१२,४-११,११-६ असा चुरशीचा झाला. त्यास बार्शीतील गणेश स्वामी व वेदांत खळदे यांचे मार्गदर्शन लाभले. राजवर्धनने यापूर्वी वडोदरा, गुजरात व पंचकूला हरियाणा या मानाकित स्पर्धेत कास्य पदक मिळविले आहे. यंदा त्याने आपली कामगिरी उंचावत हे यश मिळविले. त्याचे सोलापूर ज़िल्हा टेबल टेनिस संघटनेचे अध्यक्ष डॉ. राजीव प्रधान यांनी अभिनंदन केले आहे

# नेपाळच्या देवा थापाची हिमाचल प्रदेशच्या नदीम चौहानवर मात

## श्रीराम नवमी निमित्त वासुद येथे कुस्त्यांचा थरार

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२७ मार्च -**

श्रीराम नवमी निमित्त वासुद (ता. सांगोला) येथील जुने हायस्कूल मैदानावर व हनुमान मंदिर परिसरात झालेल्या कुस्ती मैदानात १ लाख रुपये इनामाच्या कुस्तीत नेपाळचे देवा थापा यांनी हिमाचल प्रदेशच्या नदीम चौहान यांच्यावर मात करत विजेतेपद पटकावले.

जंगी कुस्त्यांच्या या मैदानात सांगलीचे विशाल शेळके यांनी आटपाडीच्या रणजीत आगलावे, खवासपूरचे अर्जुन चव्हाण यांनी म्हसवडच्या प्रसाद फुकळे, करण खटके यांनी दत्ता बोडरे, पियुष वाडेकर यांनी आटपाडीच्या भैय्या खरात, गणेश आवताडे यांनी आटपाडीच्या यश देवकते तर मनेगावचे ज्ञानेश्वर सावंत यांनी खवासपूरच्या विकास कोळी यांच्यावर विजय मिळवला. कामतीचे सुलेखान शेख व बामणीचे विनोद शिनगारे, कुंभारीचे सुशांत शेजुळ व खवासपूरचे विकास निंबाळकर यांच्यातील कुस्त्या बरोबरीत सोडवण्यात आल्या.

सांगोला पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांनी पंच म्हणून तर कुस्ती निवेदनाची



जबाबदारी क्रीडा भूषण पुरस्कारप्राप्त कृष्णा शेंडगे यांनी प्रभावीपणे पार पाडली. याप्रसंगी दगडू चौगुले, बजवळकर, बुवा बडरे, दादा व्हनमाने, सहदेव लेंडवे, सागर पाटील, यशराजे साळुंखे पाटील, अतुल पवार, योगेश खटकाळे, गुंडादादा खटकाळे, मोहनबापू आलदर, डॉ.शिवराज भोसले, डॉ. विजय बंडगर, डॉ.महेश राऊत, डॉ.महादेव जगताप उपस्थित होते. श्रीराम मंडळाचे सदस्य भीमराव सावंत, प्रकाश केदार, वसंतराव शिंदे, शहाजी पाटील, विठ्ठलनाना केदार, सुभाष शिंदे, पोपट भोरे, अरविंद केदार, राहुल भोरे, सुनील भोरे, दत्ता केदार, प्रकाश भोरे, सुनील केदार, अशोक गोरे, अशोक शास्त्री, गोपाळ मराळ, राहुल केदार, गोपी केदार, डॉ.निरंजन केदार, अंकुश सावंत, मधुकर पवार यांनी या कुस्त्यांच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले.



# एस.आर चंडक व आयडील स्कूलला दुहेरी मुकुट

## शालेय शहर थ्रो बॉल स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मार्च-**

शालेय शहर थ्रो बॉल स्पर्धेत एस.आर चंडक व आयडील स्कूलने दोन गटात विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला.

नेहरूनगर शासकीय मैदान येथे झालेल्या या स्पर्धेचे उद्घाटन द.का.आसावा प्रशालेचे क्रीडाशिक्षक प्रमोद कुनगुलवार यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी सचिव राजेंद्र माने शारीरिक शिक्षण शिक्षक संघटनेचे शहराध्यक्ष विठ्ठल कुंभार, रविंद चव्हाण, धर्मराज कट्टीमनी, आरती मलजी, अक्षय माने यांची प्रमुख उपस्थिती होती. या स्पर्धेत विविध शाळेतून १०० खेळाडूंनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालनसंघटनेचे सहसचिव सुहास छंचुरे यांनी केले. उपाध्यक्ष अजित पाटील यांनी आभार मानले.

**अंतिम निकाल (प्रथम तीन):**

**१४ वर्षे मुले :** एस.आर चंडक, महेश स्कूल, बटरफ्लाय स्कूल. **मुली :** एस.आर.चंडक, महेश, आयडील स्कूल.

**१७ वर्षे मुले :** नेताजी प्रशाला, उमाबाई श्राविका, बटरफ्लाय. **मुली :** बटरफ्लाय, सेवासदन, उमाबाई श्राविका.

**१९ वर्षे मुले :** आयडील, नेताजी. **मुली :** आयडील, सेवासदन, उमाबाई श्राविका.

# महाराष्ट्र खो-खोच्या विकासासाठी ’खो-खो इंडिया’कडून अंतरिम समितीची घोषणा

## समितीमध्ये सोलापूरचे सत्येन जाधव

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ मार्च -**



महाराष्ट्रातील खो-खो खेळाला अधिक चालना देण्यासाठी आणि खेळाच्या संघटनात्मक रचनेत सुधारणा करण्यासाठी 'खो-खो इंडिया' या राष्ट्रीय संघटनेने मोठा निर्णय घेतला आहे.

एशियन खो खो फेडरेशन व ऑलम्पिक कौन्सिल ऑफ इंडियाशी संलग्न असलेल्या खो खो इंडियाने महाराष्ट्रासाठी एका नवीन 'अंतरिम समितीची' (Interim Committee) नियुक्ती करण्यात आली असून, या समितीवर राज्याची नवीन अधिकृत खो-खो संघटना स्थापन करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. खो-खो इंडियाचे सरचिटणीस देवेंद्र सिंग यांनी जारी केलेल्या अधिकृत पत्रात सात सदस्यांच्या नावाची घोषणा केली आहे. यात ठाण्याचे सुरेश गांधी यांची निमंत्रक (Convener) म्हणून व सोलापूरचे निवृत्त तालुका क्रीडा अधिकारी सत्येन जाधव यांची सदस्य म्हणूननि युक्ती करण्यात आली आहे.




**समितीतील सदस्य याप्रमाणे:**

सुरेश गांधी (ठाणे, निमंत्रक), अजय पवार (अहिल्यानगर), जयवंत बोभाटे (पालघर), सत्येन जाधव (सोलापूर), प्रशांत पवार (सांगली), अमित भंडारी (छत्रपती संभाजीनगर), बिभीषण पाटील (धाराशिव, सर्व सदस्य).

### समितीला ३ महिन्यांत प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश

खो-खो इंडियाने या समितीला सर्व औपचारिकता पूर्ण करण्यासाठी आणि नोंदणी प्रमाणपत्र, घटनेची प्रत, व पदाधिकाऱ्यांची यादी सादर करण्यासाठी तीन महिन्यांचा कालावधी दिला आहे. विहित वेळेत काम पूर्ण न झाल्यास खो-खो इंडियाकडून योग्य ती कारवाई केली जाईल, असेही पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्रातील खो-खो क्षेत्राला एक नवी दिशा मिळण्याची शक्यता आहे.

### समितीच्या जबाबदाऱ्या

या अंतरिम समितीला प्रामुख्याने ही कार्ये पार पाडावी लागणार आहेत: महाराष्ट्रात खो-खो खेळाचा प्रसार आणि विकास करणे. खेळाडूंचे कल्याण, त्यांना पाठबळ आणि विविध स्तरांवरील स्पर्धांमध्ये त्यांचा सहभाग सुनिश्चित करणे. खो-खो इंडियाच्या नियमानुसार महाराष्ट्राची अधिकृत 'राज्य खो-खो संघटना' स्थापन करणे.

# ‘अनधिकृत’ स्पर्धांवर बंदी! सहभागी झाल्यास ‘आजीवन बंदी’

## भारतीय खो-खो महासंघ व महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. २७ मार्च-**

‘खो-खो इंडिया’ किंवा ‘खो-खो महाराष्ट्र’ या नावाखाली आयोजित केल्या जाणाऱ्या स्पर्धांमध्ये सहभागी झाल्यास खेळाडू, प्रशिक्षक आणि पंचांवर आजीवन बंदी घालण्यात येईल, असा स्पष्ट इशारा संघटनेचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव यांनी दिला आहे.

भारतीय खो-खो महासंघ ही भारत सरकार, भारतीय ऑलिम्पिक संघटना आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त एकमेव संस्था असून महाराष्ट्र खो-खो असोसिएशन ही तिची अधिकृत राज्य संघटना आहे. मात्र, गेल्या काही काळात ‘खो-खो इंडिया’ या नावाखाली समांतर आणि अनधिकृत स्पर्धा आयोजित केल्या जात असून त्यामुळे खेळाडूंची दिशाभूल होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. अशा स्पर्धांमध्ये सहभाग घेतल्यास खेळाडूंच्या अधिकृत कारकिर्दीवर गंभीर परिणाम होऊ शकतो, असा इशारा देण्यात आला आहे.

### ५ एप्रिलपर्यंत माफीनाफा द्या

नुकत्याच पुणे येथे झालेल्या शासकीय परिषदेत यापूर्वी अनावधानाने सहभागी झालेल्या खेळाडू व कार्यकर्त्यांनी लेखी माफीनामा व हमीपत्र दिल्यास त्यांच्यावरील जुनी कारवाई मागे घेतली जाईल. मात्र, यासाठी ५ एप्रिल म्हणजे पुढील शासकीय परिषद सभेपूर्वी हे माफीनामा व हमीपत्र देणे बंधनकारक केले आहे.

### खेळाडूंनी योग्य मार्ग निवडावा



‘‘अनेक खेळाडू अनधिकृत संस्थांच्या जाळ्यात अडकून आपली कारकीर्द धोक्यात घालतात. खेळाडूंनी केवळ अधिकृत जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय संघटनांच्या स्पर्धांनाच प्राधान्य द्यावे, जेणेकरून त्यांना सरकारी सवलती आणि भविष्यातील संधींचा लाभ मिळेल,’’

**- प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव, सरचिटणीस महाराष्ट्र खो-खो असोसिएशन**

### अधिकृतता केवळ भारतीय खो-खो महासंघाकडेच

भारतीय क्रीडा क्षेत्रात खो-खो खेळाचे नियमन, प्रशासन आणि अधिकृत स्पर्धांचे आयोजन करण्याचे सर्वाधिकार केवळ भारतीय खो-खो संघ कडेच आहेत. ही संस्था भारत सरकारच्या युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाद्वारे मान्यताप्राप्त एकमेव राष्ट्रीय क्रीडा महासंघ आहे. इतकेच नव्हे तर, ही संस्था भारतीय ऑलिम्पिक संघटना , आशियाई खो-खो महासंघ आणि आंतरराष्ट्रीय खो-खो महासंघाशी संलग्न असलेली देशातील एकमेव कायदेशीर संस्था आहे. त्यामुळे या संस्थेच्या मान्यतेशिवाय होणाऱ्या कोणत्याही स्पर्धांना कायदेशीर आधार उरत नाही.

**- उपकार सिंग विर्क, सरचिटणीस भारतीय खो-खो महासंघ.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### पिलीव परिसरात श्रीराम जन्मोत्सव सोहळा

**पिलीव, दि. २७ मार्च-**

पिलीव परिसरात श्रीराम जन्मोत्सव सोहळा भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. पिलीव येथील घाटे परिवाराच्या श्रीराम गल्लीतील श्रीराम मंदिरात श्रीराम जीवन चरित्रावर वेदांत देशपांडे यांचे कीर्तन व पिलीव येथील मुकुंद सुरवसे कोळी भजनी मंडळ यांनी भजन सामुहिक आरती व महिलांनी सादर केलेला सामूहिक पाळणा गीत व श्रीरामावरील भजनी गीते सादर करून महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी श्रीराम जन्माचा पाळणा मीनाक्षी देशमुख, ॲड. असावरी घाटे, व आशा कुलकर्णी व महिलांनी सादर केला. यावेळी माजी सरपंच प्रकाश घाटे ॲड अजय घाटे, नूतन उपसभापती मनीषा पाटील, नामदेव देशमुख, अमोल मदने पाटील, दामोदर लोखंडे, शिवराज पुकळे उपस्थित होते. त्याचप्रमाणे विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात श्रीराम जन्माचा पाळणा महिलांनी सादर केला तर श्री विठ्ठल भक्ती भजनी मंडळाने भजन आरती सादर केली. यावेळी झिंजेवस्तीचे माजी सरपंच अरुण मदने यांच्यावतीने प्रसादाचे वाटप करण्यात आले यावेळी माजी सरपंच अमोल मदने-पाटील, मनिषा पाटील, विठ्ठल भजनी मंडळाचे ज्येष्ठ सभासद बाबुराव सुतार गुरव, पुजारी नंदकुमार गुरव, दत्त सुतार, नामदेव सातपुते, सुनील सुतार, दिलीप काळे उपस्थित होते. महालक्ष्मी शिवारातील भैस मळ्यातील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात हभप शंकरराव भैस यांचे श्रीराम जीवन चरित्रावर प्रवचन भजन व प्रसादाचे नियोजन करण्यात आले होते.



### झाडाला आपलं म्हणून जपलं पाहिजे : कवी जवंजाळ

**मंगळवेढा, दि. २७ मार्च-**

झाडे लावणे आणि त्यांची हिरवाई टिकवणे ही काळाची गरज बनली आहे. वाढत्या प्रदूषणामुळे आणि जंगलतोडीमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत चालला आहे. झाडाच्या हिरवाईत आपलं भविष्य आहे, म्हणून झाडाला आपलं म्हणून जपलं पाहिजे, असे प्रतिपादन कवी व वक्ते सुनील जवंजाळ यांनी केले. पीएम श्री नगरपालिका मुलांची शाळा नंबर-२ या ठिकाणी आयोजित केलेल्या पर्यावरण संवर्धन विषयक कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मुख्याध्यापक राजकुमार मांजरे, उपशिक्षक सुनील शिंदे, शिवलिंग राऊत, उत्तम ढगे, स्वप्निल लाळे, शुभांगी जोशी, रिजवाना काझी उपस्थित होते. प्रमुख पाहुणे व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेच्या पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचा परिचय शिष्यवृत्ती विभागाचे प्रमुख शिवलिंग राऊत यांनी करून दिला. प्रास्ताविक व सूत्रसंचालन उत्तम ढगे यांनी केले तर आभार सुनील शिंदे यांनी मानले.



### दक्षिणमधील वाळूसाठा पंधरा दिवसासाठी निलंबित

**दक्षिण सोलापूर, दि. २७ मार्च..**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील भंडारकवठे व लवंगी येथील भीमा नदी पात्रातील लिलाव झालेला वाळू साठा शासनाच्या नियमाचे उल्लंघन केल्यामुळे पंधरा दिवसांसाठी बंद करण्याचे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिला आहे. मंद्रूप अप्पर तहसीलदार विष्णू बुटे यांनी भंडारकवठे व लवंगी येथील वाळू साठ्याला भेट देऊन शासनाच्या नियमाचे पालन करण्याचे आदेश ठेकेदारांना दिले होते. मात्र ठेकेदारांनी नियमाचे उल्लंघन न केल्यामुळे त्यांनी वाळू साठा बंद करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना अहवाल पाठविला होता. त्यानुसार २६ मार्च रोजी निंबर्गीचे मंडल अधिकारी राणा वाघमारे व भंडारकवठयाचे तलाठी गणेश भुजबळ यांनी भंडारकवठे व लवंगी वाळू साठा बंद केला. १५ दिवसांसाठी दोन्ही वाळू साठ्यातून वाळू उचलण्यास व वाहतूक करण्यास बंदी घालण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिला आहे.

## निधन वृत्त...

### दमयंती भिंगे



**पंढरपूर, दि.२७ मार्च-**

येथील दाळे गल्ली भागातील श्रीमती दमयंती दिगंबर भिंगे (वय ९५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचा अंत्यविधी लिंगायत स्म्शानभूमीत पार पडला. सुधीर भिंगे यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. पाच वर्षांपूर्वी कोराई गड चढून त्या पंढरपूर पंचक्रोशीत प्रकाश झोत्यात आल्या होत्या.

### ज्ञानेश्वर कौलवार



**पंढरपूर, दि. २७ मार्च-**

पंढरपुरातील सुप्रसिद्ध किराणामालाचे व्यापारी तथा साईप्रसाद ट्रेडिंग कॉर्पोरेशनचे मालक ज्ञानेश्वर रामचंद्र कौलवार (वय ७३) यांचे २५ मार्च २०२६ निधन झाले. (कै.) कौलवार यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. येथील वैभव कौलवार व अमोल कौलवार यांचे (कै.) ज्ञानेश्वर कौलवार हे वडील होते.

# पुरस्कारप्राप्त मंद्रूप ग्रामपंचायतीकडून माहिती देण्यास टाळाटाळ

## तीन महिन्यानंतरही माझी वसुंधरा पुरस्कारनिधी खर्चाचा हिशोब मिळेना

**तभा वृत्तसेवा**
**दक्षिण सोलापूर, दि. २७ मार्च**

राज्य शासनाच्या माझी वसुंधरा अभियानात मंद्रूप ग्रामपंचायतीला प्रथम व तृतीय असे दोन पुरस्कार मिळाले आहेत. यासाठी पावणे तीन कोटी रूपयांचा पुरस्कार रक्कमही मिळाले. पर्यावरणपूरक गोष्टींसाठी खर्च करण्यात आलेल्या या अभियानातील रक्कमेचा तपशील देण्यास मंद्रूपचे ग्रामसेवक नागेश जोडमोटे टाळाटाळ करीत आहेत. त्यामुळे पुरस्कार रक्कमेचे नेमके काय झाले? असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे.

गावात प्रत्यक्ष विकास नसताना केवळ ऑनलाईन माहीती सादर करून ग्रामपंचायतीने दोन पुरस्कार मिळविले आहेत. मात्र या पुरस्कार रक्कमेचा गैरवापर करून बोगस बिल काढण्यात येत असल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीने माझी वसुंधरा योजनेतील रक्कम कुठे खर्च केला? रक्कम किती शिल्लक आहे? नियमानुसार रक्कम खर्च करण्यात आला आहे का? याबाबत ग्रामपंचायतीकडे माहीती मागितले असता तीन महिन्यांपासून टाळाटाळ करण्यात येत आहे. विशेष म्हणजे दक्षिण पंचायत समिती कार्यालयाकडे ही माहीती मागितल्यानंतर पंचायत समिती कार्यालयाने मंद्रूप ग्राम पंचायतीकडे माहीती अधिकार अर्ज वर्ग करून माहीती देण्यास सांगितला आहे. मात्र माहीती विचारण्यासाठी गेल्यानंतर ग्राम सेवक जोडमोटे हे कार्यालयातच नसल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे माझी वसुंधरा योजनेतील पुरस्कार रक्कमेच्या खर्चामध्ये भ्रष्टाचार झाल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे माहीती देण्यास टाळाटाळ करणारे ग्रामसेवक जोडमोटे यांच्यावर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.

### माहिती अधिकार अर्जांना केराची टोपली

मंद्रूपमध्ये सत्ताधारी पॅनलप्रमुख आरटीआय कार्यकर्ता म्हणून ओळखले जातात. माहीती अधिकारातून त्यांनी लोकमंगल शेतकरी बोगस कर्ज प्रकरण , दूधभुकटी, वराहपालन जागा गैरव्यवहार उघडकीस आणला आहे. मात्र त्यांच्याच ग्रामपंचायतीमध्ये नागरीकांच्या माहीती अधिकार अर्जांना माहीती न देता केराची टोपली दाखविण्यात येत आहे. ग्रामसेवक जोडमोटे यांच्या मनमानी कारभारावर पॅनलप्रमुखांचे अंकुश नाही की माहीती देण्यास जाणिवपूर्वक टाळाटाळ करण्यात येत आहे .याविषयी नागरीकांमध्ये चर्चा सुरू आहे.



### कर्मयोगी किड्स फाऊंडेशनमध्ये ग्रॅज्युएशन डे व बक्षीस समारंभ

**पंढरपूर, दि.२७ मार्च-**

येथील श्री पांडुरंग प्रतिष्ठान संचलित कर्मयोगी किड्स फाउंडेशन येथे ग्रॅज्युएशन डे व बक्षीस समारंभ उत्साहात संपन्न झाल्याची माहिती प्राचार्या मानसी मिश्रा यांनी दिली.

यावेळी कर्मयोगी पब्लिक स्कूलचे प्राचार्य सिबानारायण दास, डॉ. विकास गुरव व सुवर्णा वाळके हे उपस्थित होते. या कार्यक्रमांमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच विद्यार्थ्यांना वार्षिक पारितोषिक प्रदान करण्यात आली. शालेय जीवनामध्ये विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या दृष्टीने बॅकस, ऑलिंपियाड अशा अनेक विविध परीक्षांचे व विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या परीक्षा व स्पर्धेमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके यावेळी प्रदान करण्यात आली. यामध्ये ट्रॉफी, सुवर्णपदक व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक, रजिस्ट्रार गणेश वाळके, प्राचार्या मानसी मिश्रा यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम आवश्यक : आ. जानकर



**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. २७ मार्च-**

विद्यार्थ्यांच्या उपजत कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम आवश्यक असे मत आमदार उत्तमराव जानकर यांनी जि. प. प्रा. शाळा वेळापूर मुली शाळेत आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सभापती दत्ता मगर होते.

व्यासपीठावर जिल्हा परिषद सदस्य मीनाक्षी सरतापे, गटशिक्षणाधिकारी सुषमा महामुनी, वेळापूर ग्रा. पं. व शाळा व्यवस्थापन समिती तज्ञ सदस्य डॉ. स्नेहल जानकर, सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच नानासाहेब मुंगूसकर, ताहेरा फाउंडेशनचे हाजी अबूबकर तांबोळी, पिसेवाडी ग्रा.पं. सदस्य साहिल आतार, आरपीआयचे तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष करिष्मा मुलाणी उपाध्यक्ष मनीषा भानवसे ग्रा.पं. सदस्या प्रियांका आडत, केंद्रप्रमुख बापूसाहेब नाईकनवरे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक किरण घाडगे यांनी केले.

आमदार उत्तमराव जानकर यांचा सत्कार मुख्याध्यापक युन्नूस तांबोळी यांनी केले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष रणजीत सरवदे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी ताहेरा फाउंडेशनचे हाजी अबुबकर तांबोळी यांचा सन्मान आ.जानकर यांच्या हस्ते करण्यात आला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जीवन रणनवरे, महादेव घोगरे, आसरा जैन, पांडुरंग कुलकर्णी, नितीन चव्हाण प्रवीण कुमार पांगे, कविता आवटे आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन विलास गुरव व लक्ष्मीकांत कुलकर्णी यांनी केले व आभार नितीन चव्हाण यांनी मानले.



## रत्नप्रभादेवी बिजोत्पादक संस्थेत विविध निवडणुकांतील विजयी मान्यवरांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २७ मार्च-**

प्रतिनिधी रत्नप्रभादेवी मोहिते पाटील बीज उत्पादक सहकारी संस्थेच्या वतीने विविध निवडणुकांत यश संपादन केलेल्या मान्यवरांचा सन्मान सोहळा पार पडला. विशेष म्हणजे, सन्मानित करण्यात आलेले सर्व मान्यवर हे संस्थेचेच संचालक असून, त्यांनी जनतेचा विश्वास संपादन करत विविध स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये विजय मिळवला आहे.

जिल्हा परिषद गट बोरगाव येथून निवडून आलेले नागेश भोसले, अकलूज नगरपरिषदेचे नगरसेवक म्हणून निवडून आलेले माजी चेअरमन व संचालक विलास शिरसागर तसेच पंचायत समिती गण माळीनगर येथून निवडून आलेले संचालक महादेव साबळे यांचा संस्थेच्या वतीने गौरव करण्यात आला.

यावेळी विलास शिरसागर यांचा सन्मान चेअरमन श्रीकांत देशमुख यांनी, नागेश भोसले यांचा सन्मान संस्थेचे उपाध्यक्ष सुजित तरंगे यांनी, तर महादेव साबळे यांचा सन्मान संचालक इंद्रराज जोशी यांनी केला.

कार्यक्रमादरम्यान संस्थेचे उपाध्यक्ष सुजित तरंगे यांचा वाढदिवसही साजरा करण्यात आला. यावेळी संचालक संदीप घाडगे, सागर यादव, दादा तोडकरी, व्यवस्थापक दिलीप सिरसट उपस्थित होते. तसेच जांबुड तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष नितीन घाडगे यांनीही उपस्थिती लावली.

संस्थेचा कारभार माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, राजसिंह मोहिते-पाटील, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील तसेच शिवरत्न शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा शितलदेवी मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तमरीत्या सुरू असून संस्था कार्यरत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

## कलेशिवाय जीवन अपूर्ण : साखी



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २७ मार्च-**

मानवी जीवनात कलेला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. चित्रकला, संगीत, नृत्य, नाट्य, साहित्य अशा विविध कलाप्रकारांमधून मानवी जीवनातील आनंद, दु:ख, संघर्ष, आशा-निराशा यांचे सूक्ष्म दर्शन घडते. त्यामुळे कला ही मानवी अस्तित्वाशी निगडित असलेली मूलभूत गरज ठरते, असे प्रतिपादन भारूडकार संध्या साखी यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग आयोजित सांस्कृतिक महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव हे होते.

यावेळी मंचावर उपप्राचार्य डॉ. सुशील शिंदे, डॉ. राजेश कवडे, डॉ. भगवान नाईकनवरे, अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बळवंत, डॉ. समाधान माने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. अमर कांबळे उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. मारुती नायकू यांनी केले. त्यामध्ये त्यांनी या सांस्कृतिक महोत्सवात लोकगीते, लोककला, लोकनृत्य, गीतगायन, वाद्यवृंद, शास्त्रीय वादन, नाट्य व एकांकिका सादरीकरण असे ३४ कलाप्रकार सादर होणार असून महाविद्यालयातील सर्व विभागांच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला असल्याचे नमूद केले.

सूत्रसंचालन प्रा. डॉ. भारती सुडके व प्रा. सारिका भांगे यांनी केले. सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. रमेश शिंदे यांनी आभार मानले.

### वीज चोरीप्रकरणी एका ग्राहकाविरुध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि.२७ मार्च-**

वीज चोरीप्रकरणी एका ग्राहकाविरुध्द बार्शी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत महावितरणच्या कुर्डुवाडी ग्रामीण-२ शाखेचे प्रभारी कनिष्ठ अभियंता अमित सौदागर आवटे यांनी फिर्याद दिली. वीजबिलाच्या वसुलीच्या अनुषंगाने तडवळे येथे गेले असता धनाजी लक्ष्मण लोंढे यांच्या घराशेजारील महावितरणच्या लघुदाब वाहिनीवर काळ्या रंगाच्या वायरद्वारे बेकायदेशीररीत्या आकडा टाकून वीज वापर होत असल्याचे निदर्शनास आले. या वीज चोरीप्रकरणी ८ हजार ८२९ रुपये, थकीत वीज बिलाचे ८ हजार ६५० रुपये असे एकूण १७ हजार ४७९ रुपये थकीत असल्याचे सांगण्यात आले.



## उमा विद्यालयात पूनम सुर्वेचा गौरव

**मोडनिंब, दि. २७ मार्च-**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पीएसआय परीक्षेत मोडनिंब (ता. माढा) येथील श्री उमा विद्यालयाची माजी विद्यार्थिनी पूनम सुर्वे हिने मोठे यश संपादन केले. एसईबीसी प्रवर्गात ती राज्यात प्रथम आली. तिच्या या उत्तुंग यशाबद्दल विद्यालयाच्या वतीने गौरव करण्यात आला. याचसोबत विद्यालयाच्या वतीने माजी विद्यार्थी असलेल्या पोलिस दलातील आजी-माजी कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. अध्यक्षस्थानी माजी पोलिस उप अधीक्षक संजय सुर्वे होते. संस्थेचे सचिव व्ही. के. पाटील, उपाध्यक्ष आर. बी. पाटील, विश्वस्त राजेश पाटील, सेवानिवृत्त प्राध्यापक जयवंत समुद्र यावेळी उपस्थित होते. प्रास्ताविक विद्यालयाचे प्राचार्य एस. आर. पाटील यांनी केले. सूत्रसंचालन आयुब झरेकर यांनी केले. आभार एस. व्ही. पाटील यांनी मानले.

### पोलीस खात्यातील माजी विद्यार्थ्यांचा सन्मान

पोलीस खात्यातील माजी विद्यार्थ्यांचा उमा विद्यालयाच्या वतीने सन्मान करण्यात आला. यावेळी पोलिस दलात कार्यरत असलेल्या अभिलाषा गुरव, पूनम सुर्वे, केशव सुर्वे, पंजाब सुर्वे तसेच सेवेतून निवृत्त झालेल्या उमा विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. समाजाच्या सुरक्षेसाठी कार्य करणाऱ्या या माजी विद्यार्थ्यांच्या कार्याचे मान्यवरांनी कौतुक केले.

# लाडक्या बहिणींना ई-केवायसीचा सहारा

## ३१ मार्च अंतिम मुदत; एप्रिलमध्ये पात्र महिलांना एकदम ४५०० रुपयांचा लाभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ मार्च -**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या महिलांसाठी महत्त्वाची सूचना देण्यात आली आहे. ज्या महिलांनी ई-केवायसी पूर्ण केलेली नाही किंवा त्यामधील चुका दुरुस्त केल्या नाहीत, त्यांचा लाभ थेट बंद होणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील तब्बल ११ लाख २० हजार ५६३ महिलांनी या योजनेसाठी अर्ज केला असून, १ जुलै २०२४ पासून त्यांना नियमित लाभ मिळत आहे. मात्र, आता लाभ सुरू ठेवण्यासाठी ई-केवायसी अनिवार्य करण्यात आल्याची माहिती जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी विजय खोमणे यांनी दिली आहे.

दरम्यान, ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पात्र महिलांना फेब्रुवारी, मार्च आणि एप्रिल या तीन महिन्यांचे मिळून एकदम ४५०० रुपये त्यांच्या खात्यात जमा होणार आहेत. त्यामुळे एप्रिल महिन्यातील हप्ता अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. निवडणुकीपूर्वी मोठ्या प्रमाणावर अर्ज झाल्याने अनेक अपात्र महिलांनाही लाभ मिळाल्याचे समोर आले होते.

आता ई-केवायसीद्वारे उत्पन्न व इतर माहितीची पडताळणी होत असल्याने एप्रिलमध्ये ज्यांना लाभ मिळेल, त्यांनाच 'खऱ्या लाडक्या बहिणी' मानले जाणार आहे. लाडकी बहीण योजनेचा लाभ कायम ठेवण्यासाठी ई-केवायसी हीच किल्ली ठरणार असून, अंतिम मुदतीपूर्वी प्रक्रिया पूर्ण करणे अत्यावश्यक झाले आहे. अन्यथा, लाभ कायमचा बंद होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### एक लाख महिला ई-केवायसीपासून वंचित

ई-केवायसीतील चुका दुरुस्त करण्यासाठी ३१मार्चपर्यंतच मुदत दिली आहे. ज्यांनी अजिबात ई-केवायसी केली नाही, त्यांना मुदतवाढ नाही. सोलापूर जिल्ह्यातील सुमारे १ लाख महिला अद्याप ई-केवायसीपासून वंचित आहेत. याशिवाय, अनेक महिलांच्या केवायसीमध्ये चुका असल्याचेही दिसून आले आहे.

**-विजय खोमणे, जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी**






## जिजामाता शाळेत विद्यार्थ्यांनी साजरा केला शिक्षक दिन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मार्च-**

जिजामाता प्राथमिक शाळा तुळशीदासनगर कोंडी येथे विद्यार्थ्यांनी विशेष शैक्षणिक उपक्रमांतर्गत शिक्षक दिन साजरा केला. या उपक्रमाचे उद्घाटन ज्येष्ठ ग्रामस्थ बालाजी भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक चंद्रकांत कुंटेलू होते तर प्रमुख अतिथी म्हणून पालक शिक्षक संघाच्या उपाध्यक्षा सुजाता पवार उपस्थित होते. इयत्ता सातवीतील विद्यार्थ्यांनी बालवर्ग ते सहावी पर्यंतच्या वर्गावर अध्यापन कार्य पार पडला. प्रारंभी गावांतून प्रवेश रॅली काढण्यात आले. संपूर्ण शैक्षणिक कामकाजाचे नियोजन व उत्कृष्ट संयोजन विद्यार्थ्यांमधूनच निवड झालेली आरती वाघमारे हिने मुख्याध्यापिका तर अपेक्षा शिंदे हिने उपमुख्याध्यापिका म्हणून भूमिका पार पाडली. विशेष शैक्षणिक उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष सचिन ठोकळ, सचिवा शिल्पा ठोकळ यांनी सहभागी मुलांचे कौतुक केले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यासाठी महिलेचे उपोषण

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.२७ मार्च-**

माढा तालुक्यातील आलेगांव (बु) येथील दत्तनगर वस्तीमध्ये घराकडे जाणाऱ्या रस्त्यावर सुरू केलेले अतिक्रमण काढून रस्ता देण्याचे मागणीसाठी टेंभूर्णी येथील जलसंपदा विभागाचे कार्यालया समोर शुक्रवार दि.२७ रोजी कल्पना संजय खोमणे या महिलेने आमरण उपोषण सुरू केले आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, आलेगाव (बु) येथील दत्तनगर वस्ती येथे जलसंपदा विभागाचे आरक्षीत जागेमध्ये वस्ती असून अनेक कुटुंबे या ठिकाणी रहात आहेत या ठिकाणी जाणेयेणेसाठी असलेल्या रस्त्यावर काही लोकांनी बांधकाम सुरू केले आहे. यामुळे या भागात रहात असलेल्या महिला कल्पना संजय खोमणे यांचा रस्ता बंद झाला आहे त्या रस्त्यावरील अतिक्रमण काढून रस्ता खुला करून द्यावा या मागणीसाठी खोमणे यांनी आमरण उपोषण सुरू केले आहे.

# समीर मुलाणी, धनंजय डिकोळे यांच्यात खडाजंगी

## संजय टोणपेंनी आरोग्य विभागाचा केला भांडाफोड

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डुवाडी, दि.२७ मार्च-**

आयत्या वेळी विरोधी सदस्यांकडून जैन समाजाच्या घेण्यात आलेल्या मागण्यांवरुन समीर मुलाणी व धनंजय डिकोळे यांच्यात भर सभागृहात खडाजंगी झाली. दरम्यान, शिक्षण समितीचे सभापती संजय टोणपे यांनी आरोग्य विभागाकडील एका प्रकरणाचा भांडाफोड केला.

नगरपालिकेच्या कै.काशीनाथ भिसे सभागृहात नगराध्यक्षा जयश्री भिसे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या सभेत समीर मुलाणी व धनंजय डिकोळे यांच्यातील शाब्दिक चकमक पाहता, नगराध्यक्षा भिसे यांनी येत्या दोन दिवसात या विषयावर अहवाल मागवून पुन्हा सभा घेण्यात येणार असल्याचे सांगत वादावर पडदा टाकला.




शहरातील पोष्ट रोडला भगवान महावीर पथ नाव देण्यात यावे, टेभूर्णी रोडवरील लकी हॉस्पिटलसमोर अहिंसा स्थंब उभारण्यात यावा हे दोन विषय आयत्या वेळच्या विषयांमध्ये आणण्याच्या कारणावरुन काँग्रेसचे गटनेते समीर मुलाणी व शिवसेनेचे जिल्हाप्रमुख धनंजय डिकोळे यांच्यात शाब्दिक चकमक उडाली. कुर्डुवाडी नगरपालिकेची मैला उपसण्याची जेटींग मशिन वाकाव येथील शेतकऱ्यांच्या विहिरीतील गाळ उपसण्यासाठी जाते. गाळ उपसण्यासाठी १६ हजार रुपये घेतला जातो. रकमेच्या वाटणीवरुन वाद निर्माण झाल्याने हा विषय चव्हाट्यावर आला आहे. कुर्डुवाडी शहराच्या बाहेर जेटींग मशीन गेलीच कशी? असा सवाल संजय टोणपे यांनी उपस्थित केला. कर आकारणीपोटीच्या शास्ती कर माफबाबत विचारले असता मोहसिन मकनू यांनी सांगितले की, सवलत दिल्याने लोकांकडून मागणी वाढत असते. नगरसेविका जयश्री पाटील म्हणाल्या, कर माफ केल्याने नगरपालिकेचे उत्पन्न कमी होईल.



समीर मुलाणी



धनंजय डिकोळे

दरम्यान, शासन निर्णयानुसार फक्त एकदाच सवलत घेता येत असल्याचे अधिकारी बापू चोभे यांनी यावेळी स्पष्ट केले. मोकाट कुत्र्यांचा सर्व्हे केबीनमध्ये बसूनच झाला असल्याचा आरोपही मुलाणी यांनी केला. यावेळी उपनगराध्यक्षा सविता जगताप, मुख्याधिकारी सचिन तपसे यांच्यासह ऋषिपाल वाल्मिकी, अमर माने आणि सर्व नगरसेवक, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. एकूणच, काय तर कुर्डुवाडी नगरपालिकेची आजची सभा वादळी ठरली.

# सांगली अर्बन बँकेस मोबाईल बँकिंग सुविधेस आरबीआयची मान्यता

**सोलापूर, दि.२७ मार्च-**

सांगली अर्बन बँकेस मोबाईल बँकिंग सुरु करण्यास आरबीआय अर्थात रिझर्व्ह बँकेकडून मान्यता मिळाली आहे. जून महिन्यात बँकेच्या खातेदारांना मोबाईल बँकिंग सेवा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, अशी माहिती बँकेचे अध्यक्ष श्रीपाद खिरे यांनी दिली. ग्राहकांना अधिकाधिक सुविधा देण्याकामी सांगली अर्बन बँक कटीबध्द आहे. मोबाईल बँकिंग मुळे बँकेच्या ग्राहकांना घरबसल्या खात्याची तपासणी, बिल भरणे, ट्रान्सफर करणे यांसह बँकेसंदर्भातची इतर कामे करता येतील. बँकेला स्वतःचा आयएफएससी कोड लवकरच मिळणार आहे, असेही त्यांनी सांगितले.



# शहरात ३३ ठिकाणी इलेक्ट्रिक पंप सेट बसविण्यास मंजुरी

## मनपा स्थायी समितीत ५ विषयांना एकमताने मान्यता

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२७ मार्च-**

शहरातील हातपंप असलेल्या ठिकाणी विंधन विहिरींवर इलेक्ट्रिक पंपसेट बसविण्याच्या कामांना, पूर्ण माहिती व खातरजमा करून स्थायी समितीने मंजुरी दिली. शहरातील ३३ ठिकाणी २५ लाख रुपये खर्च अपेक्षित असून, कोटणीस कॉम्प्लेक्स येथील विकास कामांनाही हिरवा कंदील देण्यात आला.

सोलापूर महापालिकेच्या स्थायी समितीची बैठक क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृहात सभापती रंजीता चाकोते यांच्या अध्यक्षतेखाली झाली. शहरातील विविध भागांमधील हातपंप काढून त्या ठिकाणी असलेल्या विंधन विहिरींवर इलेक्ट्रिक पंप सेट बसविण्यासंबंधीचे प्रस्ताव तसेच मक्तेदारांना याचे काम देण्याच्या विषयांना मान्यता देण्यात आली. वेगवेगळ्या चार प्रस्तावांमध्ये प्रभाग क्रमांक ३ आणि ४ मधील ६ ठिकाणी, प्रभाग क्रमांक ६, ७, ८ मधील विविध ७ ठिकाणी, प्रभाग क्रमांक २२ आणि परिसरातील प्रभागांमध्ये नागरी घनकचरा व तत्सम उपाय योजना अंतर्गत प्रभाग ६ मधील १० ठिकाणी तसेच याच योजनेअंतर्गत याच परिसरातील आणखी १० ठिकाणी तेथील हातपंप काढून त्या ठिकाणी असलेल्या विंधन विहिरींवर इलेक्ट्रिक पंपसेट बसविण्याच्या विषयाला मान्यता देण्यात आली आहे.

महापालिका क्षेत्रात नागरी दलितेत तर सुधार योजना सन २०२५-२६ या योजनेअंतर्गत महापालिकेच्या मालकीच्या असलेल्या कोटणीस कॉम्प्लेक्स येथे नागरी सेवा सुविधांची विविध कामे करण्यात येणार आहेत. यापूर्वी याचे २ कोटी ३५ लाखाचे पूर्वगणनपत्रक तयार करण्यात आले होते. त्याला प्रशासकीय मंजुरी देण्यात आली होती. याची निविदा मात्र १ कोटी ९७ लाख ५४ हजार इतकी ठरविण्यात आली याचे काम मक्तेदार एस.डी.कलकुटगी यांना देण्याचा प्रस्ताव देखील स्थायी समितीने एकमताने मंजूर केला.



**सोलापूर : जुळे सोलापुरातील श्री ज्ञानेश्वर मंदिरात रामनवमी साजरी करण्यात आली.**

# मोडनिंबमध्ये राम नवमी विविध उपक्रमांनी साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २७ मार्च-**

येथे राम नवमी विविध उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. शहरातील श्रीराम मंदिरामध्ये प्रभू रामाचा पाळणा गात गुलाल व पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी रामचरित्रावर आधारित कीर्तनाचे आयोजन करण्यात आले.

प्रभू श्रीरामांच्या मूर्तीवर फुले अर्पण करण्यात आली. तसेच श्रीराम चौकात प्रभू श्रीरामांचा जन्मोत्सव साजरा करण्यात आला. रामनामाच्या गजरात भाविकांनी प्रभू श्रीरामांचे दर्शन घेतले.रामनवमी निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. मंदिर परिसरात भक्तांची मोठी गर्दी उसळली होती. भाविकांनी पूजा-अर्चा करत श्रीरामांच्या चरणी नतमस्तक होत उत्सवाचा आनंद लुटला. विविध ठिकाणी रामनामाचा गजर सुरू होता.



**यमाई मंदिरातही भक्तांची गर्दी**

यमाई मंदिरातही रामनवमी निमित्त विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. मंदिर परिसरात दिवसभर भाविकांची मोठी वर्दळ होती. भक्तांनी पूजा-अर्चा करून प्रभू श्रीरामांचे दर्शन घेतले. या सर्व धार्मिक कार्यक्रमांमुळे मोडनिंब शहरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाची सांगता महाप्रसादाने झाली.

## फत्तेसिंह शिक्षण संस्था निवडणूक

# सर्जेराव जाधव विकास पॅनल सलग दुसऱ्यांदा विजयी

## सातही जागांवर निर्विवाद विजय

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२७ मार्च-**

श्री फत्तेसिंह शिक्षण संस्थेच्या विश्वस्त मंडळाच्या त्रैवार्षिक निवडणुकीत (२०२५-२६ ते २०२८-२९) कै. सर्जेराव जाधव विकास आघाडी पॅनलने सातही जागांवर विजय मिळवला. राजीव माने यांच्या नेतृत्वाखाली सलग दुसऱ्यांदा आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले. या निवडणुकीत निवडून आलेले संचालक पुढील तीन वर्षासाठी कार्यभार पाहतील

या निवडणुकीत सात जागांसाठी एकूण १४ उमेदवार रिंगणात होते.संस्थेच्या ६३ सभासद मतदारांपैकी ५६ जणांनी गुरुवारी मतदानाचा हक्क बजावला. सायंकाळी सुमारे ५ वाजता मतमोजणी पार पडली एकूण तीन फेऱ्यांमध्ये निकाल निश्चित झाला

माजी आमदार बी. टी. माने यांचे पुत्र तथा संस्थेचे माजी अध्यक्ष राजीव माने व विद्यमान संचालक बाळासाहेब मोरे यांच्या नेतृत्वाखालील पॅनलने विजयीश्री एकतर्फी खेचुन आणली. सर्जेराव जाधव विकास आघाडी पॅनल मधुन विजयी झालेले उमेदवार तानाजी चव्हाण (२९), महादेव माने (३३), राजीव माने (३४), बाळासाहेब मोरे (२८), प्रकाश पडवळकर (३५), मिलिंद साळुंखे (३३) व विकास सुरवसे (३१) मते प्राप्त करून विजय मिळवला आहे. विरोधी श्री राजे फत्तेसिंह प्रगती पॅनलचे उमेदवार सुभाष गडसिंग याना (२०), विलास गव्हाणे (२४), सुधाकर गोंडाळ (२५), बाबासाहेब निंबाळकर (२५), दत्तात्रय पाटील (२७), माणिक साळुंखे (२२) व भीमराव साठे (२६) यांना मते मिळाल्याने पराभव झाला. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून आसिफ शेख यांनी कामकाज पाहिले.

विजयी उमेदवारांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. या विजयात संस्थेचे ज्येष्ठ मार्गदर्शक संचालक ॲड. शरदराव फुटाणे आणि ज्येष्ठ नेते सुरेशचंद्र सूर्यवंशी यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. विजयी उमेदवार व समर्थकांनी फटाक्यांची आतषबाजी केली . जल्लोष साजरा केला. ज्येष्ठ पत्रकार अरुण जाधव यांच्या हस्ते नूतन संचालकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी स्वामीराव पाटील, सुरेश फडतरे, सोपानराव गोंडाळ, अमर पाटील, शंकर पवार, विठ्ठल मोरे, राजू मोरे, विवेक चव्हाण, तानाजी काजळे, प्रा. मनोज जगताप, मोहन चव्हाण, सागर गोंडाळ, काळे, उस्मान मुजावर, नागनाथ मोरे आदी उपस्थित होते.

> **सभासदांच्या विश्वासाला पात्र राहू**
> मागील तीन वर्षांत आम्ही केलेले कार्य केवळ संस्थेच्या हितासाठीच होते. त्याच विश्वासाच्या बळावर सभासदांनी पुन्हा एकदा आमच्या पॅनलला संपूर्ण बहुमत दिले. हा विश्वास सार्थ ठरवत पुढील काळातही संस्थेच्या प्रगतीसाठी आम्ही नक्कीच चांगले काम करू.
> **- राजीव माने,**
> जेष्ठ नूतन संचालक तथा माजी अध्यक्ष

# कर्मयोगी विद्यानिकेतनचे अभिमानास्पद यश

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२७ मार्च-**

श्री पांडुरंग प्रतिष्ठान संचालित कर्मयोगी विद्यानिकेतन पंढरपूर शाळेचा इयत्ता चौथीतील विद्यार्थी पियुष पोपट खाडे याची नवोदय विद्यालयासाठी निवड झाली आहे. कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि शिक्षकांचे अचूक मार्गदर्शन हेच या यशामागील गमक आहे असे प्रतिपादन प्रशालेच्या प्राचार्या प्रियदर्शनी सरदेसाई यांनी सांगितले.



श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक, प्राचार्या प्रियदर्शनी सरदेसाई, रजिस्ट्रार गणेश वाळके तसेच सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी पियुष च्या यशाबद्दल त्याचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. पियुषच्या हे यश इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणादायी असून यामुळे कर्मयोगी विद्यानिकेतन शाळेचा शैक्षणिक क्षेत्रातील गुणवत्तेसाठीचे नाव पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.



# भारताच्या जडणघडणीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे योगदान

## प्रभारी कुलगुरू डॉ.लक्ष्मीकांत दामा यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ मार्च-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्या काळात जनता व प्राणी यांना पाण्याची व्यवस्था व्हावी म्हणून वॉटर कन्झरवेशन सुविधा केलेल्या आहेत. भारतात अनेक घाट बांधलेत. अनेक मंदिरांचा जिर्णोधार केलेला होता. भारताच्या जडणघडणीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे मोठे योगदान आहे, असे प्रतिपादन सोलापूर विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी केले.

सोलापूर विद्यापीठ अध्यासन आणि कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या या राज्यस्तरीय परिसंवादाचे उदघाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.अश्विन बोन्दार्डे होते. याप्रसंगी अध्यासनाचे संचालक प्रा.डॉ. प्रभाकर कोळेकर, प्रास्ताविक परिसंवादाचे समन्वयक डॉ.दत्ता वाघमारे यांनी केले. डॉ. रत्नेस गोसावी यांनी आभार मानले. कांचन मरीकंटी यांनी सूत्रसंचालन केले.

साहित्यिक गोविंद काळे यांनी 'अहिल्यादेवीच्या बालपणी असलेल्या चतुरपणा, अहिल्यादेवींच्या अष्टपैलू व्यक्तिमत्व विविध उदाहरणास व ओव्यांच्या माध्यमातून त्यांनी त्यांच्या भाषणामध्ये दातृत्व, मातृत्व, संतत्व, नेतृत्व, दूरदृष्टी युद्ध कौशल्य, कुशल प्रशासक, कणखर व्यक्तिमत्व, याबद्दल विस्तृत माहिती दिली.

अध्यासनाचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी 'होळकर: सार्वजनिक सेवा आणि प्रशासकीय कार्य' या विषयावर मांडणी केली तर डॉ. चंद्रकांत चव्हाण यांनी ''होळकर यांचे सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक कार्य'' या विषयवार बोलताना होळकर यांचा निर्भयपणा, निर्भीडपणा, शिस्तप्रिय, कणखर व्यक्तिमत्व आणि मुत्सद्दी व्यक्तिमत्व याबद्दल आढावा घेतला तसेच अहिल्यादेवी होळकरांनी कधीही इंग्रज सरकारकडून मदत घेतले नाही, इंग्रजी कवायत सुद्धा त्यांनी सेनापती नेमून स्वतःचे स्वतंत्र लष्कर तयार करून घेतली. त्याचबरोबर सामोपचारिक स्वभावामुळे भिल्लांना सुद्धा त्यांनी आपलेसे केले व त्यांच्या न्यायप्रियतेबद्दल प्रसिद्ध होत्या तसेच त्यांनी हुंड्याची प्रथा बंद करण्यासाठी कायदा केला.

# कामती येथे आज सांस्कृतिक कार्यक्रम

**मोहोळ, दि.२७ मार्च-**

कामती बुद्रुक येथील श्रीकृष्ण गुरुकुलच्या ५ व्या वर्धापन दिनानिमित शनिवार, दि.२८ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे, अशी माहिती संस्थेचे संस्थापक प्रा.प्रमोद आवताडे यांनी पत्रपरिषदेत दिली.



९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील, माजी आमदार राजन पाटील, खासदार प्रा.डॉ. ज्योती वाघमारे यांच्यासह विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या मान्यवरांना सिनेअभिनेते मकरंद अनासपुरे, अभिनेत्री वर्षा उसगावकर यांच्या हस्ते आणि माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत गौरविण्यात येणार आहे. यावेळी ज्येष्ठ नेते अर्जुनतात्या पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष हनुमंत निकम, जिल्हा दूध संघाचे उपाध्यक्ष दीपक माळी, जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण समितीचे माजी सभापती राहुल क्षीरसागर, ज्येष्ठ मार्गदर्शक जयसिंग अवताडे, प्राचार्य किशोर शिनगारे, प्राचार्य आप्पासाहेब कोळी, प्रा. ज्ञानेश्वर शिंदे उपस्थित होते.



# विमानतळ मुख्य प्रवेशद्वाराजवळील गवताला आग

## महापालिका अग्निशामक दलाने आणली आग आटोक्यात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ मार्च-**

होटगी रोडवरील सोलापूर विमानतळाच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या परिसरातील गवताला अचानकपणे आज रात्री ८:४५ च्या सुमारास आग लागली.

यामुळे सर्वत्र जमिनीवरील गवतात आग पसरल्याचे चित्र पाहायला मिळाले. ते पाहण्यासाठी परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. दरम्यान, महापालिका अग्निशामक दलाने आग आटोक्यात आणली.

सोलापूर विमानतळाच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या लगत असलेल्या मोकळ्या जागेतील गवताला आज रात्री ८:४५ वाजण्याच्या सुमारास अचानक आग लागली. लाईटच्या खांबावरील शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागली असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आगीची माहिती मिळताच अग्निशामक दलाचे सहाय्यक अधीक्षक अच्युत दुधाळ यांनी तत्काळ होटगी नाका येथील अग्निशामक दलाची गाडी रवाना केली.

त्यानंतर त्या परिसरातील आग अग्निशामक दलाच्या गाडीने पाणी मारून आटोक्यात आणली. काही वेळात ही आग विझवण्यात आली. यामुळे पुढील धोका टाळला. ही आग पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## स्थायी व परिवहन समिती सभापतींची बिनविरोध निवड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ मार्च :** लातूर शहर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापतीपदी सचिन बंडापल्ले व परिवहन समितीच्या सभापतीपदी फैजलखान कायमखानी यांची बिनविरोध निवड करण्यात आली. पिठासीन अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी सौ.वर्षा ठाकूर- घुगे यांनी काम पाहिले.

यावेळी मनपा आयुक्त श्रीमती मानसी, अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त डॉ.पंजाबराव खानसोळे, जिल्हा सह आयुक्त अजितकुमार डोके व नगर सचिव अश्विनी देवडे यांची प्रमुख उपस्थिती होती.स्थायी व परिवहन समिती सभापती निवडीसाठी दि.१७ मार्च पासुन अर्ज विक्री करण्यात आली व २० मार्च रोजी अर्ज स्विकृती करण्यात आली.या दोन्ही पदांसाठी प्रत्येकी एकच अर्ज आल्यामुळे निवड बिनविरोध झाली.

सकाळी ११ वाजता पिठासीन अधिकारी सौ.वर्षा ठाकूर घुगे यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली. प्रथम स्थायी समिती सभापतींची निवड करण्यात आली. या बैठकीस स्थायीच्या सर्व १५ सदस्यांची उपस्थिती होती. प्रथम अर्जाची छाननी केल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी सचिन बंडापल्ले यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले. परिवहन समिती सभापती पदासाठीही फैजलखान जकीखान कायमखानी यांचा एकमेव अर्ज होता. त्याची छाननी करण्यात आली. त्यानंतर बिनविरोध निवड घोषित करण्यात आली.या बैठकीस परिवहन समितीचे ११ सदस्य उपस्थित होते. निवडीनंतर जिल्हाधिकारी व आयुक्तांनी दोन्ही सभापतींचा सत्कार केला. महापौर सौ. जयश्री सोनकांबळे यांच्या दालनातही दोन्ही सभापतींचा सत्कार करण्यात आला.



## विविध वृत्त...

### अत्याचार पीडित कुटुंबांना शासकीय नोकरीचा आधार

**लातूर :** अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियमांतर्गत गंभीर गुन्ह्यातील पीडित कुटुंबांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयाची लातूर जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी सुरू झाली आहे. याअंतर्गत, पात्र ठरलेल्या १७ वारसदारांना बुधवारी जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीच्या बैठकीत अप्पर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर यांच्या हस्ते शासकीय सेवेचे नियुक्ती आदेश प्रदान करण्यात आले. यावेळी समाज कल्याण सहायक आयुक्त यादव गायकवाड, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, पोलीस उपाधीक्षक दिलीप सगर यांच्यासह संबंधित अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने २० नोव्हेंबर २०२५ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९ (सुधारित अधिनियम २०१५) अंतर्गत दाखल खून किंवा अत्याचाराच्या अनुषंगाने मृत्यू झालेल्या प्रकरणातील दिवंगत व्यक्तीच्या कुटुंबातील एका पात्र वारसास शासकीय किंवा निमशासकीय नोकरी देण्याची तरतूद करण्यात आली आहे. या निर्णयानुसार, पात्र वारसदारांना गट-क व गट-ड संवर्गातील पदांवर सामावून घेण्याची सविस्तर कार्यपद्धती विहित करण्यात आली असून, या नियुक्तीस अंतिम मंजुरी देण्याचे अधिकार पुणे समाज कल्याण आयुक्तालय, यांना प्रदान करण्यात आले आहेत. लातूर जिल्ह्यातील प्रकरणांची छाननी करून समाज कल्याण आयुक्तालयाने अनुसूचित जाती प्रवर्गातील एकूण २३ वारसदारांच्या नियुक्तीस मंजुरी दिली होती. त्यापैकी पहिल्या टप्प्यात १७ पात्र वारसदारांना बुधवारी प्रत्यक्ष नियुक्ती आदेश देऊन त्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्यात आले. उर्वरित प्रकरणांची प्रक्रियादेखील प्रशासकीय स्तरावर गतीने सुरू आहे. याप्रसंगी समाज कल्याण सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड यांनी सर्व नवनियुक्त कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आणि त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच सर्वांचे भारतीय संविधानाची प्रत देवून स्वागत करण्यात आले.

### समाज माध्यमांचा समाज हितासाठी सकारात्मक वापर करावा : प्रो. डॉ. गवई

**लातूर :**आज प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि सोशल मीडियाचा दैनंदिन जीवनामध्ये मोठ्या प्रमाणात वापर होत आहे परंतु यासर्व समाज माध्यमांचा समाजहितासाठी वापर करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील समाजकार्य विभागातील प्रोफेसर डॉ.संजय गवई यांनी केले. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ''जिल्हास्तरीय युवक-युवती नेतृत्व विकास शिबिरात'' ते ''समाज माध्यमांचा सकारात्मक वापर'' या विषयावर प्रमुख व्याख्याते म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रो.(डॉ.)राजाभाऊ पवार हे होते तर विचारमंचावर कार्यक्रमाधिकारी प्रो.(डॉ.)प्रमोद चव्हाण, डॉ.अरुण साळुंखे आणि डॉ.समीना शेख उपस्थित होते.‌ढे बोलताना डॉ.गवई म्हणाले की, समाज माध्यमांचे प्रमुख तीन प्रमुख प्रकार आहेत यामध्ये प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि सोशल मीडिया यांचा समावेश होतो. सोशल मीडियाचा सुजाण वापर केल्यास शिक्षण, व्यवसाय, संवाद आणि समाजजागृती यासाठी ते अत्यंत प्रभावी साधन ठरू शकते. आजच्या डिजिटल युगात तरुणांना रील्स, व्हिडिओ आणि विविध डिजिटल कंटेंट तयार करून उत्पन्नाचे नवे मार्ग उपलब्ध झाले आहेत. मात्र, या माध्यमाचा वापर करताना जबाबदारी, सत्यता आणि नैतिक मूल्यांचे पालन करणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रो.(डॉ.)राजाभाऊ पवार म्हणाले की, समाज माध्यम हे लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असल्याचे नमूद करत, त्याचा वापर समाजहित आणि जनजागृतीसाठी करण्याचे आवाहन केले.

### उत्कृष्ट ग्रंथ परीक्षण स्पर्धेत कु.पंकजा पांडुरंग कापसे प्रथम

**लातूर :** दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर येथील ग्रंथालय विभागामार्फत विद्यार्थ्यांच्या वाचनासोबतच लेखन कौशल्याला प्रोत्साहन देण्यासाठी ''उत्कृष्ट ग्रंथ परीक्षण'' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा ऑगस्ट २०२५ ते २८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत घेण्यात आली.या स्पर्धेत महाविद्यालयातील एकूण १३९ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सहभागी विद्यार्थ्यांनी विविध विषयांवरील पुस्तके वाचून त्यावर १००० शब्दांपेक्षा अधिक शब्दांत परीक्षण लिहून ग्रंथालयात सादर केले. या कालावधीत विद्यार्थ्यांकडून एकूण ३१२ पुस्तकांचे परीक्षण ग्रंथालयात जमा झाले.या स्पर्धेत कु.पंकजा पांडुरंग कापसे (एम.कॉम प्रथम) यांनी ''पैसे नव्हे तर पैशाचे मानसशास्त्र'' या पुस्तकाचे उत्कृष्ट परीक्षण लिहून प्रथम क्रमांक मिळविला. द्वितीय क्रमांक कु. पोरे धनश्री युवराज (बी.कॉम द्वितीय) यांनी ''द एव्हरीडे हिरो मॅनिफेस्टो'' आणि कु.लक्ष्मी बस्वराज कोडे (बी.कॉम प्रथम) यांनी ''महानायक'' या पुस्तकांच्या परीक्षणासाठी मिळविला. तृतीय क्रमांक कु.चैताली कुमार चिकटे (बी.सी.ए प्रथम) यांनी ''द सीक्रेट (रहस्य)'' आणि कु.मनीषा गजानन पवार (बी.कॉम प्रथम) यांनी ''सार्थ श्री ज्ञानेश्वरी'' या पुस्तकांच्या परीक्षणासाठी मिळविला.

# धार्मिक स्थळावरील चोरी प्रकरणाचा उलगडा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ मार्च :** लातूर तालुक्यातील कव्हा येथील धार्मिक दर्ग्यात चोरीकरणाऱ्या आरोपीच्या पोलिसांनी मुसक्या आवळल्या असून या प्रकरणाचा उलगडा करण्यात यश मिळवले आहे.



लातूर जिल्ह्यातील धार्मिक स्थळांवरील चोरीच्या घटनांकडे गांभीर्याने लक्ष देत लातूर जिल्हा पोलीस दलाने कठोर व प्रभावी कारवाई करत दर्गाच्या दरवाज्याचे कुलूप तोडून चोरी केलेल्या प्रकरणातील आरोपीस ताब्यात घेऊन गुन्ह्याचा यशस्वी उलगडा केला आहे. धार्मिक स्थळांवरील अशा घटनांमुळे नागरिकांच्या भावना दुखावल्या जात असल्याने पोलीस प्रशासनाने या प्रकारच्या गुन्ह्यांविरोधात विशेष मोहीम राबविली आहे.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या नेतृत्वाखाली तसेच अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा, लातूर यांनी ही कारवाई यशस्वीरित्या पार पाडली आहे.

मौजे कव्हा, ता. लातूर येथील दर्ग्यामध्ये अज्ञात इसमाने कुलूप तोडून चोरी केल्याची घटना घडली होती. या घटनेत दर्ग्यातील धार्मिक महत्वाच्या चांदीच्या वस्तू, विशेषतः चांदीचे घोडे व पाळणे चोरीस गेले होते. या प्रकरणी लातूर ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या आदेशानुसार विशेष पथकाने तपास सुरू ठेवला असता गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे अहमदपूर येथे संशयित इसम

इस्माईल दस्तगिर शेख (वय ४३ वर्षे, रा. इनामनगर किल्लारी, ता. सध्या रा. दापका निलंगा, जि. लातूर) यास ताब्यात घेतले असता आरोपीने कबूल केले की, त्याने कवा येथील दर्ग्याचे कुलूप तोडून तेथील धार्मिक चांदीच्या वस्तू चोरी केल्या होत्या. आरोपीने चोरी केलेला मुद्देमाल मुद्देमाल जप्त करण्यात आला असून त्याच्याकडून चांदीचे घोडे - ११७ नग, चांदीची लहान व मोठी पाळणे - १९८ नग असा एकूण ४ किलो ६१६ ग्रॅम वजनाचे अंदाजे २ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ,पोलीस अमलदार माधव लक्ष्मण बिलापट्टे, रामलिंग शिंदे, नवनाथ हासबे, तुराब पठाण,मोहन सुरवसे,विजय पाटील, श्रीनिवास जांभळे यांनी केली. आरोपीस पुढील तपास कामी पोलीस ठाणे लातूर ग्रामीणच्या ताब्यात देण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.

सर्व धार्मिक स्थळांवरील चोरी, तोडफोड किंवा कोणत्याही प्रकारचा अवमान करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणारआहे असा इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे.

### स्काऊट आणि गाईड कार्यालयाच्यावतीने केशवराज विद्यालयास विशेष पुरस्कार



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ मार्च :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयास महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट आणि गाईड कार्यालय, लातूर यांच्यावतीने खरी कमाई सेवा महोत्सव व सर्वाधिक युनिट नोंदणी बक्षीस वितरण समारंभात केशवराज विद्यालयाने सर्वाधिक खरी कमाई केल्याबद्दल विशेष पारितोषिक देऊन विद्यालयाचा गौरव करण्यात आला. महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट आणि गाईड राज्य कार्यालय, लातूर यांच्यावतीने सन २०२५ - २६ या वर्षाचे दि. १० डिसेंबर २०२५ ते १० जानेवारी २०२६ या कालावधीत आयोजित केलेल्या खरी कमाई सेवा महोत्सवात केशवराज माध्यमिक विद्यालयाने सर्वाधिक खरी कमाई केली असल्यामुळे विद्यालयास विशेष पारितोषिक प्राप्त झाले. हे पारितोषिक विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, अभ्यासपूरक मंडळ प्रमुख श्रीमती रेणुका गिरी, विद्यालयातील स्काऊट आणि गाईड विभाग प्रमुख श्रीमती करुणा सातपुते यांनी स्वीकारले. यावेळी विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक जितेंद्र जोशी, स्काऊट गाईड विभाग प्रमुख श्रीमती करुणा सातपुते, परिपाठ प्रमुख श्रीमती लता कुलकर्णी यांची उपस्थिती होती.

## दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या युवातरंग वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ मार्च :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या दि.२४ ते २५ मार्च २०२६ या दरम्यान दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांच्या मार्गदर्शनानुसार आयोजित करण्यात आलेल्या युवातरंग वार्षिक स्नेहसंमेलन-२०२६ ची मोठ्या आनंदमय वातावरणात सांगता झाली.सदरील वार्षिक स्नेहसंमेलनात आनंद नगरीमध्ये विद्यार्थ्यांनी विविधांगी खाद्यपदार्थाचे स्टॉल्स उभारले होते, यातून त्यांना व्यवसायिकतेचे प्रत्यक्ष धडेही मिळाले.वार्षिक स्नेहसंमेलन हे केवळ कलावंत घडविणारे व्यासपीठ नव्हते तर सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणाऱ्या अनुभवांची अनमोल शिदोरी होती.संगीत व साधे शेलापागोट्याच्या माध्यमातून तरूणाईमधील आनंद,उत्साह दिसून आला. विद्यार्थ्यांनी केलेली रंगीबेरंगी पोशाखाची झगमगाट, रंगीबेरंगी फेट्यांचा साज,सुरूची भोजनाचा आस्वाद, मराठी, हिंदी गाण्याच्या बोलावर थिरकणारी तरूणाईची पावलं या सर्वांच्या माध्यमातून तरुणाईचा उत्साह दिसून आला.

## एम एस बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात उद्योजकता जागरूकता या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ मार्च :** येथील एम एस बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात इंडो जर्मन टूल रूम,छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने उद्योजकता जागरूकता या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा पार पडली. श्री सुरज चंचलानी,डायरेक्टर सीबीएफसी लिमिटेड यांनी विद्यार्थ्यांना या विषयावर मार्गदर्शन केले तसेच शासनामार्फत चालवल्या जाणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली ज्यामुळे हे सत्र विद्यार्थ्यांसाठी अत्यंत फायदेशीर ठरले. तसेच विद्यार्थ्यांना उद्योजकतेच्या संधी शोधण्यासाठी मोलाचे ज्ञान आणि प्रेरणा मिळाली. या कार्यशाळेत अभियांत्रिकीच्या तृतीय वर्षातील



विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

यावेळी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे प्रमुख प्रा.श्रीकांत नागुरे,डॉ. ओमप्रकाश शिवपुजे,श्री संतोष सांगवे तसेच समन्वयक प्रा.राहुल व्यवहारे, प्रा. सुरज बिराजदार यांनी सर्व प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडली.

या कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष श्री. माधवराव पाटील चिंचोलीकर, सचिव श्री. माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव श्री. सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष श्री. विजय रेवडकर, कार्यकारी संचालक श्री. प्रदीप दिंडेगावे, संचालक श्री. राजेश्वर बुके, श्री. बसवराज येरटे, श्री.एड. काशिनाथ साखरे, सौ. ललिताताई पांढरे, श्री. महेश हलगे, श्री. बाबुराव तरगुडे व श्री. गुरुलिंग धाराशिवे यांनी संबंधित प्राध्यापकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे परिसर संचालक डॉ. मोहन बुके, प्राचार्य डॉ. शेखर जगदे, उपप्राचार्य वीरभद्र बाळे तसेच निबंधक डॉ. सौ. ज्योती पाटील यांनीही या उपक्रमाचे व संबंधित प्राध्यापकांचे अभिनंदन केले.

## रामेश्वर (रुई) येथे भक्तिमय उत्साहाच्या वातावरणात प्रभू श्रीराम जन्मसोहळा आणि श्रीराम रथ उत्सव संपन्न

### दुष्ट शक्तीचा नाश व धर्म रक्षणासाठी प्रभू रामाचा जन्म - दिवेगावकर महाराज

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ मार्च :** भारतीय संस्कृती, परंपरा, तत्त्वज्ञान, त्याग आणि समर्पणाचे मूर्तीमंत प्रतीक, समस्त भारतीयांचे श्रध्दास्थान असलेल्या मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीराम जन्मसोहळ्याच्या निमित्ताने सर्वधर्मसमभावाचे प्रतीक असलेले भारतीय संस्कृती दर्शन श्रीराम रथ यात्रा सोहळा रामनवमी गुरुवार रोजी मोठ्या उत्साहाच्या आणि भक्तिमय वातावरणात लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर (रूई) येथे पार पडला. या सोहळ्यास रामेश्वर आणि पंचक्रोशीतील भाविक भक्त नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी भाजपा नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड हे आवर्जून उपस्थित होते.

प्रभू श्रीराम जन्मसोहळ्याच्या निमित्ताने २६ मार्च २०२६ गुरुवार रोजी सकाळी पूर्णब्रह्मयोगिनी त्यागमूर्ती श्रीमती प्रयागअक्का दादाराव कराड यांनी श्रीराम मंदिरास अर्पण केलेल्या सुंदर, रेखीव व वैशिष्ट्यपूर्ण अशा भारतीय संस्कृती दर्शन- श्रीराम रथाची, रामेश्वर गावत ग्रामप्रदक्षिणा झाली. या रथयात्रेत वाजंत्रीसह विविध भजनी मंडळी, टाळकरी, असंख्य भव्य ध्वज हातात घेऊन प्रभू रामचंद्राचा जयघोष करीत भाविक भक्त सहभागी झाले होते. मोठ्या उत्साहाच्या आणि भक्तीवातावरणात निघालेल्या या रथयात्रेत महिला पुरुष सर्व स्तरातील नागरिक हजारोंच्या संख्येने सहभागी झाले होते.

या रथ यात्रेचा समारोप प्रभू श्रीराम मंदिरात झाला याप्रसंगी ह.भ.प. हरिहर महाराज दिवेगावकर यांचे कीर्तन झाले. कीर्तनातून



बोलताना हरिहर महाराज यांनी प्रभू श्रीराम हे विष्णूचा सातवा अवतार होते. प्रभू रामाचे ईश्वर म्हणजेच रामेश्वर असल्याचे सांगून त्रितायुगात दुष्टशक्तीचा नाश करण्यासाठी आणि धर्मरक्षण करण्यासाठी मानवाला सन्मार्गावर आणण्यासाठी जन्म झाला. प्रभू श्रीराम मर्यादा पुरुषोत्तम असून त्यांचे जीवन सत्य, त्याग, कर्तव्य, एक वचनी, एक पत्नी असा नैतिक मूल्याचा आदर्श आहे असे त्यांनी बोलून दाखवले.

ह.भ.प. हरिहर महाराज दिवेगावकर यांच्या कीर्तनानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. महाप्रसादाचा हजारो भाविकांनी लाभ घेतला. श्रीराम रथ यात्रा सोहळ्यास रामेश्वर येथील ज्येष्ठ मार्गदर्शक तुळशीरामअण्णा कराड, प्रतिष्ठित शेतकरी काशीरामनाना कराड, माईर्स पुणे एमआयटीचे मंगेशबापू कराड, भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड, एमआयटीचे डॉ. हनुमंत कराड, बालासाहेब कराड, संत गोपाळ बुवा महाराज साखर कारखान्याचे चेअरमन राजेश कराड, भाजपाचे विक्रमकाका शिंदे, महेंद्र गोडभरले, महेंद्र जाधवर, डॉ. सौरभ कराड, भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा कराड, तेजस कराड, पृथ्वीराज कराड, राजवीर कराड यांच्यासह संपूर्ण कराड परिवाराची प्रमुख उपस्थिती होती. रामेश्वर आणि परिसरातील भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### जाहीर प्रगटन

लातूर जिल्हा व परिसरातील विशेषतः लातूर ता. जि लातूर येथील तमाम जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार चंद्रकांत किसन भोसले रा. गोविंदनगर रेणापुर ता. रेणापुर जि. लातुर यांनी मला दिलेल्या माहितीवरून व दाखविलेल्या कागदपत्रावरुन तसेच मला वकील म्हणुन अधिकृत केले वरुन सर्व जनतेच्या माहितीस्तव खालीलप्रमाणे जाहीरप्रगटन देत आहे. माझे पक्षकार यांनी विद्यमान मालक शशिकांत वसंतराव सोळुंके रा. राघवेंद्र कॉलनी, जुना औसा रोड, लातूर यांच्या खरेदी, कब्जे वहीवाटीचा घर जागा मौ. खाडगांव ता. जि. लातूर असुन यांचा एनए नं. १९८२/जेएमबी/डब्ल्युएस/१४९७ दिनांक. ०१/०९/१९८२ तहसिलदार लातुर यांनी मंजुर केलेल्या पैकीचा प्लॉट नं. १३, असुन सदर घरजागेची साईज लांबी पूर्व पश्चिम ५० फुट (१५.२४ मि) रुंदी दक्षिण उत्तर ४५ फुट (१३.७२) मि. एकुण क्षेत्रफळ २२५० चौ.फुट (२०९.१० चौ.मि.) सदर विक्री करत असलेल्या प्लॉटची चतुर्सीमा खालीलप्रमाणे :

पुर्वेस :- रस्ता
पश्चिमेस :- प्लॉट नं. ८
दक्षिणेस :- प्लॉट नं. १२
उत्तरेस :- सुरेश व्यंकटराव कोहाळे यांचा प्लॉट

येणे प्रमाणे वरील चतुर्सीमेच्या आतील घरजागेत आज स्थितीत एकुण ५ रुम व संडास बाथरुम सहीत व पाण्याचा बोर आरसीसी बांधकाम केलेले असुन विद्यमान मालकाकडुन शशिकांत वसंतराव सोळुंके रा. राघवेंद्र कॉलनी, जुना औसा रोड, लातुर यांच्याकडून ठरावपत्र करुन घेवून माझ्या पक्षकारासोबत सदरची घर जागा कायम स्वरुपी विक्रीचा लेखी ठरावपत्र साक्षदारासमक्ष करुन देवून इसारापोटी काही रक्कम माझे पक्षकाराकडून स्विकारली आहे व उर्वरित रक्कम खरेदीखताच्या वेळी देण्याचे ठरले आहे. तसेच सदरचे घर जागा निर्विवाद व निर्जोखीम असल्याची हमी माझे पक्षकारास विद्यमान मालकानी दिलेली आहे. तरी सदरचे घर जागा जर कोणाचा उजर, आक्षेप, हीतसंबंध, हक्कसंबंध, कर्जबोजा, गहाणखत, बक्षिसपत्र, कोर्टडिक्री, मृत्युपत्र, तारण, लीज, शेजाऱ्याचा वाद, शासकीय अथवा निमशासकीय कर्जबोझा, न्यायालयीन वाद असतील तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिद्ध झाले पासून सात (०७) दिवसाचे आत माझे खालील दिलेल्या कार्यालयीन पत्यावर योग्य त्या कागदपत्रांसह लेखीउजर / आक्षेप दाखल करावा व त्याची रितसर पोहंच घ्यावी. मुद्दतीमध्ये जर कोणाचा उजर / आक्षेप नाही आल्यास सदर चा घर जागा हे निर्विवाद व निर्जोखीम आहे असे गृहित धरून माझे पक्षकार सदरील घर जागाचे नोंदणीकृत खरेदी खत मुळ मालकाकडून आपल्या हक्कात करून घेतील व त्यानंतर येणारे उजर / आक्षेप माझे पक्षकारावर बंधन कारक राहणार नाहीत याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

सबब हे जाहीरप्रगटन.
दिनांक : २७/०३/२०२६

जाहिर प्रगटन देणार
**चंद्रकांत किसन भोसले**
**रा. गोविंदनगर रेणापुर ता. रेणापुर**
**जि. लातुर मो. ९०९६४०५१७३**

**तर्फे**
**ॲड.सौ. स्नेहा पी. शेट्टी (रघोजी)**
**(नोटरी भारत सरकार) रा. फ्लॅट नं.११,**
**व्ही.एस. प्लाझा, सुतमिल रोड,**
**मंत्रीनगर ॲटो पॉईट जवळ, लातूर.**
**कार्यालयीन पत्ता: बचत भवन समोर,**
**लातूर मो.९४०३५३६२१२, ९८६००२४८३८**

## संक्षिप्त...

### रेणापूरात राम नवमी उत्सव उत्साहत




रेणापूर - प्रति वर्षा प्रमाणे याही वर्षी येथील श्रीराम मंदीरात वैष्णव बैरागी मंडळ व मारवाडी समाज व टेकाळे परिवार समस्त रेणापूर येथील ग्रामस्थ मंडळ यांच्या वतीने प्रभु श्रीराम नवमी जन्म उत्सव मोठ्या उत्साह त भक्ती भावाने साजरा करण्यात आला

प्रभुश्रीराम नवमी उत्सवा निमीत गुढी पाडव्याच्या शुभ मुहर्तवर श्रीराम कथेचेआयोजन करण्यात आले होते . तसेच गेली आठदिवसा पासून पाहाटे काकडा सकाळी पारायन दुपारी हभप गणपत महाराज दरोडे यांच्या वाणीतून श्रीराम कथा व संध्याकाळी हारीपाठ त्यानंतर हरिजागर झाले. त्याची सांगता आज गुरुवार दि.२६ रोजी हरीभक्त पारयाण गणपत महाराज दरोडे यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली . काल्याच्या कीर्तन झाले.

प्रभु श्रीराम यांचा पाळण्याचे गायण झाले त्यानंतर प्रभुश्रीरामचंद्रकी जयच्याघोषानंतर माहाप्रसादाचे आयोजन करण्यात आले त्याचा लाभ रेणापूर सह परिसरातील भविक भक्तानी घेतला.

### साईशिवालय साईनंदनवनम् येथील प्रभू श्रिराम मंदिरात रामनवमी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा



**चाकूर :** चाकूर येथील साईशिवालय साईनंदनवनम येथे प्रभू श्रीराम जन्मोत्सव सोहळा अत्यंत भक्तिमय वातावरणात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी ७ वाजता राम, लक्ष्मण आणि सीता यांच्या मूर्तींचा अभिषेक करून विधिवत पूजा करण्यात आली.राम जन्मोत्सवामुळे मंदिराला अतिशय देखणी आणि आकर्षक सजावट करण्यात आली होती.त्यानंतर दुपारी १२ वाजता प्रभू श्रीरामाचा जन्मोत्सव सोहळा पार पडला.

साईशिवालय साईनंदनवन संस्थानचे सचिव विशाल जाधव यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली, त्यानंतर गुलालाची उधळण करण्यात आली.चापोली आणि चाकूर येथील महिला भजनी मंडळांनी प्रभू श्रिरामाचा पाळणा घालता.उपस्थीत भक्तांनी प्रभू श्रिरामाचा जयघोष करून जल्लोषात श्रिराम राम नवमी उत्सव साजरा करण्यात आला. त्यानंतर भजनाचा कार्यक्रम सादर केला.या मंगलप्रसंगी अमोल पवार, तातेराव शिंदे, सुभाष काटे, दिलीप भडादे, शिवलिंग गादगे यांच्यासह चाकूर परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### एम .टी .एस .परीक्षेत श्रीराम प्राथमिक विद्यामंदिरचे घवघवीत यश



**रेणापूर-** श्रीराम प्राथमिक विद्यामंदिर रेणापूरच्या विद्यार्थ्यांनी एम.टी.एस. परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. जाने. २०२६ मध्ये झालेल्या एम.टी.एस . परीक्षेत या विद्यालयातील श्रवण सप्ताळ व दिव्यांका नवल या विद्यार्थ्यानी घवघवीत यश मिळविले. श्रवण सप्ताळ २०० पैकी १६२ गुण घेउन राज्यात १७ वा तर जिल्हयात ९वा आला तर दिव्यांका नवल राज्यात ३५ वी केंद्रात ३री आली. २०० पैकी १०४ गुण तीने प्राप्त केले.विद्यार्थ्यास शाळेच्या मार्गदर्शक शिक्षिका कल्पना कांबळे, सुरेखा बस्तापुरे,बबीता अकनगिरे, विलास येलाले यांचे मार्गदर्शन लाभले.रेणुका शिक्षण संस्थेचे अध्यक्ष देविदासराव कुटवाड, सचिव ॲड. पंडितराव उगीले, प्राचार्य सिद्धेश्वर मामडगे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सतीश मोरे,पर्यवेक्षक अनिल कुटवाड प्रा. भरत धायगुडे यांनी अभिनंदन केले. परीसरातील शिक्षण प्रेमी नागरीकाकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### घरगुती गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत ठेवा

**लातूर :** आखाती युद्धाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेली स्थिती लक्षात घेता, जिल्ह्यातील घरगुती गॅस सिलिंडरचा पुरवठा खंडित होणार नाही याची दक्षता घ्यावी. गॅस वितरणाबाबत पारदर्शकता राखावी आणि कोणत्याही परिस्थितीत अवैध विक्री होणार नाही यावर नियंत्रण ठेवावे, अशा सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे दिल्या. लातूर जिल्ह्यातील गॅस सिलिंडर वितरण व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्ह्यातील सर्व गॅस एजन्सीधारक आणि सेल्स ऑफिसर्सची बैठक झाली. जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकटेश रावलोड यांच्यासह संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते. गरजू आणि पत्र ग्राहकांनाच गॅसचा पुरवठा व्हावा, यासाठी एका गॅस कनेक्शनधारकाला २५ दिवसांच्या आत दुसरे सिलिंडर देण्यात येऊ नये. ऑनलाइन बुकिंग केलेल्या ग्राहकांना १०० टक्के घरपोच डिलिव्हरी देण्यात यावी. वितरकांनी 'फिफो' आणि ओटीपी प्रणालीचा वापर करून घरपोच सेवा देणे अनिवार्य आहे.

# जिल्हा गॅस टंचाईने त्रस्त मात्र आशिवकर मस्त

**तभा वृत्तसेवा**

**औसा, दि. २७ मार्च :** जागतिक पातळीवर आणि विशेषाकरुन अरब राष्ट्रात युद्धाचे सावट असल्यामुळे पेट्रोल, डिझेल आणि गॅसची चिंता संपूर्ण जगाला सतावत आहे.याचबरोबर देश व राज्यांतर्गत तुटवडा जाणवत आहे.अशा धाकधुकीच्या वातावरणात तालुक्यातील आशिव गावातीत गावर्कयांच्या थेट घरातच गस पाईपलाईनचे कनेक्शन असल्याने गावकरी एकदम मस्त आहेत.

गेल्या महिनाभरापासून अमेरिका, ईस्त्राईल आणि इराण यांच्यात युध्द सुरु झाल्यापासून सप्लाय चैन विस्कळीत झाली आहे. यातून मिळाला तरी तो किती दिवस पुरेल आणि आपल्यापर्यंत कधी येईल. एक तरी सिलेंडर आपल्याला मिळेल का? असा प्रश्न सध्या प्रत्येक कुटुंबाला भेडसावत आहे. सिलेंडर मिळविण्यासाठी बुकींग नंतर



मंजुरी व पुन्हा लाईन मध्ये सलग सहा सहा तास उभा राहून सिलेंडर घ्यावे लागते. अशी परस्थिती लातूर सारख्या जिल्ह्याच्या ठिकाणी आहे असे नाही. औसा शहरातही लाईनमध्ये उभा राहवे लागत आहे. तसेच किल्लारी व उजनी सारख्या मोठ्या खेडेगावातही आज लाईनमध्ये उभा राहून गस सिलेडर घ्यावे लागत आहे.

सर्वत्र अशी बिकट परस्थिती असताना देखील औसा तालुक्यातील आशिव गावात मात्र गसचा अजिबात तुटवडा झाला नाही. बटन दाबलं की गस सुरु. ना नव्या सिलेंडरसाठी नोंदणी करण्याचे टेंन्शन. ना लाईनमध्ये उभे राहून सिलेंडर घरी आणण्याचे कष्ट.या सगळ्या धाकधुकीच्या काळात आशीवकर अत्यंत निवांत आहेत.

गेल्या तीन वर्षापुर्वी भारत पेट्रोलियम आणि ग्रामपंचायत कार्यालयाच्या पुढाकारातून गावात गस पाईपलाईन करण्यात आली आहे. यामधूनच गा-वातील प्रत्येक कुटुंबाला गसचा पुरवठा करण्यात येतो. यामुळे आशिवकर सन २०२२ पासून निवांत आणि निश्र्चित आहेत. या योजनेसाठी नाममात्र डिपाजिट आणि कनेक्शन शुल्क घेण्यात आले. या योजनेतून २४ तास गस पुरवठा करण्यात येतो. सुरुवातीच्या काळात भराव्या लागर्णाय़ा नाममात्र शुल्कामुळे होर्णाय़ा राजकारणामुळे कांही मोजक्या गावर्कयांनी नाराजी व्यक्त केली. परंतू तीच मंडळी आज आमच्याकडे टंचाई नसल्याचे सांगतात.

राज्यात आणि जिल्ह्यात गॅस सिलेंडर साठी चिंतेचे वातावरण असले तरी आशिव ग्रामस्थ मात्र अत्यंत समाधानी आणि बिनधास्त आहेत कारण कोणत्याही अडथळ्याविना गावात घर-ोघरी गॅस पुरवठा सुरु आहे. यामुळे खासकरून महिला वर्गातून आशिवच्या सरपंच आणि ग्रामपंचायतचे कौतुक होत आहे.

**३०% ची बचत - सरपंच कोमल वळके**

घरोघरी पाईपलाईन द्वारे गॅस पुरवठा करणारी मराठवाड्यातील पहिली आशिव ग्रामपंचायत आहे. या योजनेमुळे नागरिकांचे गॅस सिलेंडर बदलणे, नोंदणी करणे, वाट पाहणे आणि जास्त दरात गॅस खरेदी करण्याच्या कटकटीतून मुक्तता झाली आहे. पीएनजी गॅसच्या तुलनेत जवळपास ३० टक्क्यानी स्वतः दरात उपलब्ध होत असल्यामुळे कुटुंबाची आर्थिक बचत होत असल्याचे मत सरपंच कोमल रमेश वळके पाटील यांनी व्यक्त केले.

**युध्दजन्य परस्थितीत अखंड पुरवठा - जयश्री चव्हाण**

ग्रामपंचायतच्या माध्यमातून भारत गसच्या वतीने पाईपलाईन द्वारे नियमित आणि कोणत्याही अडथळ्याविना अखंड आणि स्वस्त दरात गॅस उपलब्ध होत आहे. अश्या युद्धजन्य परिस्थितीत सुद्धा संपुर्ण गावातील कुटुंब अत्यंत निश्र्चित आहोत.असे मत गृहिणी जयश्री विनायक चव्हाण यांनी व्यक्त केले.

# लिंबूचा वाढला तोरा अन् टरबूज उत्पादक शेतकऱ्यांचे वाजले बारा





**तभा वृत्तसेवा/शंकर मिटकर**

**शिरूर अनंतपाळ, दि. २७ मार्च** तालुक्यातील शेतकऱ्यांनी पारंपरिक पिकांना पर्याय म्हणून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेतात टरबुजाची लागवड केली. एकरी सत्तर ते ऐंशी हजार रुपये खर्च करून कठोर परिश्रम घेऊन टरबुजाच्या पीकाची लागवड केली. बाजारात टरबूजाला चांगला भाव असल्यामुळे पिकाची निगा राखण्यासाठी कोणतीच कमी केली नाही.लागवडीसाठी मल्चिंग पेपर, ठिबक सिंचन सुविधा तयार केली.

एकंदरीत ऐंशी ते नव्वद हजार रुपये खर्च करून शेतात कठोर परिश्रम करून तेंव्हा कुठे टरबुज बाजारात आणण्या योग्य झाले आणि त्याचं वेळी घात झाला पंचवीस ते तीस रुपये प्रति किलो दराने विकणारा टरबुज तिन चार रुपयांवर आला.या दरात वाहतूक तर नाहीच पण तोडणी खर्चही निघत नाही.त्यामुळे शेतातून मोफत टरबुज वाटप करण्याची वेळ आली आहे.बाजारात टरबुजाला भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

युद्ध जरी भारतात नसले तरी त्याचा परिणाम भारतातील बाजारपेठेत दिसून येत आहे.युध्दाचे परिणाम निर्यातीवर झाल्याचे सांगुन बाजारात शेतीमालाचे पाडले जात आहे. त्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत आहे.इतर पिकावरही त्याचा परिणाम झाल्याचे शेतकरी वर्गातून बोलले जात आहे.

**अंतरराष्ट्रीय घडामोडींच्या शेतकऱ्यांना झळा**

आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीचा सर्वाधिक फटका आयात निर्यातीवर बसला असून भाजीपाला,फळे व इतर उत्पादने देशाबाहेर जाण्यावर निर्बंध येत आहेत त्यामुळे आता गावपातळीवरील शेतकऱ्यांना सर्वाधिक अर्थीक अडचणीला सामोरे जावे लागत आहे.

**- शेतकरी, भगवानराव पाटील होंडाळा**

# आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते नवीन सेलू वस्तीच्या रस्ता कामाचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर, दि. २७ मार्च :** रेणा-पूर तालुक्यातील मौजे नवीन सेलू वस्तीला जोडणाऱ्या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते शुक्रवारी झाले आ कराड यांची गावात आगमन होताच महिला भजनी मंडळासह ग्रामस्थांनी जोरदार स्वागत केले.

गेल्या अनेक दिवसापासून राज्य रस्ता ते नवीन सेलू वस्ती दरम्यानच्या मजबूत रस्ता व्हावा अशी ग्रामस्थांची मागणी होती रस्त्याची अडचण लक्षात घेऊन आ. रमेशआप्पा कराड यांनी या कामासाठी ४० लाख रुपये लक्ष रुपयाचा निधी जिल्हा नियोजन समिती योजनेतून मंजूर करून दिला.

सदरील मंजूर रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन भाजपाचे नेते आ रमेश आप्पा कराड यांच्या शुभहस्ते मोठ्या उत्साहाच्या वातावरणात शुक्रवारी झाले. याप्रसंगी तहसीलदार प्रशांत थोरात, गटविकास अधिकारी सुमित जाधव, जिप बांधकाम विभागाचे उपअभियंता सुभाष जाधव कनिष्ठ अभियंता सारिका जटाळ भाजपाचे महेंद्र गोडभरले, दशरथ सरवदे, अनिल भिसे, डॉ बाबासाहेब घुले, वसंत



करमोडे, नामदेव बोबडे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

आ कराड यांचे गावात आगमन होताच फटाक्याची आतिषबाजी करत महिला भजनी मंडळानी टाळ मृदंगाच्या गजरात जोरदार स्वागत केले. भूमिपूजन कार्यक्रमाच्या निमित्ताने ग्रामस्थांशी संवाद साधताना सदरील रस्त्याचे काम दर्जेदार व्हावे अशी अपेक्षा व्यक्त करून नवीन सेलू वस्ती पासून सेलू पर्यंत जाणाऱ्या शिव रस्त्याचे काम येत्या काळात केले जाईल असे सांगून आ कराड यांनी शुद्ध पाणीपुरवठ्यासाठी आरो प्लांट मंजूर करू असे बोलून दाखवले.

याप्रसंगी सेलूच्या सरपंच अर्चना बोंबडे,भंडारवाडीचे सरपंच अजय शेळके पाथरवाडीचे सरपंच पुंडलिक सुडे, जवळग्याचे सरपंच निवृत्ती चिद्रे, नानासाहेब माने, दिलीप चोथवे, दिलीप गौंड, गोपाळ पडले, शालिक गोडभरले, सुरेश बुड्डे, प्रताप राऊतराव, गोविंद पनगुले, प्रल्हाद फुलारी, राजू मानमोडे, संगमेश्र्वर तत्तापुरे, अंबादास राठोड, राजू कांबळे, मनोहर सुरवसे, सोमनाथ फुलारी, मनोहर चित्ते, पवन बेंबडे, अभी येरेकर, प्रभू धोपटे, आबा भोसले, योगेश पनगुले, विष्णू मलवाड, अरुण बाळे, दिगंबर जाधव, संतोष बोळगे, सुमित पाटील, रणजीत पाटील, भानापुरे गुरुजी, मधुकर बसतापुरे, अंकुश मोटेगावकर, निखिल पनगुले, सोपान भोसले,यांच्यासह अनेक जण होते.

# राजभवन येथे भव्य शिवस्मारक करण्यासाठी संभाजी ब्रिगेडची मागणी

## उपजिल्हाधिकारी मार्फत मुख्यमंत्री यांना दिले निवेदन

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. २७ मार्च :** विश्र्ववंद्य छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण जगाचे ऊर्जा स्त्रोत असून जगातील एकमेव आदर्श राजे होते. त्यांचे भव्य शिवस्मारक उभे रह-ावे ही सर्व भारतीयांची इच्छा आहे परंतु त्या साठी योग्य व सक्षम निर्णय घेतला जात नाही. या विषयावर संभाजी ब्रिगेड ने वेळोवेळी पाठपुरावा सुरू ठेवलेला आहे. महोदय, आपण विरोधी पक्षात असताना आम्हला आश्र्वस्त केलं होतं की भाजपा सत्ते मध्ये आल्या नंतर शिवस्मारक उभं करणार. आपल्या आश्र्वासनाला जनतेनी साथ दिली व छत्रपतींनी आशीर्वाद दिले आणि २०१४ मध्ये तुम्ही सत्ते मध्ये आलात. मात्र शिवस्मारकासाठी साठी योग्य ठिकाण राजभवन असताना तुम्ही अरबी समुद्रात शिवस्मारक उभं करण्याचा घाट घातला, जो अशक्य होता. याला संभाजी ब्रिगेड ने विरोध करून देखील तुम्ही देशाचे प्रधानमंत्री मा. नरेंद्र मोदीं यांना निमंत्रित करून भूमिपूजन उरकून घेतले. यात



जनतेच्या करातून गोळा केलेला पैसा पाण्यात घातला हे वास्तव आहे.

आज आम्ही पुन्हा आपणा कडे विनंती करतो की छत्रपती शिव-ाजी महाराजांचे भव्य शिवस्मारक हे राजभवन या ठिकाणी उभे करणे योग्य असून. निसर्ग सुंदर वातावरण, पुरेशी व प्रशस्त जागा, वर्षभर पर्यटकांना उपलब्ध असे ठिकाण आहे तरी या शिवस्मारका साठी सरकारने तत्काळ मंजुरी देऊन हे काम सुरू करावे ही विनंती.

अन्यथा छत्रपती शिवरायांच्या सन्मानात संभाजी ब्रिगेड ला मोठे आंदोलन उभे करावे ला-गेल. आपण सुज्ञ आहात तरि आपण तात्काळ निर्णय घेऊन कार्यवाही सुरू करावी.या निवेदना-वर संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रमोद कदम, तालुकाध्यक्ष परमेश्र्वर बोधले,तालुका उपाध्यक्ष कुणाल पाटील,संघटक परमेश्र्वर नांगरे, शहराध्यक्ष अमोल गवळी संघटक परमेश्र्वर जाधव,तालुका संघटक प्रदीप कदम,शिवदास मोरे,मोहोम्मद पटेल, दत्ता बगदुरे, प्रेमनाथ कळसे, मुकिंद कदम, गोविंद कदम, अविनाश क्षीरसागर आदीच्या स्वाक्षरी आहेत.

# संविधानिक मूल्ये अंगीकारल्याशिवाय जबाबदार नागरिक घडत नाहीत : डॉ. अशोक नारनवरे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ मार्च :** भारत शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर संचलित जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'जिल्हास्तरीय युवक-युवती नेतृत्व विकास शिबीर' अंतर्गत ''संविधानिक मूल्य आणि जबाबदार नागरिक'' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान पार पडले.

या प्रसंगी प्रमुख वक्ते डॉ. अशोक नारनवरे (मराठी विभाग, मास्टर दिनानाथ मंगेशकर महाविद्यालय, औराद शहाजानी) यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, ''भारतीय संविधानाने प्रत्येक सामान्य नागरिकाला केवळ अधिकारच दिले नाहीत, तर त्यासोबत जबाबदाऱ्यांची जाणीवही दिली आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता, समानता आणि सर्वधर्मसमभाव ही मूल्ये समाजव्यवस्थेचा पाया आहेत. 'स्व' ऐवजी 'आपण' ही भावना अंगीकारल्याशिवाय राष्ट्राची एकता आणि व्यक्तीची प्रतिष्ठा टिकू शकत नाही.''

ते पुढे म्हणाले, ''संविधानिक मूल्यांचे पालन केल्यास समाजात सौहार्द, न्याय आणि समतेचे वातावरण निर्माण होते. युवकांनी संविधानाचा सखोल अभ्यास करून त्यातील मूल्ये आपल्या आचार-विचारात उतरवली पाहिजेत. तेव्हाच खऱ्या अर्थाने जबाबदार नागरिक घडू शकतील.''

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना डॉ. हरिश्चंद्र चौधरी (राज्यशास्त्र विभाग प्रमुख, जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर) म्हणाले की, ''विद्यार्थ्यांनी संविधानिक मूल्ये केवळ अभ्यासापुरती मर्यादित न ठेवता ती आपल्या



दैनंदिन जीवनात अंगीकारणे अत्यंत गरजेचे आहे. संविधानाचे ज्ञान हे केवळ परीक्षेसाठी नसून ते भविष्य घडविण्याचे प्रभावी साधन आहे.''ते पुढे म्हणाले, ''संविधानाची जाणीव असलेला युवकच समाजात सकारात्मक बदल घडवू शकतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी संविधानाच्या तत्वांचा आदर राखत जबाबदार नागरिक म्हणून आपली भूमिका पार पाडावी.'' या कार्यक्रमास कार्यक्रमाधिकारी डॉ. केशव आलगुले, डॉ. प्रमोद चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. या व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांमध्ये संविधानिक मूल्यांविषयी जागरूकता निर्माण होऊन जबाबदार नागरिकत्वाची जाणीव अधिक दृढ होण्यास मदत होणार असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# तुळसाबाई लोंढे यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**शिरूर अनंतपाळ, दि. २७ मार्च :** शिरूर अनंतपाळ तालुक्यातील येरोळ येथील जिल्हा परिषद शाळ-ेतील इयत्ता आठवी वर्गात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी एनएमएमएस २०२५/२०२६च्या परिक्षेत उत्तीर्ण होऊन शिष्यवृत्तीसाठी पात्र झालेल्या जिल्हा परिषद गटाअंतर्गत येणाऱ्या गावातील सर्व शाळेतील शिष्यवृत्ती पात्र गुणवंत विद्यार्थ्यांचा जिल्हा परिषद सदस्या सौ तुळसाबाई जगदीप लोंढे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला सदस्य पदी निवड होताच पहिलाच कार्यक्रम स्वखर्चाने करून गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करुन कौतुकाची थाप दिल्याने विद्यार्थी वर्गात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

येरोळ जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता आठवी एनएमएमएस परिक्षेत उत्तीर्ण झालेले विद्यार्थी स्वाती रंगनाथ पालकर,सिंधू परमेश्र्वर सगर,प्रिती बाल-ाजी लोंढे, श्री प्रेमनाथ विद्यालय थेरगाव शाळेतील सोमनाथ लक्ष्मण भांगे,डिगोळ जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी कष्णा राम बोयणे,संत भगवान विद्यालय धामणगाव,सुष्टी नारायण गोमदे,हर्षदा संतोष काळे,सुमती श्र्लोक कोरे, चंचल जगन्नाथ सिरसाठ,लोक जागृती विद्यालय रापका गौरवी गणपती कुंभार,धनश्री नामदेव लिबांपुरे, समृध्दी राजेंद्र टेकाम या विद्यार्थ्यांचा येरोळ जिल्हा परिषद शाळेत आयोजित कार्यक्रमात ट्राफी,शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी शिरूर अनंतपाळ पंचायत समितीचे सभापती संजय सुर्यवंशी,संरपच सतिश सिंदाळकर, मुख्याध्यापक धर्मपाल निळे,, शालेय समिती अध्यक्ष तानाजी दाडगे,माजी बांधकाम सभापती गणेश धुमाळे,पत्रकार शिवानंद भुसारे,सौ जगदेवी सुगावे,बालाजी महाराज, रामेश्र्वर चावरे,चामरगा संरपच महेश बोळेगावे,गुडेराव चौसष्टे, रत्नाकर सिंदाळकर, लक्ष्मण भांगे,जगदीप लोंढे, प्रकाश नागटिळक, चंद्रकांत पाटील,एल जी लोंढे, शिवाजी लोंढे,लक्ष्मण लोंढे, बाबूराव वाघमारे,अमर माडजे,नवाज पठाण,संदीप पाटील, मच्छिंद्र भालेकर यांच्यासह विद्यार्थी,पालक, शिक्षक, नागरिक उपस्थित होते.



CMYK

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## कळंबमध्ये हॉटेलसमोर मारहाण; सहाजणांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२७ मार्च -**

जेवणाच्या ऑर्डरवरून वाद झाल्याने कळंब येथील प्रेरणा हॉटेलसमोर एका कुटुंबावर हल्ला केल्याची घटना घडली. या प्रकरणी अभिषेक मुंडे, सागर मुंडे, ओमकार मुंडे, भैय्या सगरे, सुमित मोदी व एका अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



१४ मार्च २०२६ रोजी दुपारी सागर सुभाष साळुंखे (रा. बार्शी) व त्यांच्या नातेवाईकांना ऑर्डरला किती वेळ लागेल असे विचारल्याच्या कारणावरून आरोपींनी शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी तसेच चाकू, बिअर बाटली व लाकडी दांडक्याने मारहाण केली.


यात साळुंखे व त्यांचे नातेवाईक जखमी झाले.

याप्रकरणी सागर साळुंखे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कळंब पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.



# नळदुर्ग किल्ला संवर्धनासाठी निधी मंजुरी; पर्यटनाला चालना





**विलास येडगे**
**नळदुर्ग, दि.२७ मार्च -**

राज्यातील सर्वात मोठ्या भुईकोट किल्ल्यांपैकी एक असलेल्या नळदुर्ग किल्ला च्या जतन व संवर्धनासाठी राज्य शासनाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. 'नळदुर्ग किल्ला संवर्धन आणि स्थळ व्यवस्थापन आराखडा' अंतर्गत पहिल्या टप्प्यातील कामांसाठी तब्बल ७ कोटी १८ लाख ९१ हजार ७९१ रुपयांच्या निधीस मंजुरी देण्यात आली असून निविदा प्रक्रिया सुरू झाली आहे.

या प्रकल्पामुळे धाराशिव जिल्ह्याच्या पर्यटनाचा मानबिंदू असलेल्या किल्ल्याचे रूप पालटणार असल्याचा विश्वास राणा जगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला.

शासनाच्या पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाच्या छत्रपती संभाजीनगर कार्यालयामार्फत हे काम करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात किल्ल्याच्या तटबंदीचे शास्त्रोक्त पद्धतीने संवर्धन करण्यात येणार आहे. अनेक ठिकाणी कमकुवत झालेली तटबंदी दुरुस्त केली जाणार आहे. तसेच किल्ल्यातील झुडपे, गवत व साचलेला राडारोड हटवून परिसर स्वच्छ करण्यात येणार असून यामुळे किल्ल्याचे मूळ सौंदर्य अधिक खुलणार आहे.

तुळजाभवानी मंदिर दर्शनासाठी येणारे लाखो भाविक तसेच आंध्रप्रदेश व कर्नाटकातून शिर्डी मंदिर कडे जाणारे पर्यटक नळदुर्ग किल्ल्याला आवर्जून भेट देतात. त्यामुळे पर्यटकांच्या सोयीसुविधा वाढवण्यासाठी स्थळ व्यवस्थापन आराखड्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे. कामाचा दर्जा राखण्यासाठी पुरातत्त्व विभागाच्या नियमांनुसार आणि तज्ज्ञ वास्तुविशारदांच्या मार्गदर्शनाखालीच काम पूर्ण करणे कंत्राटदाराला बंधनकारक असणार आहे. पुढील दीड वर्षात किल्ल्याचे बदललेले रूप पाहायला मिळेल, असा विश्वास आमदार पाटील यांनी व्यक्त केला.

या संवर्धन प्रकल्पामुळेनळदुर्ग किल्ला पर्यटनाच्या नकाशावर अधिक ठळक होईल, स्थानिक पर्यटनाला मोठी चालना मिळेल, रोजगाराच्या संधी वाढतील असा दावा करण्यात आला आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### माजी आमदार दयानंद गायकवाड यांचा वाढदिवस उत्साहात

**कळंब, दि.२७ मार्च -**

माजी आमदार दयानंद गायकवाड यांचा ५६ वा वाढदिवस कळंब येथे मित्रपरिवाराच्या वतीने उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवर, कार्यकर्ते व नागरिकांनी उपस्थित राहून त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी गायक वाहक चौधरी यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन गायकवाड यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट चे कार्यकर्ते तसेच स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

### ढोकीत प्रतिबंधित गुटखा विक्री करणाऱ्यावर गुन्हा दाखल

**ढोकी, दि.२७ मार्च -**

ढोकी पोलीस ठाण्याच्या पथकाने प्रतिबंधित गुटखा विक्रीविरोधात कारवाई करत एका व्यक्तीवर गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणातील आरोपी दिपक भिमराव



शिंदे (वय ४०, रा. वाखरवाडी, ता. जि. धाराशिव) यांनी दि.२६ मार्च रोजी वाखरवाडी येथील जिल्हा परिषद शाळेजवळील टपरीमध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा व तत्सम पदार्थ विक्रीसाठी जवळ बाळगल्याचे आढळून आले. पोलीस पथकाने छापा टाकून गुटखा, विमल पान मसाला, व्ही-१ तंबाखू, डायरेक्टर पान मसाला, राजनिवास सुगंधी पान मसाला आदी सुमारे ४,०४४ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी आरोपीविरुद्ध ढोकी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

### धाराशिवात मोटारसायकल चोरी; अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल

**धाराशिव, दि.२७ मार्च -**

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातून एक मोटारसायकल चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. पांडुरंग कल्याणराव देशमुख (वय ५५, रा.



विद्यानगर तांबरी विभाग) यांची सुमारे १५ हजार रुपये किंमतीची बजाज डिस्कव्हर (क्र. एमएच २५ ५५०५) ही दुचाकी २५ मार्च २०२६ रोजी रात्री दीप हॉटेलजवळून अज्ञात चोरट्याने लंपास केली. याप्रकरणी देशमुख यांनी दिलेल्या फिर्यादीवरून धाराशिव शहर पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### येरमाळ्यात मटका जुगारावर छापा

**येरमाळा, दि.२७ मार्च -**

जुगार विरोधी कारवाईत येरमाळा पोलिसांनी चौरस्ता



परिसरातील ब्रिजखाली छापा टाकून मटका जुगार चालवणाऱ्या एका व्यक्तीवर कारवाई केली. दि.२६ मार्च २०२६ रोजी दुपारी ही कारवाई करण्यात आली. यावेळी आश्रुबा अभिमान पवार (वय २७, रा. येरमाळा) याच्याकडून कल्याण मटका जुगाराचे साहित्य व ९५० रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आली. याप्रकरणी येरमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# रोजगार मेळाव्याद्वारे २३६ नोंदणी तर ११८ प्राथमिक निवड

**कौशल्य प्रशिक्षणातून रोजगार मिळवा : तहसीलदार गोविंद येरमे**

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२७ मार्च -**

सध्या सर्वत्र कुशल कामगारांची मोठी गरज असून युवकांनी कौशल्य प्रशिक्षण घेऊन आपल्या ज्ञानाचे रूपांतर रोजगारात करावे, असे आवाहन गोविंद येरमे यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, धाराशिव व हुतात्मा वेदप्रकाश शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था उमरगा यांच्या संयुक्त विद्यमाने उमरगा येथे 'पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार व करिअर मार्गदर्शन मेळावा' आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजेंद्र पाटील होते. यावेळी सहाय्यक आयुक्त संजय गुरव, उद्योग निरीक्षक अक्षय घोडके, मायक्रोकॉमचे संचालक प्रा. युसुफ मुल्ला, आयएमसी सदस्य संतोष वखारे, प्राचार्य संजय माळकुंजे, गटनिदेशक नागनाथ माकणे आदी उपस्थित होते.

या रोजगार मेळाव्यात एकूण २३६ उमेदवारांनी नोंदणी केली. त्यापैकी १८० उमेदवारांनी आठ खाजगी आस्थापनांकडे मुलाखती दिल्या.

यामधून ११८ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली.या मेळाव्यात पुणे व धाराशिव जिल्ह्यातील ८ नामांकित कंपन्यांचा सहभाग होता.

विविध कंपन्यांच्या प्रतिनिधींनी रिक्त पदे, वेतन व सुविधा याबाबत उमेदवारांना सविस्तर माहिती दिली. सहाय्यक आयुक्त संजय गुरव यांनी प्रस्ताविक करताना विविध करिअर संधी व कौशल्य विकास प्रशिक्षणाबाबत माहिती दिली. तसेच उद्योग निरीक्षक अक्षय घोडके यांनी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

मेळाव्यात कौशल्य विकास प्रशिक्षण, उचएत्र्झ, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ आदी योजनांचे स्टॉल लावून माहिती देण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पवन नाईकवाडे यांनी केले, तर गटनिदेशक नागनाथ माकणे यांनी आभार मानले. यावेळी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे विद्यार्थी, कर्मचारी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हा परिषद शाळांकडे वळा; आदर्श शिक्षिकेचे पालकांना आवाहन



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२७ मार्च -**

बदलत्या शैक्षणिक युगात जिल्हा परिषद शाळांचे महत्त्व वाढत असून या शाळांमधून घडणारे विद्यार्थी शिक्षणासोबतच स्पर्धा परीक्षा व विविध कौशल्यांमध्येही यश मिळवत आहेत.



आदर्श शिक्षिका चौधरी वर्षा कमलाकर यांनी पालकांना आवाहन करत आपल्या मुलांना जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत प्रवेश देण्याचे आवाहन केले आहे. त्यांच्या मते, या शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडविण्यावर विशेष भर दिला जातो. जिल्हा परिषद शाळांमध्ये अनुभवी शिक्षकांकडून वैयक्तिक लक्ष, स्पर्धा परीक्षांची तयारी, डिजिटल शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रम यांमुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढत आहे. तसेच मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश व मध्यान्ह भोजन यांसारख्या सुविधाही उपलब्ध आहेत.

शिक्षक, पालक व विद्यार्थी यांच्यातील समन्वयामुळेच विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल होऊ शकते. त्यामुळे गावातील शाळांवर विश्वास ठेवून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## मंगरुळच्या मेहर पठाणची पोलीस दलात निवड

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.२७ मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील मंगरुळ येथील अंगणवाडी सेविका रुकूमबी इमाम शेख यांची मुलगी मेहर हिने आपल्या जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या जोरावर पोलीस दलात भरारी घेतली आहे. धाराशिव तालुक्यातील अंबेजवळगा येथील अरबाज पठाण यांची पत्नी असलेल्या मेहर पठाण (शेख) यांची धाराशिव पोलीस दलात कॉन्स्टेबल पदावर निवड झाली आहे.



मेहर यांनी प्राथमिक शिक्षण मंगरुळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत, तर माध्यमिक शिक्षण धाराशिव येथील श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी धाराशिव येथील सह्याद्री करिअर अकॅडमीमध्ये १० ऑगस्ट २०२५ पासून पोलीस भरतीचे प्रशिक्षण घेतले.

सातत्यपूर्ण अभ्यास, कठोर सराव आणि कुटुंबाच्या पाठिंब्यामुळे वयाच्या अवघ्या २२ व्या वर्षी त्यांनी हे यश संपादन केले. त्यांच्या या यशाबद्दल कुटुंबीय, नातेवाईक तसेच सासर-माहेरच्या ग्रामस्थांकडून अभिनंदन व कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## नळदुर्गमध्ये वाहतुकीस अडथळा; रिक्षाचालकावर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२७ मार्च -**

सार्वजनिक रस्त्यावर वाहतुकीस धोका निर्माण होईल अशा पद्धतीने रिक्षा उभी केल्याप्रकरणी एका रिक्षाचालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

निजाम नबीलाल शेख (वय ४०, रा. नळदुर्ग) यांनी जळकोट बसस्थानकाजवळ एनएच-६५ महामार्गावर आपली ऑटो रिक्षा (क्र. एमएच २५ एके ४८८६) धोकादायकरीत्या उभी केल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.

या प्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## कास्ती खुर्द शाळेचे १४ वर्षांनंतर स्नेहसंमेलन संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२७ मार्च -**

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व सुप्त कलागुणांना वाव मिळावा यासाठी कास्ती खुर्द येथील जिल्हा परिषद शाळेत तब्बल १४ वर्षांनंतर वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. उपक्रमशील शिक्षक गोविंद घारगे यांच्या पुढाकाराने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन आनंद तात्या पाटील, पल्लवीताई जानकर, अमोल पाटील व मुख्याध्यापक पाशा शेख यांच्या हस्ते झाले. यावेळी विविध मान्यवरांची उपस्थिती होती.





पहिली ते पाचवीच्या ६२ विद्यार्थ्यांनी स्वागत गीत, देशभक्तीपर गीत, लावणी, पारंपारिक व रिमिक्स गाण्यांवर ३१ नृत्याविष्कार सादर करत उपस्थितांची मने जिंकली. तसेच दोन नाटकेही सादर करण्यात आली.

गावकऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत सुमारे ६७,८१५ रुपयांची बक्षिसे दिली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले.

# घरगुती गणनेपासून डिजिटल जनगणनेपर्यंत; जनगणना-२०२७ साठी धाराशिव सज्ज

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ मार्च -**

आगामी जनगणना-२०२७ संदर्भात राज्यातील सर्व शहरी व ग्रामीण भागात जनगणनेच्या पूर्वतयारीस सुरुवात झाली असून जनगणना कामकाजात संयुक्त सचिव तथा मुख्य प्रधान जनगणना अधिकारी, मुंबई यांनी जनगणना संदर्भात टप्प्याटप्प्याने कार्यवाही करण्याबाबत कार्यपद्धती निश्चित करून दिली आहे.



जनगणना-२०२७ चे संचालन शासन व जनगणना कार्य संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या स्तरावरून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी, धाराशिव व जिल्हा जनगणना अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, धाराशिव यांच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्ययंत्रणेच्या स्तरावर जनगणना संबंधी घर यादी व गृहगणना (जनगणना २०२७ चा पहिला टप्पा) ही संपूर्ण प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी चार्ज जनगणना अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली असून जिल्ह्यातील सर्व तहसीलदार हे चार्ज जनगणना अधिकारी म्हणून जनगणनेचे संपूर्ण कामकाज पार पाडणार आहेत.

जनगणना-२०२७ च्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात जनगणना पूर्वतयारीला गती देण्यात आली असून घर यादी व गृहगणना टप्प्यापासून डिजिटल जनगणनेपर्यंत सर्व प्रक्रिया टप्प्याटप्प्याने राबविण्यात येणार आहे.त्यासाठी चार्ज जनगणना अधिकारी (तहसीलदार व मुख्याधिकारी) यांच्या कार्यालयाच्या स्तरावर जनगणना कामकाजासाठी आवश्यक ते अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. जनगणना-२०२७ च्या पहिल्या टप्प्यात घर यादी व गृहगणना ही मोहीम जिल्हास्तरावर व क्षेत्रीय कार्ययंत्रणेच्या स्तरावर प्रभावीपणे राबविण्यात येणार असून त्यासाठी धाराशिव जिल्ह्यात जनगणना - २०२७ चे कार्य पार पाडण्यासाठी आवश्यक ते मनुष्यबळ व संरचना निर्माण करण्यात आली आहे.

जनगणना पहिल्या टप्प्यासाठी जिल्ह्यात एकूण २८५० इन्शी लिस्टिंग ब्लॉक्स (HLB) निश्चित करण्यात आले असून २ मास्टर ट्रेनर,५२ फील्ड ट्रेनर,२८५० गणनाकर्मी (Enumerators) आणि ६२ पर्यवेक्षक (Supervisors) यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.सर्व संबंधितांना जनगणना-२०२७ चे प्रशिक्षण देण्यासाठी जिल्ह्यात १८ प्रशिक्षण केंद्र निश्चित करण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी,धाराशिव व जिल्हा जनगणना अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,धाराशिव यांच्या अधिनस्त जिल्हास्तरावर जनगणना कक्ष स्थापन करण्यात आला असून त्यामध्ये तहसीलदार-महसूल व तहसीलदार-(निवासी) यांची समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## भरधाव ट्रकच्या धडकेत पादचारी महिलेचा मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२७ मार्च -**

कळंब शहरात भरधाव व निष्काळजीपणे चालवलेल्या ट्रकच्या धडकेत एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

मयत शमीम जमीरोद्दीन शेख (वय ५५, रा. अरबगल्ली, सावरकर चौक, धाराशिव) या दि. २५ मार्च २०२६ रोजी दुपारी सुमारे ३.४५ वाजता होळकर चौक, कळंब येथे पायी जात असताना अपघात झाला.

यावेळी टाटा कंपनीच्या नव्या चेसिस ट्रक (क्र. यूपी ३२ एटीसी २५१३) चालकाने वाहन हायगयी व निष्काळजीपणे चालवत त्यांच्या पाठीमागून धडक दिली. या धडकेत त्या गंभीर जखमी झाल्या असून उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

या प्रकरणी जमीरोद्दीन जैनुलाबद्दीन शेख (वय ६१) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.


## संक्षिप्त वृत्त...




### जपानस्थित अभियंत्याकडून गावच्या शाळेला २१ हजारांची देणगी

**लोहारा, दि.२७ मार्च -**

लोहारा तालुक्यातील कनेगाव येथील सुपुत्र जयजित दगडू लोभे, सध्या जपान येथे सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून कार्यरत असून त्यांनी सामाजिक बांधिलकी जपत आपल्या गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसाठी २१ हजार रुपयांची देणगी दिली आहे. या मदतीमुळे शाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सोयी-सुविधांमध्ये मोलाची भर पडणार असून शाळेच्या भौतिक सुविधांचा विकास होण्यास हातभार लागणार आहे. या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक बालाजी साळुंके यांच्या हस्ते जयजित लोभे यांचा शाल व श्रीफळ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दादासाहेब कदम, सदस्य प्रद्युम्न पाटील, ग्रामपंचायत सदस्य बालाजी लोभे, महादेव लोभे, गणेश कदम, कुंडलिक कदम, शिक्षकवृंद तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.



### इटकळ येथे श्रीराम नवमी साजरी

**इटकळ, दि.२७ मार्च -**

इटकळ येथे यंदाची श्रीराम नवमी मोठ्या भक्तीभावात आणि उत्साहात साजरी करण्यात आली. दि.२५ मार्च रोजी रात्री श्रीराम मंदिरात अखंड भजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. दि.२६ मार्च रोजी दुपारी श्रीराम जन्मोत्सव साजरा करत पाळणा गीत सादर करण्यात आले. त्यानंतर महाआरती करून रामभक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण परिसर 'जय श्रीराम'च्या जयघोषाने दुमदुमला असून उत्सव संस्मरणीय ठरला.



### धाराशिवच्या मारुती बनसोडे यांना राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार

**नळदुर्ग, दि.२७ मार्च -**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने २०२०-२१ ते २०२४-२५ या कालावधीतील महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्काराचे वितरण २६ मार्च रोजी मुंबई येथे झाले. यामध्ये धाराशिव जिल्ह्यातील मारुती बनसोडे यांना राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सन्मान चिन्ह, प्रशस्तीपत्र, शाल व रोख १५ हजार रुपये देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमास विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

### इंदुबाई शेटे यांचे निधन

**धाराशिव, दि.२७ मार्च -**



धाराशिव तालुक्यातील उपळा (मा.) येथील इंदुबाई हणमंत शेटे (वय ७५) यांचे गुरुवार दि.२६ मार्च रोजी सायंकाळी निधन झाले. त्यांचे उपळा (मा.) येथे दि.२६ मार्च रोजी रात्री उशीरा अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, चार मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# धाराशिव जिल्हा परिषदेत महायुतीची वज्रमुठ कायम

**तुळजापूर, कळंब आणि परंडा तालुक्यास सभापती... चार सभापतींची निवड ४५ विरुद्ध १० मतांनी निश्चित...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ मार्च -**

जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष पदांच्या निवडीनंतर आज झालेल्या विशेष सभेत विविध विषय समित्यांच्या चार सभापतींची निवड करण्यात आली. महायुतीतील घटक पक्षांमध्ये संतुलन राखत भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि शिवसेना (शिंदे गट) यांना प्रतिनिधित्व देण्यात आले. सभेत झालेल्या मतदानात महायुतीच्या उमेदवारांनी ४५ विरुद्ध १० मतांनी विजय मिळवला.

कळंब तालुक्यातील डिकसळ जिल्हा परिषद गटाच्या शिवसेना (शिंदे गट)च्या पूजा तुषार शिंदे यांची महिला व बालविकास सभापतीपदी निवड झाली. त्याचप्रमाणे कळंब तालुक्यातील खामसवाडी गटाचे भाजपाचे विश्वास कोकणे यांची समाजकल्याण सभापतीपदी वर्णी लागली. परांडा तालुक्यातील डोंजा जिल्हा परिषद गटाचे सदस्य राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)चे भाऊसाहेब खरसाडे यांची कृषी व पशुसंवर्धन सभापतीपदी निवड करण्यात आली. तर तुळजापूर तालुक्यातील नंदगाव गटाचे भाजपाचे सिद्धेश्वर कोरे यांची अर्थ व बांधकाम सभापतीपदी निवड जाहीर करण्यात आली.

यापूर्वी जिल्हा परिषद अध्यक्षपदी अर्चनाताई पाटील तर उपाध्यक्षपदी उषाताई गायकवाड यांची निवड झाली होती. त्यामुळे जिल्हा परिषदेतील सत्तास्थापनेची प्रक्रिया आता पूर्ण झाली आहे.





**महेंद्र धुरगुडे व धनंजय सावंतांची संधी हुकली...**

### निवडीनंतर सत्कार व शुभेच्छांचा वर्षाव...

निवडीनंतर जिल्हा परिषद अध्यक्ष अर्चनाताई पाटील, उपाध्यक्ष उषाताई गायकवाड यांच्यासह मा.आ. राहुल मोटे व मा.आ. ज्ञानराज चौगुले, युवा नेते मल्हार पाटील, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष अजित पिंगळे यांनी निवड झालेल्या सर्व सभापतींचा सत्कार करून त्यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थित पदाधिकारी व प्रत्येक तालुक्यातील कार्यकर्त्यांनीही नव्याने निवड झालेल्या सभापतींवर अभिनंदनाचा वर्षाव केला.




### विकासाला गती देण्याचा निर्धार : अर्चनाताई पाटील



निवडीनंतर माध्यमांशी बोलताना जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांनी सांगितले की, महायुतीमध्ये पूर्ण एकवाक्यता असून मार्गदर्शक नेतृत्वाच्या आदेशानुसार जिल्हा परिषद विकासाला गती देण्यात येणार आहे. महायुतीमध्ये कोणातही मतभेद नसून पुढच्या कार्यकाळात इतर सदस्यांनाही संधी दिली जाईल. तसेच नवनियुक्त सभापती व सदस्यांच्या सूचना लक्षात घेऊन पारदर्शक व प्रभावी कारभार केला जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

गेल्या काही दिवसांपासून सभापती पदांसाठी महायुतीत जोरदार रस्सीखेच सुरू होती.




विविध इच्छुकांकडून प्रयत्न सुरू असतानाच आजच्या विशेष सभेत सर्व चर्चांना पूर्णविराम मिळाला.

दवाटप करताना महायुतीतील सर्व घटक पक्षांना योग्य प्रतिनिधित्व देण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे दिसून आले. महाविकास आघाडीकडूनही सभापती पदांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले होते. मात्र मतदान प्रक्रियेत त्यांना यश मिळू शकले नाही.

महायुतीच्या उमेदवारांनी स्पष्ट बहुमताच्या जोरावर सर्व चारही पदांवर विजय मिळवत आपले वर्चस्व सिद्ध केले. या पदवाटपानंतर जिल्हा परिषदेतील सत्तासमीकरण स्पष्ट झाले असून, आगामी काळात विविध विकासकामांना गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## पत्नीच्या खूनप्रकरणी पतीस जन्मठेप

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ मार्च -**



पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिचा खून केल्याप्रकरणी पती वाहीद बिलाल कुरेशी यास न्यायालयाने जन्मठेपेची व ३० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती अभिश्री देव यांनी हा निकाल दिला.

सरकारी वकील ॲड. महेंद्र देशमुख यांनी मांडलेला युक्तिवाद व सादर पुराव्यांच्या आधारे न्यायालयाने आरोपीस दोषी ठरवले. या प्रकरणात बाल साक्षीदाराची साक्ष महत्त्वाची ठरली.

नळदुर्ग येथे ५ नोव्हेंबर २०२४ रोजी आरोपीने पत्नी सुलताना हिच्यावर चाकू व कात्रीने वार करून तिचा खून केला होता. घटनेनंतर आरोपीने स्वतःवरही वार करून जखमी झाला होता.

या प्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपास पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते.

## वाशी येथे अवैध मद्य जप्त; एकावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२७ मार्च -**

ईट परिसरात अवैध मद्य विक्रीच्या उद्देशाने साठा बाळगणाऱ्या गणेश नवनाथ चांगन (वय २६, रा. वाशी) याच्याकडून पोलिसांनी कारवाई करत सुमारे ८०० रुपयांच्या २० सिलबंद देशी-विदेशी दारूच्या बाटल्या जप्त केल्या.

ही कारवाई २६ मार्च २०२६ रोजी सायंकाळी हॉटेल शिंवाश परिसरात करण्यात आली. याप्रकरणी महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम ६५(ई) अन्वये वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२७ मार्च -**



परंडा पोलीस ठाणे हद्दीत एका १७ वर्षे ८ महिने वयाच्या अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. पीडितेचे नाव व गाव गोपनीय ठेवण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मे २०२५ ते दि.२१ जून २०२५ रोजी सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास एका गावातील तरुणाने माझी आई आजारी आहे असे सांगून पीडितेला घरकामासाठी आपल्या सोबत नेले. त्यानंतर तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे.

या प्रकरणी पीडितेच्या आजोबांनी दि.२६ मार्च रोजी दिलेल्या फिर्यादीवरून परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर प्रकरणात पोक्सो कायद्यान्वये कलम ४, ६, ८ व १२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## वीज वाहिन्यांच्या तारा चोरी; दीड लाखांचा माल लंपास

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२७ मार्च -**

भुम पोलीस ठाणे हद्दीत वीज वाहिन्यांच्या तारा चोरी झाल्याची घटना उघडकीस आली असून अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दि.१० मार्च रोजी दुपारी १२.३० वाजण्यापूर्वी ते दि.२५ मार्च दरम्यान उमाचीवाडी व दुधोडी शिवारात ही चोरी घडली. उमाचीवाडी व दुधोडी शिवारातील २९ स्पॅनमधील तसेच दुधोडी शिवारातील १८ स्पॅनमधील वीज वाहिन्यांच्या कंडक्टर (तारा) असा एकूण सुमारे १,५०,००० रुपयांचा माल अज्ञात व्यक्तीने चोरून नेला. या प्रकरणी फिर्यादी अमोल मोटे यांनी दि.२६ मार्च रोजी दिलेल्या फिर्यादीवरून भुम पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

या घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## उमरग्यात ११९ महिला बचत गटांना ५.३२ कोटींचे कर्ज; महिला सशक्तीकरणाला चालना



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२७ मार्च -**

महिला सशक्तीकरणाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकत उमेद तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष, पंचायत समिती उमरगा यांच्या वतीने भव्य कर्ज मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. बुधवार (दि. २५) रोजी पंचायत समिती सभागृह, उमरगा येथे पार पडलेल्या या मेळाव्यात तालुक्यातील ११९ स्वयं सहायता समूहांना तब्बल ५ कोटी ३२ लाख रुपयांचे कर्ज मंजुरीपत्र वितरित करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान पंचायत समितीच्या नूतन सभापती ॲड. आकांक्षा ज्ञानराज चौगुले यांनी भूषविले. उपसभापती रेखा इंगळे, गटविकास अधिकारी प्रशांतसिंह मरोड यांची प्रमुख उपस्थिती होती. विविध बँकांचे शाखा व्यवस्थापक, पंचायत समितीचे अधिकारी व तालुका अभियान व्यवस्थापन कक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. या मेळाव्यात महाराष्ट्र ग्रामीण बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र आणि बँक ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने कर्ज वितरण करण्यात आले.

समूह कर्जासोबतच १४ महिला सदस्यांना वैयक्तिक उद्योगासाठी २० लाख ४० हजार रुपयांचे कर्ज मंजूर करून वाटप करण्यात आले.

दरम्यान, एसबीआयचे शाखा व्यवस्थापक डॉ. अंकुश यांनी महिलांनी नवीन उत्पन्नाचे स्रोत निर्माण करून शासन व बँक योजनांचा लाभ घ्यावा तसेच आर्थिक व्यवहार पारदर्शक ठेवावेत, असे आवाहन केले. या कर्ज मेळाव्यात एकूण ११९ गटांना ५.३२ कोटी रुपये तसेच वैयक्तिक उद्योगासाठी १४ महिलांना २०.४० लाख रुपये वितरित करण्यात आले.

या उपक्रमामुळे तालुक्यातील महिलांना आर्थिक बळ मिळून त्यांचे सशक्तीकरण अधिक मजबूत होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

### महिलांनी स्वावलंबी व्हावे : आकांक्षा चौगुले

उमरगा पं.स. सभापती ॲड. आकांक्षा चौगुले यांनी मार्गदर्शन करताना महिलांना कर्जाच्या माध्यमातून विविध व्यवसाय उभारून स्वावलंबी होण्याचे आवाहन केले. तसेच समूहाच्या माध्यमातून उत्पादन तयार करून विक्री केंद्रे उभारावीत व प्रशिक्षणाच्या साहाय्याने व्यवसाय वाढवावा, असे त्यांनी सांगितले.

## पंढरपूर-शेगाव रेल्वेमार्गाला मंजुरी द्या : लोकसभेत ओमराजे निंबाळकर यांची मागणी

**धाराशिव जिल्ह्यातील परंडा, भूम तालुक्याच्या विकासासाठी उपयुक्त ठरेल मार्ग...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ मार्च -**



धाराशिव लोकसभेचे खासदार ओम राजे निंबाळकर यांनी लोकसभेत जनतेच्या जिव्हाळ्याचा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न उपस्थित करत पंढरपूर-शेगाव नवीन रेल्वेमार्ग तातडीने मंजूर करण्याची जोरदार मागणी केली. सोलापूर, धाराशिव आणि बुलढाणा या तीन जिल्ह्यांच्या दृष्टीने हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

खासदार निंबाळकर यांनी सांगितले की पंढरपूर विठ्ठल-रुक्मिणी मंदिर आणि शेगाव गजानन महाराज मंदिर ही महाराष्ट्रातील प्रमुख तीर्थक्षेत्रे असून दरवर्षी कोट्यवधी भाविक येथे दर्शनासाठी येतात. मात्र, या दोन तीर्थक्षेत्रांना थेट रेल्वेने जोडणारा मार्ग नसल्यामुळे भाविकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. प्रस्तावित रेल्वेमार्ग पूर्ण झाल्यास प्रवास अधिक सुलभ, जलद आणि सुरक्षित होणार असून मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र हे भाग थेट रेल्वेमार्गाने जोडले जातील. याचा मोठा फायदा सामान्य नागरिक आणि भाविकांना होईल, असे त्यांनी नमूद केले.

या रेल्वेमार्गाचे महत्त्व केवळ धार्मिक पर्यटनापुरते मर्यादित नसून सोलापूर, धाराशिव आणि बुलढाणा जिल्ह्यांच्या सर्वांगीण विकासासाठीही तो अत्यंत उपयुक्त ठरेल, असे खासदार निंबाळकर यांनी ठामपणे सांगितले.

या मार्गामुळे व्यापार व उद्योगांना चालना शेतीमाल वाहतुकीस गती रोजगाराच्या संधी वाढ होणार असून अशी अनेक सकारात्मक परिणाम घडतील, असे त्यांनी स्पष्ट केले. धाराशिव जिल्ह्यातील भूम व परंडा तालुक्यातील नागरिकांनी या रेल्वेमार्गासाठी अनेक वर्षांपासून सातत्याने लढा दिला आहे. 'रेल्वे संघर्ष समिती' तसेच विविध शेतकरी संघटनांनी आंदोलने, निवेदने व पाठपुरावा करून ही मागणी जिवंत ठेवली आहे.

या संदर्भात अनेक प्रतिनिधींनी भेटीगाठी व निवेदनांद्वारे हा प्रश्न माझ्याकडे मांडला होता, अशी माहितीही खासदार निंबाळकर यांनी दिली.




### केंद्र सरकारकडे ठाम मागणी...

या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने रेल्वेमार्गाच्या सर्वेक्षणासाठी तातडीने निधी द्यावा सर्वेक्षण प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करावी. प्रकल्पास मंजुरी द्यावी अशी आक्रमक मागणी खासदार ओमराजे निंबाळकर यांनी रेल्वेमंत्र्यांकडे केली. या मागणीमुळे सोलापूर, धाराशिव आणि बुलढाणा जिल्ह्यांतील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रेल्वे प्रश्नाला राष्ट्रीय स्तरावर वाचा फुटली असून, आता केंद्र सरकार कोणते ठोस निर्णय घेते याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

## बनावट सोन्याच्या आमिषाने वृद्ध महिलेची १० हजारांची फसवणूक

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२७ मार्च -**




तुळजापूर शहरात बनावट सोन्याचे आमिष दाखवून एका वृद्ध महिलेची फसवणूक केल्याची घटना समोर आली आहे.

फिर्यादी पार्वती कृष्णकुमार राठोड (वय ६०, रा. गोकुळ नगर, रोहिणी नगर ३, सैफुल, सोलापूर) या दि. २६ मार्च २०२६ रोजी सकाळी सुमारे ८.३० वाजता तुळजापूर येथील जुने बसस्थानक परिसरात जात असताना दोन अनोळखी इसमांनी त्यांना गाठले.

या इसमांनी १० तोळ्याचे दोन सोन्याचे बिस्कीट सापडले आहेत असा बनाव करून त्यातील एक खोटे सोन्याचे बिस्कीट राठोड यांना दिले. त्याबदल्यात त्यांच्या विश्वासास पात्र ठरवत त्यांच्या गळ्यातील सुमारे २ तोळ्यांचे सोन्याचे मिनी गंठण (अंदाजे किंमत १०,००० रुपये) घेऊन आरोपी पसार झाले.

या प्रकरणी पार्वती राठोड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.